सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | रविवार, २३ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १३४ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com









www.tarunbharat.net
तरुण भारत






**चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया**

**भाग – ५**

## धावण्यासाठी योग्य शूजची निवड

योग्य धावण्याचे शूज निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण ते आरामदायी धावण्याचा अनुभव देतात आणि दुखापतींपासून बचाव करतात. शूज निवडताना खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात.

### १. महत्त्वाचे घटक

● पायाचा प्रकार आणि फिटिंगः फ्लॅट, आर्च किंवा न्यूट्रल पायानुसार योग्य शूज निवडा.

● धावण्याचा प्रकार आणि पृष्ठभाग : रोड, ट्रेल, ट्रॅक यासाठी वेगवेगळे शूज आवश्यक.

●कुशनिंग आणि सपोर्ट : योग्य झटक्यांचे शोषण करणारे शूज घ्या.

●साईझ आणि फिटिंग : बोटांना मोकळी जागा असलेले आणि चांगले बसणारे शूज निवडा.

● ट्राय आणि चाचणी : खरेदीपूर्वी चालून किंवा धावून पाहा.

● टिकाऊपणा आणि बजेट : चांगले शूज ५००-८०० किमी टिकतात.

### २. धावण्याचे शूजचे प्रकार

●रोड रनिंग शूज पक्क्या रस्त्यावर धावण्यासाठी हलके आणि कुशनिंगयुक्त.
(Saucony Kinvara, Nike Pegasus)

●ट्रेल रनिंग शूज डोंगराळ आणि चिखलयुक्त भागासाठी मजबूत ग्रिप आणि टिकाऊ सोल.
(Salomon Speedcross, Hoka Speedgoat)

●ट्रॅक रनिंग शूज स्पर्धात्मक धावण्यासाठी हलके आणि स्पाईक्स असलेले.
( Nike Zoom Victory, Adidas Adizero Avanti)

● मॅक्सिमलिस्ट शूज अतिरिक्त कुशनिंग आणि दीर्घ पल्ल्यासाठी आराम दायी.
(Hoka Bondi, New Balance Fresh Foam More)

●मिनिमलिस्ट शूज नैसर्गिक धावण्याचा अनुभव देणारे.
(Vibram FiveFingers, Merrell Vapor Glove)

● स्थिरता शूज ओव्हरप्रोनेशन असलेल्या धावपटूंना सपोर्ट देणारे.
(Asics GT-2000, Brooks Adrenaline GTS)

● न्यूट्रल शूज नैसर्गिक धावपटूंना संतुलित कुशनिंग.
(Nike Pegasus, Saucony Ride)

● मोशन कंट्रोल शूज तीव्र ओव्हरप्रोनेशन असलेल्या धावपटूंना अतिरिक्त स्थिरता.
(Brooks Beast, Asics Gel-Foundation)

● रेसिंग फ्लॅट्स शर्यतीसाठी हलके आणि जलद धावण्यासाठी डिझाइन केलेले.
(Nike Vaporfly, Adidas Adizero Pro)

● क्रॉस-ट्रेनिंग शूज धावण्यासोबतच जिम आणि इतर वर्कआउटसाठी उपयुक्त.
(Reebok Nano, Nike Metcon)

### निष्कर्ष

योग्य शूज निवडल्यास धावण्याचा अनुभव अधिक सुरक्षित आणि आरामदायी होतो. त्यामुळे आपल्या पायाच्या प्रकार, धावण्याची शैली आणि गरजांनुसार शूज खरेदी करावेत.

**- अतिश शहा**

फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर
मो. ९१७५८२८२०३

# श्रेयाच्या 'कर हर मैदान फतेह'ने आयपीएलचे उद्घाटन









आरसीबीच्या विराट कोहली व केकेआरच्या रिंकू सिंगशी संवाद साधताना केकेआरचा सहमालक शाहरूख खान. आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्यात करण ओजलाच्या रॅप संगीतावर नृत्य सादर करताना दिशा पटानी. आयपीएलच्या १८ व्या हंगामाचे केक कापून उद्घाटन करताना बीसीसीआयचे अध्यक्ष रॉजर बिन्नी. गाणे सादर करताना श्रेया घोषाल.

◆ **कोलकाता, २२ मार्च**

ईडन गार्डन्स स्टेडियमवर अभिनेत्री दिशा पटानीचा दिलखेचक नृत्य, पार्श्वगायिका श्रेया घोषालचे सुरेल गायन आणि लेसर शोच्या आकर्षक मिश्रणात इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या हंगामाचा उद्घाटन सोहळा पार पडला.

गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स संघाचा सह-मालक व अभिनेता शाहरुख खानने आपल्या भारदास्त आवाजात या उद्घाटन सोहळ्याचे संचालन केले.

पार्श्वगायिका श्रेया घोषालने घूमर घूमर... अन् कर हर मैदान फतेह हे गीत सुरेल स्वरात सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले खेळाडू आणि प्रेक्षकांचा उत्साह वाढविला. बॉलिवूड अभिनेत्री दिशा पटानीने चंदेरी पोशाख परिधान करून पागोल गाण्यावर दिलखेचक अदांसह मनोवेधक नृत्य सादर केले व प्रेक्षकांनाही थिरकायला लावले. आघाडीचा पंजाबी गायक, गीतकार व रॅपर करण औजलाने आपल्या हाय-ऑक्टेन परफॉर्मन्सने मोहित केले.

शाहरूख खानने बीसीसीआयचे पदाधिकारी व केकेआर व आरसीबीच्या कर्णधारांसह विराट कोहलीला व्यासपीठावर पाचारण करत त्यांचे स्वागत केले व त्यांच्याशी संवाद साधला. (वृत्तसंस्था)

# सनरायझर्स हैदराबाद राजस्थानविरुद्ध विजयी सुरुवात करण्यास उत्सुक

◆ **हैदराबाद, २२ मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात दुसऱ्या दिवशि म्हणजे रविवारी दुपारच्या सत्रात राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर जबरदस्त फलंदाज व अनुभवी गोलंदाजांचा समावेश असलेल्या संतुलित संघ- गत आवृत्तीतील उपविजेता सनरायझर्स हैदराबाद राजस्थान रॉयल्सविरुद्ध आपला पहिला सामना खेळणार आहे. यंदा विजेतेपद पटकावण्याच्या उद्देशाने हैदराबादचा संघ विजयी सुरुवात करण्यास उत्सुक आहे.

हैदराबादकडे ट्रॅव्हिस हेड, अभिषेक शर्मा, ईशान किशन व हेनरिक क्लासेनसारखे तडाखेबंद फलंदाज असल्यामुळे संघ व्यवस्थापनाला दुपारच्या सत्रातील या सामन्यात मोठी धावसंख्या उभारण्याची अपेक्षा असेल. जर कोणत्याही संघाने प्रथम फलंदाजी केल्यास ते ३०० धावांचा टप्पा गाठू शकतात आणि हैदराबादकडे असलेल्या ताकदीच्या जोरावर अशी कामगिरी होणे अपेक्षित आहे.

दुखापतीतून सावरल्यानंतर भारताचा अष्टपैलू नितीश कुमार रेड्डीचे पुनरागमन झाल्यामुळे हैदराबादच्या संघात भर पडेल अशी अपेक्षा आहे. अभिषेक व हेड यांचा अलिकडचा फॉर्म पाहता सनरायझर्स हैदराबादच्या चाहत्यांना जबरदस्त फटकेबाजी बघण्याची संधी मिळण्याची आशा आहे. फेब्रुवारीमध्ये झालेल्या घरच्या मालिकेत इंग्लंडविरुद्धच्या शेवटच्या टी-२० सामन्यात अभिषेकने केवळ ५४ चेंडूत १३५ धावा केल्या.

इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर वगळता रॉयल्सच्या गोलंदाजी विभागात काही स्थापित नावे असल्यामुळे रविवारी प्रथम फलंदाजी केल्यास सनरायझर्स हैदराबाद २५० पेक्षा जास्त धावसंख्या उभारण्याचा प्रयत्न करू शकतात अशी शक्यता आहे.

**आजचे आयपीएल सामने**

**सनरायझर्स हैदराबाद वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : राजीव गांधी स्टेडियम, हैदराबाद
**वेळ** : दुपारी ३.३० वाजतापासून
-- -- -- ---- ---- ---- ---- ---- --
**चेन्नई सुपर किंग्ज वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम्? स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रक्षेपण** : स्टार स्पोर्ट्सवर



पॅट कमिन्स

सनरायझर्स हैदराबादने गत हंगामात तीन वेळा २५० पेक्षा जास्त धावसंख्या उभारली होती, यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध अवे सामन्यात २८७ व घरच्या मैदानावर मुंबई इंडियन्सविरुद्ध २७७ धावांचा समावेश होता. अभिषेक व हेड या स्फोटक जोडीने तिसऱ्यांदा दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध २६६ धावा काढत आयपीएलमध्ये सर्वाधिक १२५ धावा उभारल्या होत्या.



रियान पराग

कर्णधार पॅट कमिन्स व मोहम्मद शमी ही अनुभवी वेगवान जोडी गोलंदाजी विभागाची धुरा सांभाळतील, तसेच आणखी एक गोलंदाज ॲडम झॅम्पा हा फिरकी गोलंदाज आहे. (वृत्तसंस्था)

### संजू सॅमसन केवळ फलंदाजी करू शकतो

२०१६ चा विजेता सनरायझर्स हैदराबाद संघ राजस्थान रॉयल्सपेक्षा फलंदाजीच्या बाबतीत खूपच पुढे दिसत आहे. बोटाच्या दुखापतीमुळे कर्णधार संजू सॅमसनची उणीव भासणार नाही. सॅमसन यष्टिरक्षण व क्षेत्ररक्षण करू शकत नाही व केवळ बोटावर संरक्षण घेऊन फलंदाजी करू शकतो. तो इम्पॅक्ट प्लेअर म्हणून आला तर आश्चर्य वाटणार नाही.

२००८ च्या विजेत्या राजस्थान रॉयल्स संघाच्या पहिल्या तीन साखळी सामन्यांमध्ये फलंदाज रियान पराग हा अंतरिम कर्णधार असेल.

इंग्लंडच्या जोस बटलरला संघाबाहेर केल्यानंतर, रॉयल्स संघाची फलंदाजीची बाजू थोडी कमकुवत झाली आहे, तरीही त्यांच्याकडे शिमरॉन हेटमायर, ध्रुव जुरेल, नितीश राणा व यशस्वी जयस्वालसारखे दमदार खेळाडू अजूनही आहेत. हैदराबाद व राजस्थान संघ गत हंगामात एकमेकांविरुद्ध दोन सामने खेळले होते. हैदराबादने दोन्ही सामने जिंकले होते, त्यामुळे या सामन्यातही त्यांना राजस्थान संघावर वर्चस्व गाजविण्याचा विश्वास असेल.

# सुकांत, आरती, प्रेमकुमारला रौप्यपदके

**खेलो इंडिया पॅरा गेम्स**

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

येथे सुरु असलेल्या खेलो इंडिया पॅरा गेम्समध्ये बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्राच्या सुकांत कदम व आरती पाटील तसेच प्रेमकुमारने रौप्यपदक मिळविले.

पॅरा ऑलिम्पिक पदकविजेता सुकांत कदम याच्याकडून सुवर्णपदकाची अपेक्षा होती, पण अंतिम फेरीत त्याला तमिळनाडूच्या नवीन शिवकुमारकडून १५- २१, १०-२१ असा पराभव पत्करावा लागला.




व्हीलचेअर गटात प्रेमकुमार आले याला उत्तर प्रदेशच्या शशांककुमारने पराभूत केले. ही लढत शशांककुमारने २१-१२, २१-१५ अशी जिंकली.

आरती पाटील पॅरालिम्पिक खेळाडू मनीषा रामदास हिच्याकडून २१-५, २१-४ असा पराभव स्वीकारावा. मनीषाच्या वेगवान आणि अष्टपैलू खेळासमोर २८ वर्षीय आरती पूर्णपणे अपयशी ठरली.

नवीनने चांगली तयारी केली होती. माझी तयारी कमी पडली. त्याने नियोजनबद्ध खेळ केला. त्याने फ्लॅट शॉट मारण्याची युक्ती वापरली. त्याला योग्य प्रत्युत्तर देणे मला जमले नाही. आजचा दिवस त्याचा होता, असे सुकांत म्हणाला.

सुकांत जागतिक क्रमवारीत दुसऱ्या तर नवीनकुमार सहाव्या क्रमांकावर आहे. (वृत्तसंस्था)

# पंजाब किंग्जचा सर्वोत्तम संघ होण्याचा प्रयत्न : रिकी पॉण्टिंग

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये (आयपीएल) विजेतेपदाची प्रतीक्षा संपविणे हे आमचे तत्काळ लक्ष्य आहे, परंतु त्याहीपेक्षा आम्ही सर्वोत्तम पंजाब किंग्ज संघ होण्याचे ध्येय ठेवले आहे, असे मुख्य प्रशिक्षक रिकी पॉण्टिंग यांनी म्हटले आहे.

रिकी पॉण्टिंग मुख्य प्रशिक्षक व गत वर्षी आयपीएल विजेता केकेआरचा कर्णधार श्रेयस अय्यर आता या हंगामात पंजाब किंग्जचा कर्णधार झाला आहे, त्यामुळे पंजाब किंग्जला यंदा आपले पहिले आयपीएल विजेतेपद मिळण्याची आशा आहे तसेच एक मजबूत संघ म्हणून घडण्याचीही आशा आहे.

पंजाब किंग्ज मंगळवार २५ मार्च रोजी अहमदाबादमध्ये आपल्या पहिल्या सामन्यात गुजरात टायटन्सविरुद्ध खेळणार आहे.



पंजाब किंग्ज संघाचे एकूण ध्येय आयपीएल जिंकणे आहे. धर्मशाळेतील शिबिरात सहभागी झाल्यावर मी पहिल्याच दिवशी खेळाडूंना सांगितले होते की आम्ही खेळलेला सर्वात महान पंजाब किंग्ज संघ तयार करणार आहोत व घडणार आहोत. मात्र हा चमत्कार एका रात्रीत घडणार नाही, ,त्याकरिता तुम्हाला संधी निर्माण करावी लागणार आहे, असे पॉण्टिंग म्हणाले. ऑस्ट्रेलियाच्या या महान फलंदाजाने पंजाब किंग्जच्या खेळाडूंमध्ये विजयी वृत्ती विकसित करण्यावर भर दिला आहे.

जिंकणे ही खरोखरच वृत्तीची बाब आहे. मी कोणालाही माझ्याकडून किंवा माझ्या संघातून काहीही हिरावून घेऊ देऊ इच्छित नाही, असे ते म्हणाले. दिल्लीच्या प्रियांश आर्य व मुंबईच्या सूर्यांश शेडगे आणि मुशीर खान या अनकॅप्ड भारतीय खेळाडूंना या हंगामात चांगले खेळण्याची सूचना पॉण्टिंगने दिली. प्रियांश आर्य हा आमच्यासाठी एक अतिशय खास संभाव्य सलामीवीर फलंदाज आहे. सूर्यांश शेडगे हा आतापर्यंत आमच्या प्रशिक्षणात खूप प्रभावी राहिला आहे, असे त्यांनी सांगितले. मला प्रभावित करणारा आणखी एक खेळाडू म्हणजे मुशीर खान. त्याने आधीच संघात बरेच काही आणले आहे. (वृत्तसंस्था)



# शिवाजीच्या हरीदासला रौप्य, साखरेला कांस्य

**राज्य व राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेतील कामगिरी**

**सोलापूर, दि. २२ मार्च-**

भोलपुर (पश्चिम बंगाल) येथे झालेल्या ज्युनिअर राष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत मराठा समाज सेवा मंडळ संचलित छत्रपती शिवाजी कनिष्ठ रात्र महाविद्यालयाच्या सिद्धार्थ साखरे याने धनुर्विद्यातील रिकर्व्ह प्रकारात कांस्य तर प्रेरणा हरिदास हिने राज्य स्पर्धेत कंपाऊंड प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले.

या खेळाडूना आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या प्रशिक्षक दिपक चिकणे, प्रा.संतोष गवळी, प्रा. सचिन गायकवाड व मारुती घोडके, नितीन गोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल त्यांचे मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी महापौर मनोहरपंत सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी सचिव महेश माने, संचालक महादेव गवळी, प्राचार्य मंजुश्री सपाटे पाटील, प्राचार्य मधुकर पवार यांनी अभिनंदन केले.

# आरसीएफ विभाग, मेडिकल ऑपरेटिंग पर्सनल संघास विजेतेपद





**रेल्वे कामगार क्रीडा महोत्सवातील कामगिरी**

**सोलापूर, दि. २२ मार्च-**

रेल्वे कामगार क्रीडा महोत्सवात क्रिकेट स्पर्धेत पुरुष गटात आरसीएफ विभाग व महिला गटात मेडिकल ऑपरेटिंग पर्सनल संघाने विजेतेपद पटकाविले. आरसीएफने सीनियर डी अँड को इंजिनिअरिंग संघास तर मेडिकल ऑपरेटिंग पर्सनल संघाने सीएनडब्लू संघास हरविले.

मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर व डिव्हिजनल स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रेल्वे कर्मचाऱ्याकरिता हा क्रीडा महोत्सव आयोजित केला होता. पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर विभागाचे क्रीडा अधिकारी आदित्य त्रिपाठी यांच्या हस्ते करण्यात आले. या याप्रसंगी मध्य रेल्वे सोलापूर विभागाचे वरिष्ठ मंडल इंजिनियर समन्वय सचिन गनेर, डॉ. आनंद कांबळे, वरिष्ठ मंडल इंजिनियर मध्य सोलापूर अवधेश मीना, आरपीएफ कमिशनर आदित्य, सीआरएमएसकेचे सचिव उल्हास बागेवाडी, सुनिता गुराखे, एनआरएमयूकेचे प्रीती धावणे, मध्य रेल्वे सोलापूरचे सचिव किशोर पिल्ले व खजिनदार विक्रांत पवार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश नवले यांनी केले तर पारितोषिक वाचन मनोज वाल्मिकी यांनी केले. कामगार क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूरचे कमिटी मेंबर नेताजी घोडके, सुभाष पांढरे, विक्रम माने, नागेश नवले, दत्ता वाघमोडे व मोहनदास आदींनी परिश्रम घेतले.

## आजचे सामने


सनरायजर्स हैद्राबाद वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : दुपारी ३.३० वाजता

ठिकाण : राजीव गांधी स्टेडियम, हैद्राबाद

# सोलापूर तरुण भारत


न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

## आजचे सामने


चेन्नई सुपरकिंग्ज वि. मुंबई इंडियन्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : चिदंबरम स्टेडियम, चेन्नई

सोलापूर | रविवार, २३ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १३४ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |


ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


### महत्त्वाचे

## विनोदकुमार शुक्ला यांना ज्ञानपीठ पुरस्कार



**नवी दिल्ली** : साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार हिंदी भाषेतील प्रख्यात लेखक विनोदकुमार शुक्ला यांना जाहीर करण्यात आला. ते छत्तीसगडमधील पहिलेच ज्ञानपीठ विजेते ठरतील. ८८ वर्षीय विनोदकुमार शुक्ला हे लघुकथा, कवी आणि निबंध लेखक असून, ते त्यांच्या काळातील लेखकांपैकी हिंदीचे महान लेखक आहेत. हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे ते बारावे हिंदी लेखक आहेत.पुरस्कारात ११ लाख रुपये रोख, सरस्वतीची कांस्यमूर्ती प्रदान केली जाते.

## झारखंडमध्ये आयईडी स्फोट, सीआरपीएफ जवान हुतात्मा

**चायबासा** : झारखंडच्या पश्चिम सिंघभूम जिल्ह्यात शनिवारी नक्षलवाद्यांनी घडवलेल्या आयईडी स्फोटात केंद्रीय राखीव पोलिस दल अर्थात् सीआरपीएफचा जवान हुतात्मा झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली. नक्षलविरोधी अभियान राबवले जात असताना, छोटानागरा पोलिस ठाणे हद्दीतील वनग्राम मारंगपोंगाजवळच्या जंगलात आज दुपारी अडीच वाजताच्या सुमारास आयईडीचा स्फोट झाला. सुरक्षा दलाला लक्ष्य करण्यासाठी माओवाद्यांनी हा आयईडी पेरून ठेवला होता.

# दंगेखोरांकडूनच नुकसान भरपाई करणार : मुख्यमंत्री

**। पैसे दिले नाही तर त्यांची मालमत्ता विकू । शेवटचा दंगेखोर पकडेपर्यंत कारवाई चालणार**

◆ **नागपूर, २२ मार्च**

महाल भागात ज्यांनी सोमवारी रात्री हिंसाचार केला, नागरिकांच्या मालमत्तांचे आणि वाहनांचे नुकसान केले, त्याच दंगेखोरांकडून नुकसान भरपाई वसूल करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज स्पष्ट केले. त्यांनी पैसे भरले नाही, तर त्यांची मालमत्ता विकून भरपाई वसूल करू, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी दिला.



पत्रपरिषदेला संबोधित करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. सोबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल

शहरात झालेल्या हिंसाचाराबाबत मुख्यमंत्र्यांनी आज वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. जोपर्यंत या हिंसाचारातील शेवटचा दंगेखोर सापडत नाही, तोपर्यंत ही कारवाई सुरूच राहणार आहे. आयत लिहिलेली चादर आंदोलकांनी जाळली, हा खोटा प्रचार करण्यात आला. खोटा प्रचार करून नागरिकांच्या भावना भडकविण्याचे काम करण्यात आले. त्यानंतर रात्री अचानक हिंसाचार भडकला. मात्र, त्याही परिस्थितीत पोलिसांनी चांगली कारवाई केली आणि चार-पाच तासांत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले, असे मुख्यमंत्री म्हणाले.

दंग्यांवर नियंत्रण मिळविताना तीन पोलिस उपायुक्त जखमी झाले; तर एकूण ४० लोक यात जखमी झालेत. त्यानंतर या संपूर्ण भागात संचारबंदी लागू करण्यात आली. पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या संपूर्ण घटनेचे विविध व्हिडीओ तपासून १०४ जणांची ओळख पटविण्यात आली. त्यात काही १२ ते १८ वर्षे वयोगटातील मुलेही आहेत. त्यांच्यावर विधिसंघर्षग्रस्त कायद्यानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

काहींनी सोशल मीडियावर चुकीच्या पोस्ट केल्या आहेत. त्या सर्व पोस्ट तपासून ६८ पोस्ट डीलिट करण्यात आल्या. आणखी अनेक पोस्ट तपासण्याचे काम सुरू आहे. त्यातील काही पोस्टमध्ये बांगलादेशी कनेक्शन असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. तपास पूर्ण होईपर्यंत नक्की काय ते सांगता येणार नाही. महिला पोलिसांशी असभ्य व्यवहार झाला नाही. मात्र, त्यांच्यावर दगडफेक करण्यात आली. हा प्रकार चुकीचा आहे. त्या आरोपींवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### 'त्या' तरुणाचा मृत्यू

हिंसाचारात गंभीर जखमी तरुणाचा आज दुपारी मेयो रुग्णालयात मृत्यू झाला. इरफान अन्सारी असे त्याचे नाव आहे. मध्यरात्रीनंतर गीतांजली टॉकीज परिसरात हा तरुण बेशुद्धावस्थेत पोलिसांना आढळला. पोलिसांनी त्याला मेयो रुग्णालयात नेले. त्या तरुणाने मद्यप्राशन केले होते, डोक्याला गंभीर दुखापत होती तसेच पोटावर जखमा असल्याचे वैद्यकीय तपासणीत उघड झाले. तो व्हेंटीलेटरवर होता. आज दुपारी त्याचा मृत्यू झाला.

### संचारबंदी शिथिल करण्यास सुरुवात

परिस्थिती नियंत्रणात असल्याने आजपासून संचारबंदी हळूहळू शिथिल होणार आहे. काँग्रेसच्या समितीबाबत मुख्यमंत्री म्हणाले की, त्या समितीला काही अर्थ नाही. अकोला दंग्यातील आरोपी समितीचा सदस्य आहे. यावरूनच लक्षात येते की, ही समिती किती गंभीर असेल. (तभा वृत्तसेवा)

# बांगलादेशातील हिंदूंसोबत एकजुटीने उभे राहा

**अ. भा. प्रतिनिधी सभेत प्रस्ताव पारित**

◆ **बंगळुरू, २२ मार्च**

बांगलादेशातील हिंदू आणि इतर अल्पसंख्यक समुदायांविरुद्ध इस्लामिक कट्टरपंथींकडून सुरू असलेल्या हिंसाचार, अन्याय आणि छळाबद्दल संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत तीव्र चिंता व्यक्त करणारा प्रस्ताव पारित करण्यात आला. ही मानवी हक्कांची उल्लंघन करणारी गंभीर बाब असल्याचे प्रस्तावात म्हटले आहे तसेच बांगलादेशातील हिंदू समाजासोबत एकजूट होऊन उभे राहण्याचे आवाहन करण्यात आले.



पत्रपरिषदेत माहिती देताना सह सरकार्यवाह अरुण कुमार. सोबत सुनील आंबेकर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभा जनसेवा विद्या केंद्र, चन्नेनहल्ली, बंगळुरू येथे सुरू आहे. सह सरकार्यवाह अरुण कुमार यांनी आज अखिल भारतीय प्रतिनिधी सभेने (एबीपीएस) पारित केलेल्या प्रस्तावाची माहिती माध्यमांना दिली. व्यासपीठावर अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर उपस्थित होते.

बांगलादेशातील सध्याच्या सत्तापालटाच्या काळात मठ, मंदिरे, दुर्गा पूजा मंडप आणि शैक्षणिक संस्थांवर हल्ले, मूर्तींची विटंबना, हत्या, मालमत्तेची लूट, महिलांचे अपहरण आणि छळ, जबरदस्तीने धर्मांतर इत्यादी अनेक घटना सतत समोर येत आहेत. या घटनांना केवळ राजकीय म्हणणे आणि त्यांचे धार्मिक पैलू नाकारणे हे सत्यापासून दूर जाण्यासारखे होईल. कारण, बहुतेक बळी हिंदू आणि इतर अल्पसंख्यक समुदायातील आहेत, असेही प्रस्तावात म्हटले आहे.

बांगलादेशात इस्लामिक कट्टरपंथी घटकांकडून हिंदू समाजावर, विशेषतः अनुसूचित जाती आणि जमाती समुदायांचा होणारा छळ ही काही नवीन गोष्ट नाही. बांगलादेशातील हिंदूंची संख्या सतत कमी होत आहे, ते अस्तित्वाच्या संकटाचा सामना करीत आहेत, असे ही स्थिती दर्शवते. विशेषतः, गेल्या वर्षीच्या हिंसाचाराला मिळालेल्या सरकारी आणि संस्थात्मक पाठिंब्याची पातळी ही गंभीर चिंतेची बाब आहे तसेच बांगलादेशकडून सतत होत असलेली भारतविरोधी विधाने दोन्ही देशांमधील संबंधांसाठी हानिकारक ठरू शकतात, असेही प्रस्तावात म्हटले आहे.

काही आंतरराष्ट्रीय शक्ती जाणूनबुजून भारताच्या शेजारील देशांमध्ये अविश्वास आणि संघर्षाचे वातावरण निर्माण करून एका देशाला दुसऱ्या देशाविरुद्ध उभे करून अस्थिरता पसरवत आहेत. प्रतिनिधी सभा, बुद्धिजीवी आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींवरील तज्ज्ञांना आवाहन करते की, त्यांनी पाकिस्तान आणि 'डीप स्टेट'च्या भारतविरोधी वातावरणावर आणि कारवायांवर लक्ष ठेवावे आणि त्यांचा डाव उघड करावा.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की, बांगलादेशातील हिंदू समाजाने शांततापूर्ण, संघटित आणि लोकशाही पद्धतीने या अत्याचारांना धैर्याने विरोध केला आहे. भारतातील आणि जगभरातील हिंदू समुदायाने त्यांना नैतिक आणि भावनिक पाठिंबा दिला, हे कौतुकास्पद आहे. भारत आणि जगातील अनेक हिंदू संघटनांनी या हिंसाचाराचा निषेध करून निदर्शने केली आहेत, असे प्रस्तावात म्हटले आहे. (तभा वृत्तसेवा)

### भारत हिंदूंसह इतर अल्पसंख्यकांच्या पाठीशी

भारत सरकारने बांगलादेशातील हिंदूंसह इतर अल्पसंख्यक समुदायांच्या आणि त्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची वचनबद्धता व्यक्त केली आहे. त्यांनी बांगलादेशच्या अंतरिम सरकारसोबत तसेच अनेक आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर हा मुद्दा उपस्थित केला आहे. बांगलादेश सरकारशी सतत संवाद साधत असताना, तेथील हिंदू समुदायाची सुरक्षा, प्रतिष्ठा सुनिश्चित करण्यासाठी शक्य तितके प्रयत्न करीत राहावे, अशी विनंती प्रतिनिधी सभा भारत सरकारला करते, असेही ठरावात म्हटले आहे.

# केंद्र सरकारकडून कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द

◆ **मुंबई, २२ मार्च**

महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, कांदा निर्यातीवरील वीस टक्के निर्यात शुल्क दि. १ एप्रिल २०२५ पासून रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या निर्णयाचे स्वागत करत केंद्र सरकारचे आभार मानले आहे.

केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, "केंद्र सरकारचा हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कांदा निर्यातीवर आकारण्यात येणारा वीस टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी मी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी थेट संवाद साधून त्यांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली होती. (वृत्तसंस्था)

# वळसंगजवळ कारचे टायर फुटून दोन महिलांचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

मुंबई ते अक्कलकोटकडे जाताना वळसंगजवळील वळसंग वाडा हॉटेल समोरील रस्त्यावर अचानक कारचे टायर फुटून झालेल्या अपघातात मुंबई येथील दोन म हिलांचा मृत्यू झाला. तर इतर तिघे जखमी आहेत. हा अपघात शुक्रवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला.

कुसूम भटा पाटील (वय ७०, रा. कल्याण मुंबई) व कल्पना जिजाबराव पाटील (वय ५०, रा. कल्याण मुंबई) अशी मृत्यू झालेल्या महिलांची नावे आहेत. तर शोभा राजेश सनगर (वय ५०, रा. कल्याण मुंबई), शुभज राजेश सनगर (वय २८, रा. कल्याण मुंबई) बसवण्णा पवाडेप्पा म्हेत्रे (वय ३४, रा. तोळनूर ता. अ.कोट) अशी जखमींची नावे आहेत. वरील सर्वजण हे मुंबई कल्याण येथून कारमध्ये बसून अक्कलकोटच्या दिशेने जात होते. सायंकाळी सहाच्या सुमारास ते जात असलेली कारचे वळसंग गावाजवळील वळसंग वाडा या हॉटेलसमोरील रस्त्यावर अचानक टायर फुटले. यामुळे चालकाचा कारबरील ताबा सुटल्याने कार समोर रस्त्यावर थांबलेल्या टेम्पोला जाऊन धडकल्याने कुसूम यांच्या चेह-याला जखम झाली तसेच त्यांच्या छातीला आणि कमरेला मुकामार लागला होता. तसेच कल्पना पाटील यांच्या डोक्याला जखम झाली होती. तर इतरांना मुकामार लागल्याने सर्वांना रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात सायंकाळी ६.५० वाजता दाखल केले होते. परंतु कुसूम पाटील व कल्पना पाटील यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# जुळे सोलापुरात तरुणीची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

बारावीत शिकणाऱ्या एका तरुणीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना जुळे सोलापुरातील ए.जी.पाटील नगरात शनिवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली.

अमृता शिवरुद्र शिंपी (वय १८ रा.ए.जी पाटीलनगर, जुळे सोलापूर) असे मयत झालेल्या तरुणीचे नाव आहे. शनिवारी दुपारी दोन वाजेच्या सुमारास घरात कुणी नसताना तिने घराच्या पहिल्या मजल्यावरील खोलीत छताच्या पंख्याला साडीच्या सहाय्याने गळफास घेतली होती. याची माहिती मिळाल्यानंतर नातेवाईकांनी तिला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ती उपचारापूर्वी मयत झाली.मयत अमृता शिंपी हिच्या पश्चात आई आणि एक मोठा भाऊ असा परिवार आहे. ती बारावी इयत्तेत शिकत होती. तिची आई शिक्षिका असून त्या शाळेत गेल्यानंतर तिने हा प्रकार केला.या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही.

# मोदींचा ५ एप्रिलला श्रीलंका दौरा

कोलंबो : पंतप्रधान नरेंद्र मोदी ५ एप्रिलला श्रीलंका दौरा करणार आहेत. ही घोषणा राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी केली. मोदींच्या भेटीची तारीख जाहीर करताना दिसानायके शुक्रवारी संसदेत निवेदन देत होते.

मागील आठवड्यात परराष्ट्र व्यवहार मंत्री विजिता हेराथ यांनी जाहीर केल्याप्रमाणे मागील वर्षी दिसानायके यांच्या दिल्ली भेटीदरम्यान झालेल्या करारांना अंतिम स्वरूप देण्यासाठी मोदी येथे येतील.

# पोटच्या मुलाचा गळा चिरून खून

**बापाला अटक, पुण्यातील खळबळजनक घटना**

◆ **पुणे, २२ मार्च**

कुटुंबातील कलह मोठी सामाजिक समस्या झाली असून, त्याचा फटका निष्पाप चिमुकले आणि मुला-मुलींना बसत आहे. अशाच भांडणाचा फटका साडेतीन वर्षांच्या चिमुकल्याला बसला असून, बापाने मुलाचा खून केल्याची घटना पुणे येथे घडली आहे. अभियंता असलेल्या व्यक्तीला याप्रकरणी अटक करण्यात आली आहे.

माधव साधुराम टिकेटी हा चंदननगर येथील रहिवासी आहे. मूळचा विशाखापट्टणम् येथील रहिवासी असलेला माधव पत्नी स्वरूपा, आठ वर्षीय मुलगी आणि साडेतीन वर्षांचा मुलगा हिंमत यांच्याबरोबर राहत होता. स्वरूपा गृहिणी असून, माधव आयटी कंपनीत अभियंता आहे. त्याला दारूचे व्यसन असून, तो सतत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असे. गेल्या गुरुवारी सकाळी त्याचे पत्नीसोबत भांडण झाले. मुलीला घेऊन येतो, असे सांगत तो हिंमतला घेऊन बाहेर पडला. रात्री नऊ वाजले तरी पती आणि मुलगा परत न आल्याने स्वरूपाने पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणावरूनआरोपीचा शोध घेतला, पण त्याच्यासोबत मुलगा नव्हता. भरपूर दारू प्याल्याने त्याला धड बोलताही येत नव्हते. शुक्रवारी त्याची कसून तपासणी केली. सुरुवातीला त्याने हडपसर येथील बसस्थानकावर हिंमत हरविल्याचे सांगितले. मात्र, पोलिसांनी हिसका दाखविताच माधवने खूनाची कबुली दिली. खराडी परिसरातील एका निर्जनस्थळी त्याने मुलाचा खून केल्याचे सांगितले. (वृत्तसंस्था)

### खून केल्यानंतर लॉजवर येऊन झोपला

तपासात पोलिसांना एक फुटेज हाती लागले. यात माधव मुलाला दुचाकीवर घेऊन जात असल्याचे तसेच एक दुकानातून चाकू आणि ब्लेड खरेदी केल्याचे दिसले. गुरुवारी दुपारी अडीच ते तीनच्या सुमारास त्याने हिंमतला ठार मारले आणि वडगाव शेरीतील एका लॉजवर येऊन झोपला.

# आरसीबीची विजयी सुरुवात

**कोलकाताचा ७ गडी राखून पराभव; कोहली-सॉल्टचे अर्धशतक**

**कोलकाता, २२ मार्च**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल-१८ व्या हंगामातील पहिल्या सामन्यात विजय मिळवला आहे. त्यांनी गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्सचा ७ गडी राखून पराभव केला. आरसीबीने ३ वर्षांनी केकेआरला हरवले आहे. ४ पराभवांनंतर त्यांना विजय मिळाला.

ईडन गार्डन्स स्टेडियमवर बंगळुरूने १६.२ षटकांत १७५ धावांचे लक्ष्य गाठले. विराट कोहली ५९ धावा करून परतला. कर्णधार रजत पाटीदारने ३४ आणि फिल सॉल्टने ५६ धावा केल्या. कोलकाताकडून वरुण चक्रवर्तीने एक गडी बाद केला. नाणेफेक गमावून फलंदाजीला आल्यानंतर कोलकाताने ८ विकेट्स गमावून १७४ धावा केल्या. कर्णधार अजिंक्य रहाणेने (५६ धावा) अर्धशतक झळकावले. सुनील नरेनने



४४ धावा आणि अंगकृष रघुवंशीने ३० धावांचे योगदान दिले. बंगळुरूकडून कृणाल पंड्याने ३ विकेट्स घेतल्या. जोश हेझलवूडने २ विकेट घेतल्या. यश दयाल, रसिक सलाम आणि सुयश शर्मा यांनी प्रत्येकी एक बळी टिपले.

# राज्यपालांच्या हस्ते डॉ. हेडगेवार यांच्यावरील जीवनचरित्राचे प्रकाशन

- राज्यपाल राधाकृष्णन : डॉ. हेडगेवार यांचा एकतेचा संदेश अधिक प्रासंगिक
- काही राज्यात फुटीरतावादी प्रवृत्ती कार्यरत

**मुंबई, दि.२२ मार्च**

फुटीरतावादी प्रवृत्ती आजही देशाच्या काही राज्यांमध्ये सक्रिय असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ केशव बळीराम हेडगेवार यांचा एकतेचा संदेश आज पूर्वीपेक्षाही अधिक प्रासंगिक आहे असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज येथे केले.



राज्यपाल राधाकृष्णन यांच्या हस्ते शनिवारी (दि. २२ मार्च) डॉ. हेडगेवार यांच्यावरील जीवन चरित्राचे राजभवन, मुंबई येथे प्रकाशन संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.ब्रिटिश भारतीय युवा लेखक सचिन नंदा यांनी 'हेडगेवार : अ डेफिनिटिव्ह बायोग्राफी' या इंग्रजी चरित्रात्मक ग्रंथाचे लेखन केले आहे.आपसात एकी नसल्याम ुळे अवघ्या काही हजार ब्रिटिशांनी भारतावर अनेक दशके राज्य केले असे सांगून फुटीरतेमुळे महाराणा प्रताप यांना देखील पराभव पाहावा लागला होता, मात्र छत्रपती शिवाजी महाराज अश्या फुटीर प्रवृत्तींना पुरून उरले असे राज्यपालांनी सांगितले.परकीय शासकांमुळे भारत एकसंध राष्ट्र झाले असे चुकीचे दवे केले जातात असे सांगून सम्राट अशोक यांच्या काळात भारत कितीतरी दूरपर्यंत जोडला गेला होता असे राज्यपालांनी सांगितले.

सांस्कृतिक व अध्यात्मिक दृष्ट्या भारत नेहमीच एक राष्ट्र होते असे त्यांनी सांगितले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी आपले नाते सांगताना संघाने देशासाठी निस्वार्थपणे काम करणारे हजारो स्वयंसेवक घडवले व आज संघ जगातील सर्वात मोठे राष्ट्रीय संघटन झाले आहे असे राज्यपालांनी सांगितले. यावेळी लेखक सचिन नंदा यांनी भावी काळात डॉ हेडगेवार हे जागतिक स्तरावचे आदर्श नायक असतील असे सांगितले. आपण लिहिलेले चरित्र हेडगेवारांचे विचार किंवा 'हेडगेवारवाद' समजण्यास मदत करेल असे त्यांनी सांगितले. प्रकाशन सोहळ्याला एशियन पेंट्सचे प्रवर्तक जलज दाणी, आवादा ग्रुपचे अध्यक्ष विनीत मित्तल, मोहित डायमंड्सचे व्यवस्थापकीय संचालक मोहित मेहता, लेखक सचिन नंदा, एनएसईचे प्रमुख डॉ आशिषकुमार चौहान, रवींद्र संघवी, मिलिंद घुमरे आणि इतर निमंत्रित उपस्थित होते. समीर कोपीकर यांनी आभारप्रदर्शन केले.

# न्या. यशवंत वर्मा प्रकरणी सुप्रीम कोर्टात अहवाल सादर

**निवड मंडळ घेणार कारवाईबाबत निर्णय**

◆ **नवी दिल्ली, २२ मार्च**

न्या. यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी रोख रक्कम आढळली होती. याप्रकरणाचा तपास करणारे दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती डी.के. उपाध्याय यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना यांच्याकडे अहवाल सादर केला आहे.

न्या. यशवंत वर्मा यांच्या लुटियन्स दिल्ली या शासकीय निवासस्थानीहोळीच्या दिवशी रात्री ११.३५ च्या सुमारास आग लागली होती. माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन विभागाने घटनास्थळी पोहचून आग विझवली. यादरम्यान रोख रक्कम आढळूनआली. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी वक्तव्य जारी करीत, दिल्ली उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींनी या प्रकरणाची इन हाऊस चौकशी सुरू केली असून, न्या. वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदलीचा प्रस्तावही करण्यात आल्याचे सांगितले. (वृत्तसंस्था)

### निवड मंडळ करणार तपासणी

न्यायमूर्ती डी.के. उपाध्याय यांनी सादर केलेल्या अहवालाची सर्वोच्च न्यायालयाचे निवड मंडळ तपासणी करणारआहे. अहवालाच्या तपासणीनंतर पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

### 'चुकीची माहिती पसरविली'

दरम्यान, न्या. यशवंत वर्मा यांनी वक्तव्य जारी करीत, माझ्या निवासस्थानी घडलेल्या घटनेवर चुकीची माहिती आणिअफवा पसरविली असल्याचे म्हटले आहे.

# भारतीय भूमीवर बेकायदेशीर ताबा खपवून घेणार नाही

**लडाखमधील चीनच्या दोन नवीन काऊंटीवरून भारताने सुनावले**

**नवी दिल्ली, २२ मार्च**

चीनने लडाखला लागून असलेल्या सीमावर्ती भागात दोन नवीन काऊंटी स्थापन केल्याची घोषणा केली. या काऊंटीचा काही भाग भारताच्या लडाख केंद्रशासित प्रदेशात येतो. चीनच्या या घोषणेवर भारताने तीव्र आक्षेप नोंदवला. राजनैतिक माध्यम ातूननिषेध नोंदवत भारतीय भूमीवर बेकायदेशीर ताबा खपवून घेणार नसल्याचे चीनला सुनावले, अशी माहिती परराष्ट्रव्यवहार राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह यांनी दिली.

लोकसभेत एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात कीर्ती वर्धन सिंह म्हणाले, चीनने दोन नवीन काऊंटी स्थापन केल्याची भारताला माहिती आहे, ज्याचा काही भाग लडाखमध्ये येतो.भारताने सीमा क्षेत्रातील भारतीय भूभागावर चीनचा बेकायदेशीर ताबा कधीही मान्य केलेला नाही. नवीन काऊंटी स्थापन केल्याने या क्षेत्रावरील भारताच्या सार्वभौमत्वाबाबत दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण भूमिकेवर कोणताही परिणाम होणार नाही तसेच चीनच्या बेकायदेशीरआणि जबरदस्तीने मि ळवलेल्या ताब्याला वैध मानले जाणार नाही. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे यासंदर्भात तीव्र आक्षेप नोंदवला आहे. केंद्र सरकार सीमा भागांच्या विकासासाठी पायाभूत सुविधांच्या सुधारणांसाठी काळजीपूर्वक आणि विशेष लक्ष देत आहे; जेणेकरून या भागांचा आर्थिक विकास सुलभ होईल आणि भारताच्या धोरणात्मक आणि सुरक्षेबाबतच्या आवश्यकता पूर्ण होतील.

सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## रोखठोक

दिनेश गुणे

# अपुऱ्या वेळेचा अवघड पसारा...

विधिनियम किंवा कायदे करणे हे राज्याच्या विधिमंडळांचे प्रमुख कार्य असतेच, पण लोकशाही राष्ट्रात संसदीय शासनपद्धती स्वीकारलेली असल्याने सरकार बनविणे, सरकारला योग्य प्रकारे वागायला लावणे व प्रसंगी सरकार बदलणे, सरकारच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, प्रसंगी सरकारला जाब विचारणे, हेदेखील विधिमंडळांचे कर्तव्य असते. राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी सर्वांगीण नियोजनाचा, म्हणजे राज्याच्या अर्थव्यवहारांचा विचारही विधिमंडळांस करावा लागतो. राज्यात नवे कर बसविणे किंवा कररचनेत गरजेनुसार बदल करणे, अर्थसंकल्प मंजूर करणे, आणि विधिमंडळाने संमत केल्याप्रमाणे सरकारकडून आर्थिक शिस्त पाळली जाते किंवा नाही याची दक्षता घेणे हे कामदेखील विधिमंडळ करते. अशी विविधांगी कामे विधिमंडळास पार पाडावयाची असल्याने विधिमंडळाच्या सदस्यांस काही वैधानिक अधिकार बहाल करण्यात आले आहेत. जनतेच्या व राज्याच्या हितासाठी वापरावयाच्या या अधिकारांस वैधानिक आयुधे असेही म्हटले जाते. लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, स्थगन प्रस्ताव, अविश्वास प्रस्ताव, अन्य अनेक प्रकारचे प्रस्ताव, अल्पकालीन चर्चा आदी आयुधांचा यामध्ये समावेश असतो. या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राच्या विधिमंडळाचा इतिहास देदीप्यमान म्हणता येईल असा चमकदार ठरतो. या विधिमंडळाच्या इतिहासातील कामकाजाचा मागोवा घेतला, तर या विधिमंडळाने संमत केलेले अनेक महत्त्वाचे कायदे केवळ क्रांतिकारी नव्हेत, तर देशातील अन्य राज्यांसाठी पथदर्शी व मार्गदर्शक ठरले असून रोजगार हमी कायदा, जलसंधारण कायदा, गलिच्छ वस्ती निर्मूलन, प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन, व्यवसाय कर कायदा, माहितीचा अधिकार कायदा, अशा सुमारे २० वेगवेगळ्या कायद्यांनी विविध राज्यांना सुशासनासाठी मार्गदर्शनाची पायाभरणी केली आहे. हरकतीचे मुद्दे, निकडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावरील प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, शून्य प्रहरातील विशेष उल्लेख, अल्पकालीन चर्चा, अंतिम आठवडा प्रस्ताव, अनियत दिन प्रस्ताव, शासकीय व अशासकीय ठराव, वैधानिक प्रस्ताव, अशासकीय कामकाज, शासकीय व अशासकीय विधेयके, अध्यादेश, संविधान दुरुस्तीचे प्रस्ताव, चर्चा व संमती, अर्थसंकल्प, लोकलेखा हिशेब, वार्षिक योजना, राज्याच्या आर्थिक स्थितीचा आढावा आणि भविष्यकालीन कार्यक्रमांच्या अंमलबजावणीकरिता अंदाजपत्रक तयार करणे. समाजातील विविध घटकांकरिता योजना आखणे व त्या राबविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतुदी करणे, अशी अनेक कामे विधिमंडळाच्या अधिवेशनकाळात दोन्ही सभागृहांस करावी लागतात. कारण, विधिमंडळे ही जनतेच्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब असते आणि जनतेच्या या अपेक्षा साकार करण्याकरिता आखली जाणारी सार्वजनिक धोरणे ही जनतेच्या आकांक्षांशी अनुरूप अशीच असतील यावरही विधिमंडळाचा कटाक्ष असावा लागतो.

सध्या महाराष्ट्राच्या विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्यामुळे व आणखी काही दिवसांत अधिवेशनाचे सूप वाजणार असल्याने, गेल्या ३ मार्चपासून सुरू झालेल्या या अधिवेशनाचे प्रतिबिंब वरील विवेचनाच्या आरशात दिसते का, याचा शोध येत्या आठवड्यात सुरू होईल. थोडक्यात, नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळ अधिवेशनात विविध वैधानिक आयुधांचा कसा वापर झाला, जनतेचे प्रतिनिधी आणि राज्याच्या एकूण कारभाराचे विश्वस्त म्हणून सभागृहाच्या कामकाजात सहभागी झालेल्या लोकप्रतिनिधींना जनतेच्या आशाआकांक्षा सभागृहात उमटविण्यात किती यश किंवा अपयश आले, राज्याच्या हिताच्या कोणत्या नव्या योजना सभागृहातील विविध आयुधे व नियमांद्वारे अमलात आल्या, याचीही चर्चा होईल. अलिकडे राज्याच्या कामकाजाच्या विस्तारित आणि गुंतागुंतीच्या स्वरूपामुळे संसद किंवा विधिमंडळे प्रशासनाची छाननी परिणामकारकपणे करू शकत नाहीत, असे म्हटले जाते. त्यांच्यापुढे येणाऱ्या गुंतागुंतीच्या, प्रशासकीय, वैधानिक आणि शासकीय समस्यांसाठी ही सभागृहे पुरेसा वेळ देऊ शकत नाहीत व सभागृहापुढे कामकाजासाठी उपलब्ध असलेला मर्यादित वेळ विधिविषयक प्रस्ताव विचारात घेण्यात व कार्यसूचीवरील नियमित बाबी निकालात काढण्यातच खर्च होतो, असेही सांगितले जाते. विधिमंडळासमोर येणारी शासनाची पुष्कळशी वित्तीय आणि अन्वेषक स्वरूपाची कामे तांत्रिक स्वरूपाची असल्याने त्यावर अर्थपूर्ण रीतीने चर्चा व विचार करणे संपूर्ण सभागृहास कठीण जाते. विधिविधान, अशासकीय सदस्यांची विधेयके यांसह कामकाजाचा बराचसा भाग तसेच शिक्षण, समाजकल्याण, आरोग्य आदी बाबींवरील चर्चादेखील (या मर्यादित वेळात) व्यवस्थितरीत्या पार पाडणे शक्य होत नसल्याने त्यास उपयुक्त पर्याय म्हणून समिती पद्धतीचा अंगीकार विधिमंडळात करण्यात येतो, असे विधिमंडळ सचिवालयाने प्रसिद्ध केलेल्या विधिमंडळाच्या संक्षिप्त इतिहासात म्हटले आहे. राज्यातील जनतेस विधिमंडळाच्या कामकाजाची व उपलब्ध असलेल्या वेळेतील कार्यपद्धतीची माहिती करून देण्यासाठी विधिमंडळ सचिवालयाने त्यांच्या महाजालावर प्रसिद्ध केलेली ही माहिती खूपच उपयुक्त असून अधिवेशनकाळीन प्रत्यक्ष कामकाज आणि जनतेच्या अपेक्षांना अनुसरून अपेक्षित असलेले कामकाज यांचा तुलनात्मक आढावा घेण्यासाठीही महत्त्वाची ठरत असते. अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर विविध चर्चा व विचारमंचावर विधिमंडळाच्या एकूण कामकाजाचा आढावा घेतानादेखील याचीच तुलना प्रामुख्याने होणार आहे. म्हणूनच, गेल्या सुमारे तीन आठवड्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दररोजच्या कामकाजाचा ढोबळ आढावा घेत केवळ एक तुलना करण्याकरिता नमनाला घातलेले हे घडाभर तेल निश्चितच उपयुक्त ठरेल. अधिवेशनकाळात कामकाजाकरिता उपलब्ध असलेला वेळ मर्यादित असतो, त्यामुळे विधिमंडळांना प्रशासनाची व्यवस्थित छाननी करण्यासाठी पुरेसा वेळ देता येत नाही किंवा त्यावर अर्थपूर्ण व परिणामकारक चर्चा करणे शक्य होत नाही असे सांगण्यात येत असताना, अधिवेशनकाळातील कामकाजाकरिता उपलब्ध असलेल्या मर्यादित वेळेचा उपयोग सभागृहाने कसा केला, हे समजून घेण्यासाठी या संक्षिप्त इतिहासाचे महत्त्वाचे मार्गदर्शन होणार असल्याने, समालोचने किंवा आढावा घेताना कोणतीही



टिप्पणी टाळणे योग्य ठरेल.

त्यासाठी, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पर्वसंध्येपासूनच्या घटनाक्रमाचा मागोवा घ्यावा लागेल. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळातील सत्ताधारी आणि विरोधकांना चहापानास निमंत्रित करण्याची प्रथा आहे. हा विधिमंडळाच्या कामकाजाचा भाग नसला, तरी त्या चहापानाच्या निमित्ताने अधिवेशनकाळातील सरकार आणि विरोधकांच्या भूमिकांची दिशा स्पष्ट होत असते. अलिकडे चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याची विरोधकांची प्रथा असल्याने कामकाजाच्या दरम्यान सत्ताधारी आणि विरोधक हे राज्यातील अनेक जनहिताच्या प्रश्नांवर जोरदार आक्रमकपणे परस्परांसमोर शड्डू ठोकणार असे संकेत मिळत असतात. या प्रथेप्रमाणे, गेल्या २ मार्च रोजी मुख्यमंत्र्यांनी विरोधकांसमवेत चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला आणि सरकारला अधिवेशनकाळात घेरण्याच्या अनेक मुद्यांची यादी देत विरोधकांनी चहापानावर बहिष्कार घातला. हेदेखील अलिकडच्या प्रथेप्रमाणेच पार पडले. अधिवेशनाचे वारे वाहू लागलेले असतानाच, पुणे येथे राज्य परिवहन महामंडळाच्या स्वारगेट स्थानकात महिलेवर झालेल्या बलात्काराच्या प्रकारामुळे राज्य सुन्न झाले होते. बीड जिल्ह्यातील अनेक घडामोडींमुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्नही अधोरेखित झाला होता आणि दोन मंत्र्याची आसने डळमळीत झाली होती. सत्तारूढ महायुतीमधील वरिष्ठ नेत्यांमधील विसंवादाच्या बातम्या पेरल्या जात होत्या. अशा काही प्रश्नांवरून अधिवेशनकाळात उपलब्ध असलेला मर्यादित वेळ वैधानिक आयुधांचा वापर करून सत्कारणी लावण्याचा विरोधकांचा इरादा त्या दिवशी स्पष्ट झाला होता. चहापानाच्या दिवशीच धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे या मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीने जोर धरल्याने, यातून मार्ग काढण्याची कसरत मुख्यमंत्री फडणवीस यांनाच करावी लागणार हे स्पष्ट झाले होते. हे दोघेही महायुतीमधीलराष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून मंत्रिपद भूषवत असले, तरी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी अजित पवार यांनी फेटाळल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस कोणती भूमिका घेतात याकडे विरोधकांचे आणि जनतेचेही लक्ष लागलेलेच होते. थोडक्यात, कोणत्याही पेचप्रसंगात फडणवीस हेच महायुतीचे संकटमोचक असल्याचे वेळोवेळी सिद्ध झाले असल्याने, सरकारातील मंत्र्यांवरील वादग्रस्त आरोपांचे प्रतिबिंब सभागृहात उमटेल, तेव्हा सभागृहासमोर असलेल्या मर्यादित वेळेचा वापर करून त्यावर तोडगा काढण्याचे आव्हानही फडणवीस यांच्यासमोरच उभे केले गेले.

मुंडे यांच्या राजीनाम्याचा निर्णय घेऊन फडणवीस यांनी आपली संकटमोचकाची भूमिका यशस्वीपणे पार पाडली आणि अधिवेशनाचा दिवस उजाडला. कामकाजाकरिता असलेल्या मर्यादित वेळेचा परिणामकारक वापर करणे ही सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधकांचीही जबाबदारी असते. त्यामुळे, विरोधी बाकांवर बसलेल्या आपल्या मतदारसंघाच्या लोकप्रतिनिधींकडेही जनतेचे डोळे लागलेले असतात. कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी विरोधकांनी विधान भवनाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन करून सभागृहाचे कामकाजच रोखून धरले. त्याच दरम्यान, समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी औरंगजेबाचे महिमामंडन करणारे वक्तव्य केल्याने त्याचे पडसाद कामकाजात उमटणेही साहजिकच होते. त्यामुळे सत्ताधारी पक्षाचे सदस्यही सभागहात आक्रमक झाले आणि सभागृहाचे कामकाज रोखण्याचा प्रयत्न करीत जोरदार घोषणाबाजी केल्यानंतर संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मांडलेला अबू आझमी यांच्या निलंबनाचा प्रस्ताव विधानसभेत पारित झाला. त्यापाठोपाठ भाजपच्या एका मंत्र्यावरील कथित आरोपांचा आधार घेत पुन्हा विरोधकांनी नवा आक्रमकपणा धारण केला. कामकाजातील मर्यादित वेळेच्या परिणामकारक उपयोग कशा रीतीने करता येईल, याची चिंता साहजिकच यामुळे अधोरेखित झाली असेल यात शंका नाही.

याच गदारोळात विरोधकांच्या हाती आलेल्या आणखीही काही आयत्या मुद्द्यांवरून सभागृहात माजलेला गदारोळ हे पहिल्या आठवड्यातील कामकाजाचे वैशिष्ट्य ठरले. भाषेच्या मुद्यावरून सभागृहाबाहेर झालेल्या एका टिप्पणीचा धागा पकडत विरोधकांनी सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना संकटमोचकाची भूमिका वठविणे भाग पडले. याच दरम्यान सभागृहात झालेल्या कामकाजाच्या वेळेचा परिणामकारक वापर करून सरकारने राज्यातील काही शहरे व ठिकठिकाणच्या वाहतूक कोंडी, पाणी समस्येवर तोडगा काढण्याच्या उपाययोजना जाहीर केल्या. राज्यातील सामान्य नागरिकांच्या आर्थिक फसवणुकीचे प्रकार अलिकडे चिंताजनकरीत्या वाढले असून हजारो कोटींच्या फसवणुकीमुळे सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. टोरेस नावाच्या कंपनीकडून झालेल्या फसवणुकीचा प्रकार उजेडात आल्यानंतर अशा गुन्ह्यांच्या तपासासाठी राज्यात आर्थिक गुन्हे शोधून त्याचा छडा लावणारी गुप्तचर यंत्रणा स्थापन करण्याची घोषणा सरकारकडून करण्यात आली आणि आपल्या आशाआकांक्षांचे प्रतिबिंब पाहावयास मिळाल्याच्या भावनेने अनेक सामान्यजन सुखावले. शेतकऱ्यांच्या पडीक जमिनी त्यांना परत मिळण्याचा मार्ग मोकळा करणारे विधेयक मंजूर झाल्याने, कामकाजाचा वेळ परिणामकारकपणे सत्कारणी लागला.

कामकाजाच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिल्या दिवसाकडे उभ्या राज्याचे आणि देशाचेही लक्ष लागले होते. महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीचे वास्तव उलगडणारा आर्थिक पाहणी अहवालातून पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, रोजगार आणि सामाजिक विकास आदी महत्त्वाच्या क्षेत्रांचे वास्तव अगोदरच स्पष्ट झाल्याने त्यांना चालना देणारे काही उपाय अर्थसंकल्पात उमटावेत या अपेक्षेचे प्रतिबिंब अर्थसंकल्पातील पंचसूत्रीमधून उमटल्याने, सत्ताधारी पक्षाने अधिवेशनकाळातील मर्यादित वेळेचा नेमका परिणामकारक वापर केल्याची भावना त्या दिवशी राज्यात उमटलेली पाहावयास मिळाली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरलेल्या समृद्धी महामार्गापाठोपाठ विदर्भापासून गोव्याच्या सीमेपर्यंतच्या भागास जोडणाऱ्या शक्तिपीठ महामार्गातून महाराष्ट्राच्या औद्योगिक, सांस्कृतिक विकासास चालना मिळणार असल्याचा फडणवीस सरकारचा विश्वास आहे. या प्रकल्पाच्या विरोधात वातावरण निर्माण करून त्यामध्ये अडथळे आणण्याचे अनेक प्रयत्न राज्यात मार्गावरील काही प्रस्तावित ठिकाणी झाले. मात्र, या प्रकल्पासाठी अनुकूल जनमत निर्माण करण्याकरिता सरकारने सकारात्मक भूमिका घेतल्याचे अधिवेशनात स्पष्ट झाले. जनतेच्या सहकार्यातूनच हा महामार्ग उभा राहील, अशी निःसंदिग्ध ग्वाही देणाऱ्या फडणवीस यांच्या समन्वयाच्या भूमिकेमुळे सत्ताधाऱ्यांना एका आव्हानास सामोरे जाण्याचे बळ मिळाले. सरकारी तिजोरीचे नुकसान करणाऱ्या कोणत्याही योजनांना पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट संकेत देणारा मुख्यमंत्र्यांचा निर्णयही याच दरम्यान चर्चेचा विषय ठरला. एस. टी. महामंडळाच्या ताफ्यात नव्या बसगाड्या भाडेतत्त्वावर घेण्यासाठी महामंडळाने घेतलेल्या निर्णयामुळे सुमारे १७०० कोटींचे नुकसान होणार असल्याची बाब उघड झाल्यानंतर या निर्णयास स्थगिती देऊन या प्रकाराची चौकशी करण्याचाआदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला, तेव्हा फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात बेबनाव असल्याच्या अगोदरच्याच चर्चेला पुन्हा नवे धुमारे फुटले. पण स्थगितीच्या या निर्णयाचे ठाम समर्थन करून मुख्यमंत्र्यांनी दिलेला संदेश सत्ताधाऱ्यांच्या कारभारासाठी पुरेसा सूचक ठरला.

घोषणाबाजी, आक्रमक आंदोलने, कामकाजात अडथळे आणणे, आरोप- प्रत्यारोपांचा गदारोळ या सर्व वातावरणातून वाचलेल्या मर्यादित वेळेचा परिणामकारक सदुपयोग करण्याच्या आव्हानास सरकार समर्थपणे सामोरे गेले, असे या अधिवेशनातील काही निर्णयांवरून म्हणता येईल. पण सत्तारूढ बाजूवरील आमदार, मंत्र्यांवर झालेले आरोप, राजीनामा घेण्याची नामुष्की अशा काही बाबींना सामोरे जाताना, फडणवीस यांच्या क्षमतेचाच कस लागला आहे. एका बाजूला सरकारला अडचणीत आणण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांस बळ देणाऱ्या घडामोडी आणि दुसरीकडे यातून सावरण्याकरिता फडणवीस यांच्यावर विसंबून राहण्याचा सत्ताधाऱ्यांचा विश्वास असे चित्र राज्यातील जनतेने अनुभवले. अकेला देवेंद्र क्या करेगा, अशा शब्दांत मागे एकदा खासदार सुप्रिया सुळे यांनी फडणवीस यांची खिल्ली उडविली होती. आपल्या क्षमता सिद्ध करून फडणवीस यांनी त्यास चोख उत्तर दिल्यामुळेच, अधिवेशनाचा मर्यादित काळ परिणामकारकपणे सत्कारणी लागला, अशा समाधानाचा सुस्कारा टाकण्याची संधी सत्ताधाऱ्यांना साधता आली आहे.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### पालावरची शाळा एक आदर्श उपक्रम




नुकतीच देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींची एक उत्तम मुलाखत बघण्यात आली. त्यांच्या जीवनात संघ आणि संघ विचारांचे स्थान आणि संघामुळे त्यांच्या आयुष्याला कसे वळण लागले याबद्दल भरभरून बोलताना त्यांनी संघाच्या विचारांवर देशात चालत असलेल्या विविध संस्थांविषयी सांगितले. सेवाभारती, आरोग्यभारती, वनवासी कल्याण आश्रम असे शेकडो प्रकल्प देशभरात आणि परदेशात देखील चालविले जातात आणि त्यायोगे देशवासीयांची सेवा केली जाते. सेवा म्हणजे केवळ फुकट खायला घालणे किंवा दे रे हरी पलंगावरी अशा सवयी लावल्या जात नाहीत तर हे प्रकल्प राबवून समाजातील तळागाळातील लोकांच्या समस्यांचे निराकरण करणे, त्यांना स्वच्छतेचे महत्त्व समजावून सांगत ती कशी पाळावी, आरोग्याची काळजी कशी घ्यावी, त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे, त्यांना शिकवून, चांगले संस्कार कसे होतील आणि त्यांच्यातील दुर्गुण, वाईट सवयी, कुप्रथा कशा कमी होतील यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आणि त्यायोगे चारित्र्यवान व्यक्तीची निर्मिती करणे अशी विविध प्रकारची कामे ही मंडळी या माध्यमातून करत आहेत.

याविषयी लिहिण्याचे मुख्य कारण म्हणजे असेच सेवाकार्य करत असलेल्या संस्थेच्या एका कार्यक्रमात मला प्रमुख अतिथी म्हणून जाण्याचा योग आला. स्व. दीपम भाई स्मरणार्थ पालावरची शाळेचा सांस्कृतिक व क्रीडा महोत्सव असा हा कार्यक्रम होता. आता सगळ्यांना प्रश्न पडेल की पालावरची शाळा म्हणजे काय? तर गेल्या आठ दहा वर्षांपासून आमच्या गोंदिया शहरात ही पालावरची शाळा सुरू आहे. गोंदिया शहरापासून जरा बाहेर एक अशी वस्ती आहे जिथे कचरा गोळा करणारे आणि छोटी मोठी अशी कामे करून पोट भरणारे लोक वास्तव्य करतात. शिक्षणाचा, स्वच्छतेचा अभाव असल्यामुळे पोट भरण्यासाठी चुकीचे मार्ग अवलंबणारा हा समाज.त्यांच्या अस्वच्छ राहणीमुळे देशातील इतर समाजाकडून जरा दूरवर ठेवण्यात आलेला समाज. शिक्षणाच्या अभावामुळे मुलींच्या बाबतीत जागरूक नसल्याने अगदी कोवळ्या वयात त्यांच्या वर मातृत्वाचं ओझं लादणारा समाज.अशा समाजातील मुलांना शिकवण्याचे, त्यांना स्वच्छता आणि शिक्षणाचे धडे देण्याचे, त्यांच्यावर चांगले संस्कार घडवण्याचे महत्कार्य या पालावरची शाळेच्या माध्यमातून गेल्या आठ दहा वर्षांपासून घडत आहे.

पूर्वी त्या वस्तीत स्ट्रीट लाईटच्या उजेडात भरणारी ही शाळा आता एका शेडखाली भरते. अशा १४ शाळा गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात भटक्या आणि विमुक्त कल्याणकारी परिषद या स्वयंसेवी संस्थेकडून चालवल्या जातात. त्यातील गोंदियाची ही शाळा आदर्श शाळा आहे.

या शाळेचं पालकत्व ज्यांनी घेतलंय ते म्हणजेराष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीत तयार झालेलेप्रशांत बोरसे आणि निर्मल बोरसे हे दाम्पत्य. इथे वस्तीतल्या मुलामुलींना शिकवले जाते. त्यासाठी शहरातील काही शिक्षक आपली निःशुल्क सेवा देतात तर काहींना समाजाच्या माध्यमातून मानधन दिले जाते. या शाळेला भेट दिली असता प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे त्यांच्यातली शिस्त. सामाजिक पृष्ठभूमी कशीही असली तरी त्यांच्यावर जे संस्कार केले जात आहेत ते खरंच वाखाणण्याजोगे आहेत. या शाळेतील मुलींना राष्ट्र सेविका समितीच्या प्रशिक्षण वर्गाला देखील पाठवण्यात येते. त्यामुळे त्या साहजिकच चांगल्या संस्कारांचं बाळकडू पिऊनच तिथून परत येतात. तसं बघितल्यास या शिक्षणामुळे वस्तीतल्या लोकांमध्ये अगदी आमूलाग्र बदल घडून आलाय, असं म्हणता येणार नाही. चांगल्या गोष्टी घडून यायला वेळ तर लागणारच. परंतु जर पुढची पिढी सुधरत असेल, संस्कारशील बनत असेल, देशधर्महित जाणणारी बनत असेल तर नक्कीच त्यांचे भविष्य उज्ज्वल आहे, अशी आशा आपण करू शकतो.

**वीणा आचार्य**/९४२३१७५७१५

### शिक्षकांनी नवोपक्रमशील व्हावे

शिक्षक म्हटलं तर हे विद्यार्थिप्रिय असतात विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध व आनंदी बनविण्याकरिता सतत धडपड करीत असतात. परंतु आपले शिक्षण हे फक्त माहिती देणारे निवेदनात्मक स्वरूपाचे झालेले आहे. त्यामुळे शिक्षकांना साचेबंद चाकोरीत राहून विद्यार्थ्यांना शिकवावे लागत आहे.आपल्या शिक्षकांच्या सर्जनशीलतेचा उपयोग विद्यार्थ्यांपर्यंत पूर्णतः पोहोचत नाही. शिक्षकाला आपली सर्जनशीलता, नावीन्यता मुलांपर्यंत पोहचवता येत नाही व व्यक्तही करता येत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये दर्जेदार शिक्षणाचा अभाव दिसतो आहे. परिणामी विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा दर्जा दिवसेंदिवस ढासळत चाललेला आहे. जर शिक्षक समृद्ध असेल तर विद्यार्थी सुद्धा समृद्ध घडतील .

नेहमी ज्ञानाची तहान असते तो शिक्षक...
नेहमी विद्यार्थ्यांची प्रगती पाहतो तो शिक्षक...
नेहमी ज्ञान अंजनाने प्रगल्भ करतो तो शिक्षक...
नेहमी घडतो आणि घडवितो तो शिक्षक...

शिक्षकांनी नेहमी नवोपक्रमशील असावयास पाहिजे तरच तो उत्कृष्ट विद्यार्थी घडवेल. आपल्या सर्जनशीलतेचा वापर करून नवोपक्रम राबविला पाहिजे.जेणेकरून विद्यार्थ्यांना नवचैतन्य प्राप्त होईल आणि शिक्षणामध्ये नावीन्यता येऊन विद्यार्थ्यांना शिक्षणात रुची निर्माण होईल. नवोपक्रमामध्ये नवनवीन कल्पनांचा वापर करून पारंपरिक पद्धतीला फाटा देत कुठेतरी वेगळ्या पद्धतीने विद्यार्थ्यांना व्यक्त होण्याची संधी यातून देता येईल. शिक्षक हा नवोपक्रमशील असेल तर नक्कीच तो यशस्वी सुद्धा होईल आणि तो नावारूपास येऊन कदाचित त्या नवोपक्रमशील शिक्षकाच्या नावाने त्यांच्या शाळेला ओळख मिळेल. त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवन पूर्णतः बदलून टाकण्याची ताकद या नवोपक्रमामध्ये असते.

एका शिक्षकाला काय पाहिजे तर त्याचे विद्यार्थी संस्कारक्षम घडवून ते बुद्धिवंत, कीर्तिवंत,ज्ञानवंत, गुणवंत होतील एवढी माफक अपेक्षाअसते. नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा जीवन प्रवास सुखकर होतो. शिक्षक विद्यार्थ्यांपर्यंत नवकल्पना पोहोचवतो तर विद्यार्थी या नवीन गोष्टी घेण्याच्या भूमिकेत आपल्याला दिसतो व यातून उत्तम असे यश संपादन करतो. या नवोपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये आनंद, उत्साह वाढतो. मी सुद्धा एक उपक्रमशील शिक्षक आहे आणि यातून मला विद्यार्थ्यांमधील झालेले बदल लक्षात घेता आले.

डोळ्यांनी बघितलेली गोष्ट काही काळ लक्षात राहते. स्वतः केलेले काम त्याच्या लवकर लक्षात येते. परंतु विद्यार्थ्यांना अनुभवातून दिलेले शिक्षण हे मात्र चिरकाल टिकते. विद्यार्थ्यांना आपल्याला मेरिटमध्ये आणायचे असेल तर त्याची तयारी आपल्याला सुरुवातीपासूनच करावी लागेल. विद्यार्थी घडविताना विद्यार्थी मेरिटमध्ये यावे हा हेतू न ठेवता तो कालपेक्षा आज किती जास्त शिकला हे जास्त महत्त्वाचे असते.

नवोपक्रमशील शिक्षकांना त्यांच्या कार्यात चालना मिळावी म्हणून महात्मा गांधी यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडताना नई तालीम मध्ये सांगितले आहे की शिक्षण विषय तत्त्वज्ञान हे विद्यार्थी व शिक्षक यामध्ये दुवा आहे. नवोपक्रमामध्ये शिक्षक आपले वेगळेपण टिकून ठेवू शकतो. आपल्या ठायी असलेल्या नवनवीन कल्पना त्याला कायम विद्यार्थिप्रिय आणि समाजप्रिय बनवितात. काही शाळा तर नवोपक्रमशील शिक्षकांच्या नावाने ओळखल्या जात आहेत. ही आपल्या शिक्षकांसाठी अभिमानाची गोष्ट आहे या गोष्टीचा आधार घेऊन मला असं वाटते की प्रत्येक शिक्षकांनी आपल्या शाळेत नवोपक्रम राबवावा. आणि आपल्या शाळेला एक नवीन ओळख या निमित्ताने देण्याची संधी प्राप्त झालेली आहे त्याचे सोने करून घ्यावे.

**सतीश न. गौळकार**/हिंगणघाट

### मंदिरांचे सरकारीकरण हिंदूंसाठी क्लेशकारक

हिंदू धर्मात मंदिरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतात अनेक प्राचीन मंदिरे आहेत, जी हजारो वर्षे श्रद्धेची केंद्रे राहिली आहेत. काही मंदिरे राजे-महाराजांनी बांधली, तर काहींचा जीर्णोद्धार झाला. नुकतेच ५०० वर्षे वादात अडकलेले श्रीराम मंदिर भव्य स्वरूपात उभारण्यात आले. मंदिरे ही केवळ धार्मिक स्थळे नसून, ती संस्कृतीचे जतन करणारी केंद्रे आहेत. तेथील चैतन्य भाविकांना मानसिक आणि आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रेरित करते. भारतातील आणि महाराष्ट्रातील अनेक मंदिरे विश्वस्त मंडळांकडे आहेत, तर काहींचे सरकारीकरण झाले आहे. मंदिरांमध्ये अधिक शिस्त, पारदर्शकता आणि सोयी-सुविधा असाव्यात आणि व्यवस्थापन उत्तम असावे या हेतूने मंदिरांचे सरकारीकरण केले गेले. मात्र, वस्तुस्थिती पाहता सरकारीकरण झालेल्या मंदिरांमध्ये भ्रष्टाचार वाढलेला दिसतो. परंपरागत धार्मिक प्रथा आणि परंपरांमध्ये हस्तक्षेप केला जातो, त्यामुळे भाविकांना विनाकारण त्रास सहन करावा लागतो.मंदिरांचे पावित्र्य आणि धार्मिक महत्त्व राखले गेले पाहिजे याकरिता खरं तर मंदिरे ही भाविकांच्या ताब्यात असावीत.या उलटसरकारी यंत्रणेला धार्मिक परंपरांशी काहीही देणे-घेणे नसते. उलटपक्षी, ती मंदिरांच्या संपत्तीचा गैरवापर करीत असल्याची अनेक उदाहरणे समोर आली आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मशील राजे होते. मुघलांच्या आक्रमणात अनेक मंदिरे उद्ध्वस्त झाली असताना, त्यांनी हिंदू मंदिरांचे जतन आणि जीर्णोद्धार केला. ते तुळजाभवानी देवीचे उपासक होते आणि तिच्या कृपेनेच स्वराज्य स्थापनेसाठी प्रेरित झाले होते. समर्थ रामदास स्वामींनी बलोपासनेसाठी अनेक ठिकाणी मारुतीची मंदिरे स्थापन केली.शिवाजी महाराजांच्या काळात मंदिरांना संपूर्ण धार्मिक स्वातंत्र्य होते. त्यांच्या प्रशासनाने मंदिरांच्या व्यवस्थापनात हस्तक्षेप केला नाही. छत्रपती संभाजी महाराज आणि नंतरच्या पेशव्यांनीही ही परंपरा चालू ठेवली. त्यामुळे त्या काळात मंदिरांमध्ये धार्मिक परंपरांचे काटेकोर पालन होत असे.सरकारने काही मंदिरांचे सरकारीकरण केले. त्यामागील प्रमुख कारणे मंदिरांच्या व्यवस्थापनातील भ्रष्टाचार रोखणे, भाविकांना अधिक सोयीसुविधा उपलब्ध करून देणे, धार्मिक स्थळांचे उत्तम व्यवस्थापन करणे ही होती. सरकारीकरणामुळे हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावतात. मंदिर व्यवस्थापन भाविकांकडे राहिले, तरच पारदर्शकता आणि पावित्र्य जपले जाऊ शकते.शेगाव येथील श्री गजानन महाराज मंदिर हे उत्तम व्यवस्थापनाचे उदाहरण आहे. येथे सेवेकरी भक्तिभावाने सेवा करतात.मंदिर स्वच्छ आणि सुव्यवस्थित ठेवले जाते.पैशांचा योग्य विनियोग होतो.भक्तांसाठी उत्तम सोयी-सुविधा पुरविल्या जातात. मंदिरांना सरकारीकरणातून वाचविण्यासाठी मंदिर महासंघाच्या चळवळींमध्ये सहभागी व्हा,मंदिरातील भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवावा,मंदिरे ही हिंदूंची धार्मिक केंद्रे व्हावीत यासाठी प्रयत्न करा.असे प्रयत्न केल्यावर मंदिरे ही भाविकांच्या ताब्यात राहिली तरच हिंदू संस्कृतीचे रक्षण होईल.

**माधवी पत्की**/नागपूर

### कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

हिंदू धर्म आणि त्याच्या सण-उत्सवांविषयी अलिकडच्या काळात जाणीवपूर्वक नकारात्मक वातावरण निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. विशेषतः हिंदू विचारधारेचा विरोध करणारे आणि हिंदूंच्या परंपरांवर टीका करणारे दुर्दैवाने हिंदूच अधिक आक्रमक असल्याचे प्रकर्षाने दिसून येते. यामुळे समाजात दिशाभूल आणि वैचारिक द्वेष वाढत आहे. हीच परिस्थिती 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणीला साजेशी आहे. स्वतःच्याच संस्कृतीवर हल्ला करून समाजाला अस्थिरतेच्या गर्तेत लोटणं हे या मानसिकतेचं मूळ आहे.

सण-उत्सवांवर अकारण टीका का होते तेच समजत नाही. हिंदू धर्माचे सण-उत्सव हे हजारो वर्षांच्या सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक आहेत. सामाजिक एकोपा आणि उत्साह यासाठी या सणांचं महत्त्व आहे. मात्र, अलिकडे हिंदूंचे सण मुस्लिमांना डिवचण्यासाठी साजरे होतात, असा अपप्रचार केला जात आहे. इतर धर्मांचे सण मोठ्या उत्साहात साजरे झाले, तर कुणालाही आक्षेप नसतो. मग हिंदूंच्या सणांवरच आक्षेप का घेतले जातात?हा विरोध निखळ अज्ञानाचा आणि द्वेषपूर्ण मानसिकतेचा नमुना आहे असेच म्हणावे लागेल. धार्मिक उत्सव आणि सामाजिक समस्या यांचा संबंध काय? हिंदू धर्मातील सण साजरे होणं आणि समाजातील आरोग्य, शिक्षण, महिला सुरक्षा यासारख्या अपयशांमध्ये कोणताही संबंध नाही. धार्मिक उत्सवांवर टीका करून समाजातील समस्या सुटणार नाहीत. सरकारच्या अपयशावर टीका करणं स्वाभाविक आहे, पण धार्मिक परंपरांना त्यात ओढणं हे हेतुपुरस्सर केलं जात आहे. खऱ्या प्रश्नांवरून लक्ष हटवण्यासाठी धार्मिक ध्रुवीकरणाचा वापर होतो आहे.लोकशाही देशात प्रत्येक व्यक्तीला आपली पक्षीय राजकीय भूमिका घेण्याचा अधिकार आहे. मात्र, ही राजकीय भूमिका हिंदुत्वाच्या आड येऊ नये.कोणाला मत द्यायचं, कोणत्या पक्षाला पाठिंबा द्यायचा हा वैयक्तिक प्रश्न आहे. पक्षीय राजकीय भूमिका घेताना हिंदू परंपरांवर आणि सणांवर टीका करणं हे हिंदू धर्माला हानी पोहोचवणारं आहे. आपला पक्ष आणि नेता यांचा आदर करणं स्वाभाविक आहे, पण त्यावरून 'भक्त' आणि 'अंधभक्त' अशी चर्चा करून बुद्धिभेद करणं हा समाज विघातक प्रयत्न आहे.

समाजातील प्रश्नांवर गंभीर चर्चा हवी, द्वेष नको शिवाय महाराष्ट्रातील आरोग्य, शिक्षण आणि महिला सुरक्षेतील समस्या नक्कीच गंभीर आहेत यात सुधारणा झाली पाहिजे यात शंका नाही. पण या समस्याचे आकडे देऊन आपण किती विद्वान आहोत आणि हे केवळ हिंदुत्वाची भूमिका घेतल्यामुळेच घडत आहे असे भासवायचे पण या समस्या कशामुळे निर्माण झाल्या आहेत याचा कधीच विचार करायचा नाही ही वस्तुस्थिती आहे. या समस्यांवर सरकारने उत्तरदायित्व स्वीकारूनउपाय शोधायला हवेत.परंतु धार्मिक परंपरांवर आरोप करून आणि हिंदू सणांना लक्ष्य करून समस्या सुटणार नाहीत.इतर धर्मीयांचे सण आनंदाने साजरे झाले, तर कुणालाही आक्षेप नसतो.मग हिंदू धर्माचे सण मात्र डोळ्यांत का खुपतात?स्वतःच्या संस्कृतीवर हल्ला करून समाजात तेढ निर्माण करणं हे खऱ्या समस्यांवरून लक्ष हटवण्याचं साधन आहे.समाजाच्या खऱ्या गरजांवर लक्ष केंद्रित केलं पाहिजे. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' ही परिस्थिती टाळायची असेल, तर समाजाने खऱ्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करायला हवं, दिशाभूल करणाऱ्या आरोपांवर नव्हे.

**संतोष वाघोलीकर**/९४०५२४५९९७

### देशभक्तिमय, ज्ञानसंपन्न करणारी अविस्मरणीय सफर अंदमानची

मागच्या वर्षी स्वातंत्र्यवीर सावरकरांवरील एक सिनेमा मी बघितला होता. त्या सिनेमातून त्यांच्या जीवन कार्याबद्दलची संपूर्ण माहिती मांडली होती. मनात विचार आला की एकदा तरी अंदमानची सफर लवकरात लवकर करावी. त्याच दरम्यान खाजगी ट्रॅव्हल्सच्या माध्यमातून संगीतमय आणि ज्ञानमय अंदमान टूरची माहिती मिळाली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी २६ फेब्रुवारीला असते. त्यानिमित्ताने अंदमानचा टूर २४ फेब्रुवारी २०२५ ते १ मार्च २०२५ पर्यंत आयोजित केला होता. टूर पोर्ट ब्लेअर ते पोर्ट ब्लेअर होता. चेन्नई मार्गे सर्व प्रवासी पोर्ट ब्लेअरला विमानाने २४ फेब्रुवारीला पोहोचलो. विमानतळाच्या समोरच स्वातंत्र्यवीर सावरकरांचा भव्य पुतळा आहे. त्यांना मानवंदना करून आम्ही



आमच्या हॉटेलकडे रवाना झालो.

तिसऱ्या दिवशी म्हणजे २६ फेब्रुवारी रोजी स्वा. सावरकरांचा पुण्यस्मरण दिन होता. त्या दिवशी सेल्युलर जेलमध्ये अनेक जण त्यांना आदरांजली अर्पण करण्याकरिता सकाळपासून जमले होते. आमच्या ग्रुपच्या सर्व प्रवाशांनी पांढरे आणि भगवी पारंपरिक वस्त्रे परिधान करून जेलच्या परिसरात सर्व जण एकत्रित जमलो होतो. जेलच्या समोर सर्वांनी ग्रुप फोटो काढले. आम्ही स्वा. सावरकरांना आदरांजली वाहण्याकरिता आत प्रवेश केला. पहिले जेलच्या आतील ऐतिहासिक म्युझियम पहिले. त्यात फोटो आणि माहितीद्वारे संपूर्ण स्वातंत्र्याचा इतिहास आणि जेलची, स्वातंत्र्यवीर सावरकरांची आणि क्रांतिकारकांची माहिती मिळाली. त्यानंतर एका अनुभवी गाईडने संपूर्ण जेलचा इतिहास व क्रांतिकारकांची माहिती दिली. हे सर्व पाहताना आणि ऐकताना सर्वांचे डोळे पाणावले होते. त्यानंतर गाईडने सावरकरांची खोली दाखवण्याकरिता जेलच्या दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग दाखवला. जेलमध्ये एकूण ६९८ अगदी लहान लहान खोल्या आहेत. त्यामुळेच या जेलचे नाव सेल्युलर जेल असे ठेवण्यात आले होते. एक सेल म्हणजे एक लहान खोली. या खोल्यांची साखळी म्हणजे सेल्युलर असे त्या गाईडने समजावून सांगितले.

शेवटची दुसऱ्या मजल्यावरील खोली सावरकरांची होती. सर्वांनी त्यांच्या खोलीत जाऊन डोळ्यामध्ये खोलीचे स्वरूप साठवून त्यांच्या फोटोला फुले आणि पुष्पे वाहून त्यांना आदरांजली वाहिली आणि जल्लोषात भारत माता की जय, वंदे मातरम्, स्वातंत्र्यवीर सावरकर अमर रहे अशा घोषणा दिल्या.

**डॉ. मनीष दोडके**/७०४५४२१७८८

### पाणी बचतीविषयी जागरूकता आवश्यक

नुकताच जागतिक जल दिन संपूर्ण जगात साजरा केला गेला. पाणी ही सजीवांची मूलभूत गरज आहे. पाण्याशिवाय कोणताही सजीव जगू शकत नाही.पण आज जगभर पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. पूर्वी मुबलक स्वरूपात उपलब्ध असणाऱ्या पाण्याची आज मोठ्या प्रमाणात कमतरता जाणवत आहे. पाणी बचत ही काळाची गरज बनली आहे. यामुळेच पाणी बचतीसाठी जगभरात जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण ७१ टक्के इतके असले तरी पिण्यायोग्य पाणी अल्प प्रमाणात आहे. वाढत्या लोकसंख्येची तहान भागवण्यास हे पाणी कमी पडत आहे.पाणी वापराचे नवनवीन मार्ग मानव शोधीत असतो. त्यामुळे पाण्याची तीव्रता जाणवते. हवामान बदलामुळे पावसाच्या पद्धतीत झपाट्याने बदल होत आहे. पूर्वी नियमित येणारा पाऊस आता बेभरवशाचा झाला आहे. पावसाचे दिवस आणि पावसाचे प्रमाणही कमी होत चालले आहे. त्यामुळे दुष्काळाचे प्रमाणही वाढले आहे. जागोजागी बोअरवेल घेऊन जमिनीखालील पाणीही मानवाने संपवले आहे. त्यामुळे भविष्यात पाणीटंचाईची समस्या आणखी गंभीर होणार आहे. भारतात पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात आहे. भारतात मार्चच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईच्या झळा जाणवू लागतात. दरवर्षी ४० टक्के गावांत दुष्काळ असतो. ग्रामीण भागात तर भीषण पाणीटंचाई जाणवते. अनेक गावांत टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो.पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. कृत्रिम पाणी तयार करण्यात अजूनही शास्त्रज्ञांना यश आले नाही म्हणूनच आहे त्या पाण्याची बचत करणे हेच आपल्या हातात आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# १२ झोपडपट्ट्यांमध्ये होणार २० कोटींचा पुनर्विकास

**प्रधानमंत्री आवास योजनेतून विकास**

**शहरात उभारणार ८७५ घरकुले**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रत्येकी अडीच लाख रुपयेप्रमाणे प्रस्तावित ८७५ घरकुले २० कोटींच्या निधीतून उभारण्यासाठी महापालिका उपसमितीत मान्यता देण्यात आली आहे. महापालिका आणि शासकीय मालकीच्या जागेवर असलेल्या शहरातील १२ झोपडपट्ट्यांमध्ये २० कोटींचा पुनर्विकास करण्यात येणार आहे.

शहराच्या विकासाचे संकल्प घेऊन विविध कार्यवाही सुरू केलेल्या नूतन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी शहरातील झोपडपट्ट्यांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. याचाच एक भाग म्हणून यापूर्वी सन २०२१-२२ मधील शहरातील झोपडपट्ट्यांच्या विकासा संदर्भातील आराखड्याच्या 'प्रलंबित फाईल' ला प्राधान्यक्रम देत प्रक्रिया युद्ध पातळीवर सुरू केली आहे. यातूनच आता महापालिकेच्या व शासनाच्या मालकीच्या पुनर्विकासाचा नव्याने तयार केलेल्या प्रस्तावाला हिरवा कंदील दिला आहे. यावरून आता या झोपडपट्ट्यांमधील २० कोटी रुपयांच्या ८७५ घरकुलांच्या प्रक्रियेला वेग देण्यात आला आहे.

### शहरात एकूण २२० झोपडपट्ट्या

सोलापूर शहरात एकूण २२० झोपडपट्ट्या आहेत. घोषित १५९ झोपडपट्ट्यांमध्ये महापालिका जागांमध्ये २७, शासकीय जागांवर ४४, म्हाडा जागेवर १ आणि खाजगी जागांवर ८७ झोपडपट्ट्यांचा समावेश आहे तर अघोषित ६१ झोपडपट्ट्यांमध्ये महापालिकेच्या जागेवर ६, शासकीय जागेवर ७, खासगी जागेवर ४८ तर इतर जागेवर २ अशा झोपडपट्ट्यांचा समावेश आहे. यामधूनच सोलापूर महापालिकेच्या मालकीच्या व शासनाच्या मालकीच्या १२ झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव यापूर्वी आला होता.



या झोपडपट्ट्यांमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घटक क्रमांक चार वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकाम (बीएलसी) अंतर्गत पुनर्विकास करण्यासाठी ३१ मार्च २०२२ अन्वये प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता. त्यावर म्हाडा विभागाने काही त्रुटी कळविल्या होत्या. त्याची पूर्तता महापालिकेकडून करण्यात आलेली नव्हती. दरम्यानच्या कालावधीत ३१ मार्च २०२३ नंतर बीएलसी प्रकल्प अहवाल घेणे शासनाने बंद केले होते. यामुळे महापालिकेकडून ही प्रक्रिया थांबविण्यात आली होती आणि प्रकरण प्रलंबित राहून झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास रखडला होता.

मात्र १७ सप्टेंबर २०२५ पासून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नागरी भागातील जनतेस परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे व शासन निर्णयानुसार विविध घटके कार्यान्वित केली आहेत. केंद्र शासनाच्या या योजनेअंतर्गत झोपडपट्टी पुनर्विकास हे वैयक्तिक स्वरूपातील घरकुल बांधकाम (बीएलसी) व घटक क्र. २ भागीदारी तत्त्वावर परवडणारी घरे (एएचपी) यामध्ये विकास करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. या दोन्हीपैकी एका योजनेतून पुनर्विकास करणे उचित होणार व असल्यामुळे महापालिका प्रशासनाने शहरातील महापालिका मालकीच्या आणि शासकीय मालकीच्या अशा १२ झोपडपट्ट्यांमध्ये पुनर्विकासाच्या अनुषंगाने मान्यतेबाबत पुन्हा कार्यवाही ठेवावी लागणार असल्याने महापालिकेकडून नियुक्त सल्लागार एन्व्हायरो सेफ कन्सल्टंट तयार केलेला प्रस्ताव पुन्हा पुढे काढून आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी संबंधित विभागाला प्रक्रिया करण्यातचे निर्देश दिले होते. यानुसार सोलापूर महापालिका जागेवरील ६ झोपडपट्ट्यांमधील एकूण अस्तित्वातील ५३९ जागांमधून या योजनेतून प्रस्तावित ४३१ जागांवर तर सरकारी जागांवरील ६ झोपडपट्ट्यांमधील अस्तित्वातील ६५९ घर जागांपैकी प्रस्तावित ४४४ जागांवर या योजनेतून पक्की घरे बांधण्याचा प्रस्ताव तयार करून त्याला नियम व अटींसह प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रत्येकी अडीच लाख रुपये प्रमाणे प्रस्तावित ८७५ घरकुले २० कोटींच्या निधीतून उभारण्यासाठी १२ मार्च रोजी महापालिका उपसमितीत देखील मान्यता देण्यात आली आहे. आयुक्तांनी यासाठी अधिक लक्ष केंद्रित केले असून यासाठी शासनाच्या नगर रचना, नगर विकास विभागाकडून तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडून आवश्यक त्या परवानग्या ना हरकत या संबंधी पुढील प्रक्रिया देखील युद्धपातळीवर पूर्ण केली जाणार आहे. डॉ. ओम्बासे हे महापालिकेत आल्यानंतर त्यांनी सर्व प्रक्रिया डिजिटल पद्धतीने केली जात आहे.

### महापालिका जागेवरील झोपडपट्ट्या आणि प्रस्ताव

| झोपडपट्टीचे नाव | एकूण अस्तित्वातील जागा | योजनेतून प्रस्तावित जागा |
|---|---|---|
| कोंचीकोरवी भावनाऋषी झोपडपट्टी | ४५ | २५ |
| जोशी गल्ली | १०० | ८४ |
| रेवण सिद्धेश्वर मंदिर जवळील झोपडपट्टी | २८४ | २२५ |
| सुभाष बागेजवळील झोपडपट्टी | २४ | २४ |
| गांधीनगर भाग- ३ झोपडपट्टी | ३५ | ३१ |
| एकूण | ५३९ | ४३१ |

### सरकारी जागेवरील झोपडपट्टी आणि प्रस्ताव

| झोपडपट्टीचे नाव | एकूण अस्तित्वातील जागा | योजनेतून प्रस्तावित जागा |
|---|---|---|
| देव नगर, सोरेगाव | ५४ | २२ |
| मौलाली चौक, हरिजन वस्ती | २०८ | १४७ |
| बनसिद्ध नगर, सोरेगाव | १२८ | ७७ |
| कस्तुरबा गांधीनगर | ७४ | ५१ |
| बहुरूपी नगर | १११ | ६८ |
| गणेश नगर, देगाव | ८४ | ७९ |
| एकूण | ६५९ | ४४४ |

## क्राईम वृत्त...

### अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

घरात येऊन गोंधळ घालण्याची धमकी देत अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरन बिरप्पा उर्फ बिरू शिरीष पुजारी (वय २५, रा. शिवगंगा नगर, शेळगी, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत अल्पवयीन मुलगी ही २० मार्च रोजी दुपारी घराजवळील स्टेशनरी दुकानात टिकली पाकिट आणण्यासाठी जात असताना बिरू पुजारी याने तिचा पाठलाग करून तिच्याजवळ येऊन तु मला भेटायला ये नाही तर मी तुझ्या घरी येऊन गोंधळ घालेन असे म्हणून धमकी दिली. तसेच वारंवार पिडीतेचा पाठलाग करून तिचा विनयभंग केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक नशीपुन शेख पुढील तपास करीत आहेत.




### मार्केट यार्डातून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

शहरातील मार्केट यार्ड येथून चोरट्याने ४० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत गणेश विठ्ठल ननवरे (वय ४१, रा. दहिटणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ मार्च रोजी रात्री गणेश ननवरे यांनी त्यांची एमएच १३ एआर ४०१७ क्रमांकाची दुचाकी ही मार्केट यार्ड येथे हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती दुचाकी चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार गंगावणे पुढील तपास करीत आहेत.

### दारू पिण्यासाठी पैसे मागत बिअरच्या बाटलीने मारहाण

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

दारू पिण्यासाठी पैसे मागत तरूणास बिअरच्या बाटलीने मारहाण करून जखमी करणाऱ्या तिघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रोहित राजू राजगुरु (वय ३६, रा. जवळकर वस्ती, सम्राट चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नितीन साठे व इतर दोन अनोळखी यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मार्च रोजी सायंकाळी बाळीवेस येथे रोहित राजगुरु याच्या ओळखीचा नितीन साठे याने दारूच्या नशेत दारू पिण्यासाठी राजगुरु यास पैसे मागितले. त्यानंतर साठे याने राजगुरु याच्या शर्टाच्या खिशातील रोख ८५० रुपये जबरदस्तीने काढून घेतले. त्यानंतरही पाच हजार रुपयांची मागणी करू लागला म्हणून राजगुरु याने त्यास विरोध केला. त्यावेळी साठे याने त्याच्या हातातील बिअरची बाटलीने राजगुरु यास मारून अनोळखी दान व्यक्तींना राजगुरु यास पकडण्यास सांगून तोंडावर, पोटावर, छातीस मारहाण करून जखमी केले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक धायगुडे पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

दुचाकीच्या धडकेत दोघे जण जखमी झाले. याबाबत आदित्य अशोक गुंडला (वय २८, रा. रंगराज नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात मोटारसायकलस्वाराविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ मार्च रोजी सायंकाळी खान चाचा हॉटेलसमोरील सर्व्हिस रोडवरून आदित्य गुंडला व त्याचा मित्र हे दोघे दुचाकीवरून जुना विडी घरकुल येथील घरी जात होते. त्यावेळी विरुध्द दिनेशे येणाऱ्या दुचाकीस्वाराने गुंडला यांच्या एमएच १३ ईटी २२३३ क्रमांकाच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये गुंडला व त्यांचा मित्र जखमी झाला. याबाबत एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार नवले पुढील तपास करीत आहेत.

### भांडण सोडविण्यासाठी आलेल्या तरूणास सळईने मारहाण

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

भांडण सोडविण्यासाठी आलेल्या तरूणास लोखंडी सळईने मारहाण करून जखमी करण्यात आले. याबाबत साजीद सलीम शेख (वय ३०, रा. मेहताब नगर, मित्र नगर, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नासीर पठाण, मुस्तफा नासीर पठाण (रा. कुमार स्वामी नगर, मित्र नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २१ मार्च रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारा मित्र नगर येथे साजीद शेख हा रिक्षा भाडे करीत होता. त्यावेळी शेख हा रिक्षा घेऊन मित्र नगर येथे थांबला होता. त्यावेळी नासीर पठाण व मुस्तफा पठाण हे दोघे आले. व त्यांनी तु माझ्या नातेवाईकांकडून रिक्षा भाडे जास्त का घेतले यावरून शिवीगाळ करून मारहाण करू लागले. त्यावेळी शेख यांचा मेव्हणा व भाऊ हे भांडण सोडविण्यासाठी आले असता पठाण याने लोखंडी सळईने मारहाण करून त्यांना जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जगताप पुढील तपास करीत आहेत.



Classifieds

**विकणे आहे**

विजापूर रोड, अत्तार नगर येथील प्लॅट नं. १०१ अंबिका रेसिडेन्सी अपार्टमेंटमधील ३ BHK प्लॅट विकणे आहे.
- संपर्क -
प्रदीप चंद्रकांत ख्याडे
मो. ९८९०८६६४६४
८१७७९७८३८३

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

# उन्हाळी हंगामासाठी ६३ ज्यादा एसटी बसेस धावणार

**एप्रिल महिन्यात सुरु होणार जास्त फेऱ्या**

**एसटी विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**

राज्यात उन्हाळी हंगाम जवळ आला आहे. (दि.१५) एप्रिल पासून सुरू होणाऱ्या उन्हाळी सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगामात आपल्या मूळगावी अथवा पर्यटनस्थळी जाण्यासाठी नागरिकांची लगबग सुरू होत असून, मध्य, पश्चिम आणि कोकण रेल्वेने उन्हाळी याविशेष गाड्या घोषित केल्या आहेत. यासोबत एसटी महामंडळाकडून देखील उन्हाळी विशेष गाड्या सोडण्यात येणार असून, एसटी महामंडळाच्या ताफ्यातील वातानुकूलित शिवशाही बसेसना सर्वाधिक प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, त्या अनुषंगाने सोलापूर एसटी विभागातील विविध नऊ आगारांमधून सुमारे ६३ ज्यादा एसटी बसेस जिल्ह्यातील विविध आगारातून राज्यात धावणार आहेत. याच उन्हाळी हंगामातील एसटीचे वेळापत्रक, आरक्षण जाहीर करण्यात आले असून, एप्रिल महिन्यापासून या ज्यादा बसेस विविध मार्गावर धावणार आहेत. उन्हाळी सुट्ट्या आल्या की आपल्या मूळगावी, पर्यटनस्थळी, देवदर्शनाला जाण्यासाठी नागरिकांकडून नियोजन करण्यात येते. अशावेळी रेल्वे, एसटी बसेसची वाहतूक सर्वसामान्य प्रवाशांना परवडणारी आणि सोईस्कर असल्याने महिनाभर आधीच त्यासाठीचे आरक्षण करण्यात येते. याच पार्श्वभूमीवर रेल्वेप्रमाणे सोलापूर एसटी विभागातील ९ आगारांमधून देखील उन्हाळी गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये महामंडळाने मध्यम आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांचा समावेश केला आहे.

### उन्हाळी जादा हंगामातील बसेसचा लाभ घ्यावा

सदर उन्हाळी जादा बसेस (दि.१६) एप्रिल ते (दी.१५) जून पर्यंत सुरू करण्यात येणार आहेत.सदरील बसेस ऑन लाईन आरक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील, बसेसना सर्व सवलती लागु असतील तरी सर्व प्रवाशांनी सवलतीच्या दरात प्रवासाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येते आहे.

**-अमोल गोंजारी, विभाग नियंत्रक, सोलापूर एसटी विभाग.**

### उन्हाळ्यातील गर्दीच्या हंगामात विविध आगारात धावणाऱ्या जादा बसेस

१) **सोलापूर** : पुणे, अहिल्यादेवी नगर, छत्रपती संभाजी नगर २) **पंढरपूर** : बीड, परळी, पुणे, कोल्हापूर, मुंबई ३) **बार्शी** : पुणे, लातूर. ४)**अक्कलकोट** : कुर्ला, स्वारगेट ५)**करमाळा** : स्वारगेट, भगवानगड, ठाणे. ६)**अकलूज** : पुणे, सांगली, लातूर, परेल ७) **सांगोला** : अहिल्यादेवी नगर, कोल्हापूर, पुणे ८) **कुर्डूवाडी** : पुणे, शिर्डी, बोरीवली, उदगीर, माजलगाव, छत्रपती संभाजी नगर ९)**मंगळवेढा** : पुणे,अहिल्यादेवी नगर.

# कोल्हापूर परिक्षेत्रात सोलापूर ग्रामीण पोलिस द्वितीय

**गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण ८० टक्क्यांवर**

**विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

सन २०२४ मध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुका पार पडल्या. या कालावधीत कोल्हापूर परिक्षेत्रामध्ये ६० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून गतवर्षात परिक्षेत्रातील विविध पोलिस दलामध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण पाहता कोल्हापूर परिक्षेत्रात क्राईम रेटमध्ये सोलापूर ग्रामीण पोलिस दल हे दुसऱ्या क्रमांकावर असून गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाणदेखील



८० टक्क्यांवर असल्याची माहिती कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांनी दिली.

फुलारी हे सध्या सोलापूर ग्रामीण पोलिस दलाच्या वार्षिक तपासणीसाठी सोलापूर दौऱ्यावर आलेले आहेत. त्यावेळी पोलिस मुख्यालयात फुलारी यांनी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, सहायक पोलिस अधिक्षक श्रीमती अंजना कृष्णा, परिविक्षाधिन पोलिस उपअधिक्षक राहुल मडावी, पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर आदी उपस्थित होते.

सन २०२४ हे वर्ष पोलिसांसाठी हेक्टींग होते असे सांगून फुलारी यांनी दोन महत्वाच्या निवडणुकांच्या बंदोबस्तासह वर्षभरात होणारे आंदोलने, सण, धार्मिक उत्सव, पंढरपूर वारी शांततेत पार पडल्याचे सांगितले. परिक्षेत्रातील रस्ते अपघात हा चिंतेचा विषय असून अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. परिक्षेत्रामध्ये महिलांविषयक तसेच पोक्सोच्या गुन्ह्यांमध्ये घट आली आहे तर गुन्ह्यांतील जप्त मुद्देमालाचे प्रमाण वाढले आहे. तसेच नविन आलेले कायदे व त्याच्या अंमलबजावणीबाबत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असून वारंवार त्याबाबतचा आढावा घेण्यात येत आहे. बांग्लादेशी घुसखोरांविरुध्द पोलिसांची कारवाई सुरुच असून सोलापूर, पुणे, सांगली याठिकाणी कारवाई करण्यात आलेली आहे. पुढील काळातदेखील ही शोध मोहिम सुरु राहणार असल्याचे फुलारी यांनी सांगितले. देशात तसेच राज्यात सर्वोत्कृष्ठ पोलिस ठाणे हे कोल्हापूर परिक्षेत्रातीलच असल्याचेही फुलारी यांनी सांगितले.

यावेळी बोलताना पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी जिल्हा पोलिस दलाकडून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सर्व पोलिस ठाण्यांमधील अभ्यागत कक्षाचे नुतनीकरण, वॉटर फिल्टर प्लॅन्ट लावणे, जप्त मुद्देमालाची निर्गती, वाहनांचे क्युआर कोडींग करणे, क्राईम मॅपिग करून टार्गेटेड पोलिसिंग करणे, ग्राम सुरक्षा दलाचा वापर, गुन्हेगारीतून बाहेर काढण्यासाठीचा आरोपींसाठीचा पहाट कार्यक्रम, गुन्हेगार दत्तक योजना, मृत्यूंजय दूत योजना, प्रेरणा अभियान असे उपक्रम सुरु असल्याचे सांगून या माध्यमातून गुन्हेगारी कमी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे अधिक्षक कुलकर्णी यांनी सांगितले.

# विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्यास अटक

**चार चाकी वाहनासह 3 लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

अवैधरीत्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमास जेलरोड पोलिसांनी अटक करून एक चारचाकी वाहनासह ३ लाख १२ हजार रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

सिद्धाराम राचप्पा खजुरगी (वय ४५, रा. नीलम नगर, सोलापूर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रमजान सणानिमित्त सुरु असलेल्या बंदोबस्तादरम्याने जेलरोड पोलीसांना मिळालेल्या माहितीनुसार जोडबसवण्णा चौक ते जिजामाता दवाखाना या मार्गावर असलेल्या नेताजी सुभाषचंद्र बोस बगीचा जवळ एम.एच २० बी वाय ७७८१ या



चारचाकी वाहनाची तपासणी केली. त्यावेळी वाहनाचा चालक असलेल्या सिध्दाराम खजुरगी याच्याकडे चौकशी केल्यानंतर तसेच वाहनाची तपासणी केल्यानंतर वाहनात अवैध विदेशी दारूची वाहतूक होत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी गुन्ह्यात वापरण्यात आलेली चारचाकी वाहन, वाहनातील ११ बॉक्स व पाच पांढऱ्या पिशव्यामध्ये विदेशी दारूचे बाटल्या मिळून आल्या. या कारवाईत जेलरोड पोलिसांनी एकुण गुन्ह्यात ३ लाख १२ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, स.पोलीस आयुक्त पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक भाऊराव बिराजदार, सहायक पोलिस निरीक्षक नीलेश पाटील -सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक शैलेश सातपुते, सहाय्यक फौजदार शरीफ शेख, गजानन कणगिरी, पोलिस कर्मचारी शेख, बाबर, गंगावणे, माने, धुमाळ, नदाफ, वायदंडे, सावंत, जाधव, सिनारे , यसलवाड, देकाणे यांनी केली.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दीतील **उत्तर सदर बझार** येथील **भारतरत्न इंदिरा नगर (ब)** या नावाने ओळखली जाणारी झोपडपट्टी, यामधील म्यु.घर नं.६३०, यांसी सो.म.पा मिळकत क्र.०७०६९००७११, यांसी एकूण क्षेत्रफळ ६०० चौ. फूट इतकी असून या वर्णनाची घरजागा व यातील तंदगभूत वस्तूसह.

ज्याअर्थी वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मूळतः **भूमय्या नरसप्पा सामल** यांच्या कब्जे वहिवाटीची होती. आमचे अशिल नं. १ अन्नपूर्णा भूमय्या सामल यांचे पती व आमचे अशिल नं.२ शंकर भूमय्या सामल तसेच अशिल नं.३ राजू भूमय्या सामल यांचे वडिल **भूमय्या नरसप्पा सामल** यांचे **ता.०१/१२/२०२१** रोजी निधन झाले आहे. वर नमूद मिळकतीचे मयताच्या पश्चात आमचे अशिल नं.१ ते ३ हेच वारसदार आहेत. तरी नमूद केलेल्या मिळकतीच्या ग.व.सु च्या कर आकारणी दप्तरी मयत भूमय्या नरसप्पा सामल यांचे नाव कमी करून आमचे अशिलांची नावाची नोंद करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर शहर सोलापूर लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर ०८ दिवसांचे आंत मयत **भूमय्या नरसप्पा सामल** यांचे वारसदारांचे नावे वर नमूद मिळकतींस नोंद करण्यासाठी कोणाचीही व कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास याखाली नमूद विधिज्ञ यांचे पत्यावर लेखी स्वरूपात पुराव्यानिशी सादर करावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २२/०३/२०२५.

**सही/-**
**ॲड. दिपाली बी. मडूर**
**बी.ए., एल एल. बी.,**
**पदमाई निवास, प्लॉट नं.३३,**
**आदर्श नगर, सोलापूर ९८२३४३०२२२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस सोलापूर येथील डी ।। व सब डी ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील न्यु पाच्छा पेठ येथील सिटी सर्व्हे नं १०३८८ फा. प्लॉट नं. ३४/३ सब प्लॉट नं.६० पैकी दक्षिणेकडील जागा याचे एकून क्षेत्र १६०.२२ चौ.मी. इतके असून यापैकी दक्षिणबाजूची जागा याचे हद्द पूर्वपश्चिम ६०.५ दक्षिणोत्तर १४.२५ फुट असे एकून क्षेत्र ८६२ चौ. फुट अथवा ८०.११ चौ. मी. इतके आहे. परंतु प्रत्यक्षात हद्द पूर्वपश्चिम ५६ फुट दक्षिणोत्तर ११.२५ फुट असे एकून क्षेत्र ६३० चौ. फुट अथवा ५८.५५ चौ.मी. यात संपूर्ण क्षेत्रात चार रूम, संडास, बाथरूमचे कच्चे वीट मातीत बांधकाम केलेले असून यातील नळ व लाईट कनेक्शनसह संपूर्ण घरजागा.

**यांसी चतुः सिमा :- पूर्वेस - सदर सर्व्हे नंबरपैकी राहिलेली जागा, पश्चिमेस - रस्ता, दक्षिणेस - याच प्लॉटपैकी सत्यनारायण बंडा यांची घरजागा, उत्तरेस - सब प्लॉट नं.६० पैकी राहिलेली जागा.**

वर नमूद मिळकत राजकुमार श्रीराम गुजर यांच्या मालकीचे व कब्जेवहिवाटीचे आहे. सदर वर नमूद मिळकत राजकुमार श्रीराम गुजर यांनी आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवून दि. ०८/०२/२०२५ रोजी इशारापावती करार करुन इशारा रक्कम घेतले आहे. तरी सदर वर नमूद मिळकती बाबत राजकुमार श्रीराम गुजर यांनी आमच्या अशिलास सदर मिळकतीवर कसल्याही प्रकारचा बोजा नाही असे खात्री दिलेली आहे, तरी सदर जाहीर नोटिस द्वारे कळविण्यात येते की सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, वहिवाट, टाच, जब्ती, बोजा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, अगर इतर हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७(सात) दिवसांच्या आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्त्यावर लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाच्याही कसलीही हरकत न आल्यास हि मिळकत निर्बंध व निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल पुढचा व्यवहार करणार आहे. व तद्नंतर कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी. हे नोटीस दिली तारीख २२/०३/२०२५

**सही/-**
**ॲड जगदिश. व्ही. कोंडी**
**(बी.एस. एल.एल. एल.बी एम.एस.डब्ल्यू नोटरी भारत सरकार)**
**९१९, भवानी पेठ सोलापूर मो. - ९८६०२०५०७८**
**(अशिल तर्फे ॲडव्होकेट)**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-** डि. व सब डि. सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर शहर महानगरपालिका हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. ११७/२ब व नविन सर्व्हे नं.११५/२ब पैकी क्षिरालिंग नगर म्हणून ओळखले जाणारे येथील प्लॉट नं.३७३ याचे एकुण क्षेत्र ८३० चौ. फुट किंवा ७७.१०५ चौ. मीटर इतकी आहे, सदर जागेत १०X२० फुट मापाचे पत्र्याचे शेड असून यात लाईट, संडास, बाथरुमची सोय आहे, उर्वरीत जागा खुली आहे. यासी म.न.पा. मिळकत क्र.३३२७८१ असा आहे.

**यासी चतुः सीमा :- पुर्वसः-स.नं. १२२, पश्चिमेस :- रस्ता, दक्षिणेस : प्लॉट नं. ३७४ उत्तरेस : प्लॉट नं. ३७२.**

येणेप्रमाणे चतुःसीमेतील मिळकत, त्यावरील पत्राशेड, त्यातील तदंगभुत वस्तूंसह, सोयी सुविधांसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह. ही मिळकत प्लॉट जागा श्री. यल्लप्पा रामय्या आगबत्तीन, रा. ३७३, क्षिरालिंग नगर, महालक्ष्मी मंदिर जवळ, मुळेगाव रोड, विडी घरकुल, सोलापूर, यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती / करारनामा लिहून दिला आहे, त्यांनी ही मिळकत प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे, तरीही वर नमूद मिळकत संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस, इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून आठ दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे दि.२२/०३/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे ॲड. रॉजरतन द. श्रीराम**
**ऑ. १६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५**
**मो.नं. ९८८१२४०५१६**

# मिरवणुका, आंदोलन बंदोबस्ताचा पोलिसांवर अतिरिक्त ताण

## ● उत्सवप्रिय शहरात विविध प्रकारच्या बंदोबस्तातच जातात पोलिसांचे ३६५ पैकी २५० पेक्षा जास्त दिवस



**सोलापूरची ओळख उत्सवप्रिय आणि बहुभाषिक शहर अशी आहे. दररोज विविध धार्मिक कार्यक्रम, विविध महापुरुष जयंती, उत्सव होतात.**

**कामगार वस्तीमुळे शासन दरबारी न्याय मागण्यासाठी मोर्चा, आंदोलने होतात. व्हीआयपी बंदोबस्त असतो. सदर बझार पोलिसांचा व्हीआयपी बंदोबस्त, आंदोलन मोर्चा यातच वेळ जातो. फौजदार चावडी पोलिसांचा वेळ मिरवणुका, आंदोलन यातच खर्ची पडतो. यामुळे, पोलिसांच्या मुख्य कामाकडेच (गुन्हे शोध, तपास) दुर्लक्ष होत आहे. सर्व जयंती, उत्सव मिरवणुका शांततेत पार पडतात हे देखील सोलापूरकरांचे वैशिष्ठ्यच म्हणावे लागेल.**

मिरवणुकांमुळे वाहतूक कोंडी, वाहतूक विस्कळीत होणे हे प्रकार नित्याचेच आहेत. बस स्थानक आणि रेल्वे स्टेशन परिसरातच या मिरवणुका होत असल्यामुळे परगावाहून आलेल्या नागरिकांनाही मोठा त्रास होतो. अनेकदा रुग्णवाहिका अडकून पडण्याचे प्रसंग उद्भवतात. याकडे सर्वांनीच गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. लोकशाहीत सर्वांनाच न्याय हक्कासाठी आंदोलन, मोर्चा काढण्याचा अधिकार आहे, याबाबत दुमत नाही. परंतु, ते करताना सामान्य नागरिकांची गैरसोय होणार नाही याकडेही गांभीर्याने पाहिले पाहिजे. आपल्यामुळे कुणाला त्रास होणार नाही, वाहतूक कोंडी होणार नाही, रुग्णवाहिका अडकणार नाही याचीही काळजी आंदोलन करणाऱ्या प्रमुखांनी तसेच वाहतूक पोलिस अधिकाऱ्यांनी घेतली पाहिजे.

गेल्या काही वर्षापूर्वी सोलापुरातील नागरीकांना वर्षभरातील उत्सव म्हटले तर गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, सण म्हटले तर संक्रांत-दिवाळी-गुढीपाडवा आणि महापुरूषांच्या जयंत्या म्हंटलं तर छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ, बाबासाहेब आंबेडकर जयंती मिरवणुक इतकेच माहिती होत. परंतु, गेल्या १० ते १५ वर्षात सोलापूर शहरातील परिस्थिती पाहिली तर वर्षातील प्रत्येक महिन्यात कोणत्या ना कोणत्या महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या केल्या जात असल्याचे दिसून येते. समाजातील प्रत्येक जाती-धर्माच्या महापुरुषांच्या जयंती उत्सव साजरे करणारे सोलपूर शहर हे एकमेक असल्याचे अनेकांकडून बोलले जाते.

शहरात सर्व समाजाचे नागरिक गुण्यागोविंदाने राहतात. प्रत्येकाला उत्सव, सण साजरा करण्याचा अधिकार आहे. यातून एकोपा वाढतो. पण, उत्सव - सण - जयंती साजरी करताना कायद्याच्या चौकटीत राहूनच साजरा करावा हे निघणाऱ्या मिरवणुका पाहिल्या तर केवळ बोलण्यापुरते ठीक आहे असेच म्हणावे वाटते.

सोलापूर शहर उत्सवप्रिय म्हणून ओळखले जात असून, या शहरात वर्षभरात ३० पेक्षा अधिक सार्वजनिक उत्सव साजरे होतात. उत्सवात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग करून ध्वनिप्रदूषण वाढविणाऱ्या डॉल्बी यंत्रणेचा मुक्त वापर होतो. राजकीय दबावापोटी स्थानिक पोलीस प्रशासनाकडून यासंदर्भात ठोस कारवाई होत नसल्यामुळे डॉल्बीचा सुळसुळाट वरचेवर वाढत चालला आहे. यापूर्वीच्या काही पोलिस आयुक्तांनी वेगवेगळ्या उपाययोजना करून कोणत्याही उत्सवात डॉल्बी यंत्रणा वापरण्यास मज्जाव केला होता. परंतु, त्यांनतर मात्र पुन्हा डॉल्बीचा दणदणाट वाढतच जात आहे. जयंती-सण-उत्सवातच डॉल्बी वाजते असे काही नाही तर खाजगी कार्यक्रम आणि लग्नाच्या वरातीमध्येही डॉल्बी मोठ्या प्रमाणात वाजत असल्यामुळे नागरीकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला झुंडशाहीच्या बळावर दुसरा न्याय, असे परस्पर विसंगत चित्र अनेक जयंती-उत्सवांच्या मिरवणुकीनंतर कारवाईवेळी दिसून येते. हे सर्व पाहता कारवाई न करण्यासाठी पोलिस प्रशासनावर राजकीय दबाव मोठया प्रमाणावर असल्याचे बोलले जाते.




## फक्त सोलापुरातच का?

आपल्याकडेजणू उत्सव साजरे करण्याची स्पर्धा लागली आहे. हा पायंडा अलिकडील काळात पडला आहे. पूर्वी म्हणजे १० ते १५ वर्षांपूर्वी ठरावीक उत्सव, जयंती साजरे होत. आता त्यांची संख्या वाढलीय. कोणते मंडळ किती मोठे डॉल्बी लावतात, मिरवणुकीत किती खर्च करतो, त्याच्याहून अधिक खर्च आपण कसे करू यातून स्पर्धा लागते. व्यापारी, उद्योजक, दुकानदार यांच्याकडून जबरदस्तीने वर्गणी घेणे, दिली नाही तर धमकावणे असे प्रकार घडतात.

सिध्देश्वरयात्रा, गणपती, नवरात्र, डॉ. आंबेडकर जयंती, मोहरम, शिवजयंती, मोहरम, अण्णाभाऊ साठे जयंती यावेळी मोठा बंदोबस्त असतो. त्याशिवाय महाराणा प्रताप जयंती, वीरशैव कय्यया जयंती उत्सव, मार्कंडेय रथोत्सव, वाल्मीकी जयंती, ईद मिलाद, बसवेश्वर जयंती, शिवा काशीद, जांबमुनी महाराज उत्सव, अहिल्यादेवी होळकर उत्सव, शंभूराजे जयंती उत्सव यासह १८० उत्सव साजरे होतात.

गणपती, नवरात्र हेच मोठे उत्सव असतात. त्यावेळी पोलिसांची कसोटी असते. त्याशिवाय महापुरुष, नेते मंडळी यांची जयंती, लहान उत्सव, आंदोलने यावेळेसही पोलिसांवर ताण असतो. गणपती, नवरात्र, मोहरम हे उत्सव सोडले तर अन्य जयंती उत्सवाचे प्रस्थ वाढत आहे. त्यामुळे नेहमी पोलिसांवर ताण नसतो. उत्सवानंतर आजोरा काढला जात नाही. डॉल्बी, रोषणाईचे प्रस्थ मोठेच आहे. अन्य महापुरुष, नेते यांचे ज़यंती उत्सव होतात. त्यावेळी मोठी मिरवणूक, रस्ते बंद, डॉल्बी असे प्रकार सर्रास होतात.



सोलापूर शहर हे उत्सवप्रिय नागरीकांचे शहर आहे. हे सर्व उत्सव, जयंती, मिरवणुका या शांततेत पार पडाव्यात म्हणून पोलिसांच्यावतीने चोख बंदोबस्त तैनात करण्यात येतो. याचा पोलिस दलावर मोठा ताण येतो. जयंती, उत्सव निघणाऱ्या मिरवणुकांमुळे नागरीकांनादेखील त्रास सहन करावा लागतो. कायद्याने मिरवणुकीमध्ये डॉल्बी साऊंड लावण्यास बंदी करण्यात आलेली आहे. परंतु, एकाही सार्वजनिक मंडळाकडून याची अंमलबजावणी करण्यात येत नाही. मंडळांनी डॉल्बी न लावता विधायक उपक्रम राबविले जर ज्यांची जयंती, उत्सव आपण साजरा करतो, त्या महापुरुषांचे विचार खऱ्या अर्थाने आचरणात आणल्यासारखे होईल.

**- श्रीमती दिपाली काळे,**
उपायुक्त, सोलापूर शहर पोलिस आयुक्तालय.

### तत्कालीन आयुक्त रविंद्र सेनगांवकर यांनी केले प्रयत्न

उत्सवप्रिय' सोलापूरला वळण देण्यासाठी तत्कालीन पोलिस आयुक्त रविंद्र सेनगावकर यांनी पोलीस खात्याविषयीची जनमानसातील विश्वासार्हता निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी उत्सवप्रिय सोलापूरच्या सार्वजनिक उत्सवांना शिस्त आणण्यासाठी विविध उत्सव मंडळांशी संवाद साधून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास न होता कायद्याचा मान राखत आनंदाने उत्सव साजरे व्हावेत, त्यात शिस्त यावी आणि त्यातून सकारात्मक दृष्टिकोन तयार व्हावा यासाठी प्रयत्न केले. सोलापुरात अलीकडे सार्वजनिक उत्सव साजरे करण्याची प्रथा व परंपरा वाढत चालली आहे. त्यात उत्तरोत्तर नवनवीन उत्सवांची भर पडत आहे. वर्षभरात ४० पेक्षा जास्त उत्सव साजरे होतात. एकेक उत्सवाचा कालावधी तीन ते दहा दिवसांचा असतो. त्यातून घातक संस्कृती जन्माला आली आहे. वर्गणी, अवैध धंदे, गुंडगिरी तथा गुन्हेगारीचे उदारीकरण, डॉल्बीचा सर्रासपणे होणारा वापर, बेशिस्त व विस्कळीत वाहतूक व्यवस्था, त्यामुळे धोक्यात येणारी कायदा व सुव्यवस्था आदी मुद्यांचा विचार करून आयुक्त सेनगावकर यांनी ही धोकादायक संस्कृती नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले. मिरवणुकांमध्ये डॉल्बीचा मुक्त वापर करून ध्वनिप्रदूषण वाढवत आसपासच्या नागरिकांना वेठीस धरले जाते. उत्सवांमध्ये दारूचा वापरही मोठ्या प्रमाणात होतो. त्यातून वाद-तंटे होऊन प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेला आव्हान दिले जाते. या आक्षेपार्ह बाबींमुळे शेवटी पोलीस प्रशासनावरील ताण वाढतो. उत्सवांना चांगले वळण लागण्याच्या अनुषंगाने पोलीस-उत्सव मंडळे म्हणजे पर्यायाने पोलीस व जनता यांच्यात योग्य समन्वय राहावा, त्यासाठी विविध उपाययोजना करता यावेत, विशेषत: मंडळांची नोंदणी व्हावी व खऱ्या अर्थाने सार्वजनिक उत्सव त्रासदायक न ठरता आनंददायी ठरावेत, हा हेतू मनात बाळगून सेनगांवकर यांनी काम केले.

### पोलिसांवर बंदोबस्त, कामाचा वाढता ताण...

दिवसाच्या २४ तासातील निम्म्यापेक्षा जास्त तास सतत सलग ड्युटी केल्यामुळे पोलिसांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागतो. यामुळे त्यांची तब्येत सतत खालावत जाते. कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी आणि मानसिक ताण कमी करण्यासाठी सुट्ट्याही मिळत नाहीत. त्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलिस विभागात मनुष्यबळाची कमतरता ही देखील चिंतेची बाब आहे.

सलग अनेक तास सतत ड्युटी केल्यामुळे पोलिसांना प्रचंड मानसिक आणि शारीरिक ताण सहन करावा लागतो. यामुळे त्यांची तब्येत सतत खालावत जाते. कुटुंबासोबत वेळ घालवण्यासाठी आणि मानसिक ताण कमी करण्यासाठी सुट्टयाही मिळत नाहीत. लोकसंख्येच्या तुलनेत पोलिस दलात असलेले अपुरे संख्याबळ पोलिसांसाठी घातक ठरत आहे. कामाचा वाढता ताण, ड्युटीचे अतिरिक्त तास, अनियमित जेवण आणि अपुरी झोप ही कारणे पोलिसांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहेत. ताणतणावातून अनेक पोलिसांनी आत्महत्या केल्याच्याही घटना घडलेल्या आहेत. समाजात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा संपूर्ण जगावर परिणाम होतो. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर आहे. सण, उत्सव, जयंती आदींच्या मिरवणुका, राजकीय घडामोडी, राजकीय सभा, नेत्यांच्या बैठका, आंदोलने इत्यादींसाठी मोठ्या संख्येने पोलिस दलाची उपस्थिती देखील आवश्यक असते. सर्व जातीधर्मांचे सण नागरीक मोठ्या प्रमाणात साजरे करतात, परंतु या काळात पोलिसांच्या सुट्टया रद्द केल्या जातात. आठ तास काम करण्याचा आदेश असला तरी त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. पोलिसांना ड्युटीवर येण्याची वेळ असते पण त्यांना निघून जाण्याची निश्चित वेळ नसते. अनियमित दिनचर्या असणे, खाण्यापिण्याची निश्चित वेळ नाही, अनियमित कामकाज, नियमित वैद्यकीय तपासणीकडे लक्ष न देणे, पोलिस स्टेशन किंवा इतर ठिकाणी काम करण्याची गैरसोय, आजारांकडे दुर्लक्ष करण्याची सवय असणे, जास्त कामाचे तास ही प्रामुख्याने पोलिसांच्या मृत्यूची कारणे आहेत.

### ▸▸ नागरिकांना होतो त्रास...

जयंती, उत्सव काळात मिरवणूक मार्गावर दिवसभर वाहतूक बंद असल्यामुळे प्रवासी, रुग्ण यांचे हाल होतात. पर्यायी मार्गाचा वापर करताना दमछाक होते. डॉल्बीच्या आवाजाने रुग्ण, मुले, ज्येष्ठ नागरिकांना त्रास होतो. पोलिसांवर सोळा ते अठरा तास कामाचा ताण असतो.

### ▸▸ उत्सव शांततेसाठी काही योजना?

मिरवणुकीत कोणीही मद्यपान केले नाही तर गोंधळ होणार नाही. प्रत्येकांनी आपलेपणा जपून मदत करावी. डॉल्बी लावू नये. पारंपरिक वाद्य वाजवावेत. या बाबींचे पालन केले तर उत्सव शांततेत होऊ शकतो.

### ▸▸ ताणकमी करण्यासाठी उपाय?

मिरवणूकीला परवानगी देताना केव्हा सुरू करणार आणि संपणार याबाबत वेळ घेतली पाहिजे. सर्वांनी वेळेचे पालन करावे. मुदतीत मिरवणूक पार पडली तर ताण येणार नाही. सण, उत्सव साजरा करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. सर्वांनी नियमांचे पालन करावे. शिस्तबद्ध मिरवणूक काढावी.





## ...तर ताण कमी होईल

सार्वजनिक उत्सवावेळी शहर पोलिस बंदोबस्तासाठी असतात. इतर शहरांच्या तुलनेत सोलापूर येथे १८० दिवस जयंती, उत्सव असल्याने मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्तात गुंतलेले असतात. परिणामी पोलिसांच्या गुन्हे तपासाला गती मिळत नाही. सार्वजनिक उत्सव मंडळ, सामाजिक संस्था, संघटनांनी पोलिसांविना समाजपयोगी उपक्रम राबवले तर सामाजिक पोत सुधारण्यास उपयोग करून घेता येईल. तसेच शहराची उत्सवी शहर म्हणून असलेली छाप पुसता येईल. पोलिस प्रशासनाने सध्या त्या दृष्टीने पाऊल टाकण्यास सुरुवात केली आहे. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, बारामती या शहरांत होत नाहीत तेवढे जयंती, उत्सव, सण, आंदोलने, समारंभ शहरात साजरे होतात. वर्षातील आठ महिने पोलिस बंदोबस्तात असतात. ज्या कामावर लक्ष केंद्रित करणे गरजे आहे त्यावर पोलिसिंग होत नाही. त्यामुळे गुन्हेगारी वाढतेय. गुन्ह्यांचा तपास होत नाही. वाहतूक नियोजन करता येत नाही. उत्सव कमी वेळेत, सामाजिक उपक्रम रावबत, मिरवणुकीतील गोंगाट कमी झाल्यास ताण कमी होईल.

सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयातील तत्कालीन पोलिस आयुक्त हिम्मतराव देशभ्रतार, रवींद्र सेनगावकर यांनी नवरात्र, शिवजयंती, डॉ. आंबेडकर जयंती, अण्णाभाऊ साठे जयंती, मार्कंडेय जयंती, गणपती मंडळे, मोहरम कमिटी, मोहल्ला कमिटी सदस्यांच्या बैठका घेऊन त्यातून समोर आलेल्या मुद्दयांवर डॉल्बीवर थोडाफार अंकुश आणला होता. प्रत्येकवेळी सण-उत्सव-जयंती यांच्या पार्श्वभूमीवर आयुक्तालयातील बैठकीमध्ये डॉल्बी नको, मिरवणूक शांततेत पार पडण्यासाठी पोलिसांचा जादा बंदोबस्त नको हे मुद्दे चर्चिले जातात. परंतु, जे उत्सव अन्य शहरात होत नाहीत तेदेखील सोलापुरात होतात. आपण सोलापूर बहुभाषिक शहर म्हणतो. उत्सवाचा आनंद घेण्याचा साजरा करण्याचा प्रत्येकाला कायद्याने अधिकार आहे, तो कायद्याच्या चौकटीत. काही गोंधळ झाल्यास पोलिसांना जबाबदार धरण्यात येते. मुख्य उद्देश म्हणजे पोलिसाविना मिरवणुका, डॉल्बी नको, मद्य प्राशन करून नाचगाणे नको. या बाबींचा विचार झाल्यास उत्सव आनंददायी आणि विनासायास पार पडेल. सण-उत्सव-जयंती मिरवणुकीतील स्पर्धा टाळून विधायक कामाकडे वळण्याची गरज उत्सव आहे. सण-उत्सव-जयंती म्हटले की मिरवणुका आल्याच. कोण किती खर्च करतो अशी स्पर्धा मंडळात लागली आहे. हे बदलून विधायक आणि वेगळे उपक्रम राबवण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे. सांस्कृतिक कार्यक्रम, सामुदायिक विवाह सोहळासारख्या उपक्रमातून लोकांना सहभागी करून घेतले जावे. मिरवणुकीचा खर्च टाळून विधायक कामाकडे वळण्याची गरज आहे. सामाजिक उपक्रमांवर भर हवा उत्सव साजरे करण्यात यावेत. पण, त्यातून सामाजिक पोत सुधारण्यावर भर देण्यात यावा. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवणे, शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, शैक्षणिक साहित्य वाटप, अन्नदान, रुग्णांना मदत आदी सामाजिक उपक्रम राबवल्यास पैशाचे दान सत्कर्मी लागेल. उत्सव कमी वेळेत, कमी पैशात कसे साजरे करता येतील याबाबत विचारमंथन झाले पाहिजे.

### सोलापूर शहरातील साजरे होणारे जयंती-सण-उत्सव

| जयंती/सण/उत्सव | महिना | कालावधी |
|---|---|---|
| भीमा कोरेगाव शौर्यदिन | जानेवारी | १ दिवस |
| श्री सिध्देश्वर यात्रा | जानेवारी | ५ दिवस (मुख्य सोहळा) (३१ जानेवारी गड्डा यात्रा) |
| छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन | जानेवारी | १ दिवस |
| राजमाता जिजाऊ जयंती | जानेवारी | १ दिवस |
| गुरु गोविंद सिंह जयंती | जानेवारी | १ दिवस |
| प्रजासत्ताक दिन | जानेवारी | १ दिवस |
| शब्ब ए मेराज (बडी रात) | फेब्रुवारी (तिथीनुसार) | १ दिवस |
| रमाबाई आंबेडकर जयंती | फेब्रुवारी | १ दिवस (मिरवणुक) |
| गणेश जयंती | फेब्रुवारी (तिथीनुसार) | १ दिवस |
| व्हॅलेंटाईन डे/वसंत पंचमी | फेब्रुवारी | १ दिवस |
| विश्वकर्मा जयंती | फेब्रुवारी | १ दिवस |
| संत सेवालाल जयंती | फेब्रुवारी | ५ दिवस (मिरवणुक) |
| संत रोहिदास जयंती | फेब्रुवारी | १ दिवस (मिरवणुक) |
| छत्रपती शिवाजी महाराज जयंती | फेब्रुवारी | ५ ते ७ दिवस (मिरवणुक) |
| शब्ब ए बरात | फेब्रुवारी | १ दिवस |
| महाशिवरात्री | मार्च (तिथीनुसार) | १ दिवस |
| रमजान ईद | मार्च-एप्रिल (तिथीनुसार) | ३० दिवस |
| होळी | मार्च | १ दिवस |
| धुलीवंदन | मार्च | १ दिवस |
| गुडफ्रायडे | मार्च | १ दिवस |
| रंगपंचमी | मार्च | १ दिवस |
| गुढीपाडवा | एप्रिल | १ दिवस (मिरवणुक) |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | एप्रिल | ५ ते ७ दिवस (मिरवणुक) |
| श्री रामनवमी | एप्रिल | १ दिवस (मिरवणुक) |
| महावीर जयंती | एप्रिल | १ दिवस (मिरवणुक) |
| हनुमान जयंती | एप्रिल | १ दिवस |
| महाराष्ट्र दिन | मे | १ दिवस |
| महाराणा प्रताप जयंती | मे | ५ दिवस (मिरवणुक) |
| अक्षय तृतीया/परशुराम जयंती | मे | १ दिवस (मिरवणुक) |
| महात्मा बसवेश्वर जयंती | मे | ५ दिवस (मिरवणुक) |
| छत्रपती संभाजी महाराज जयंती | मे | ५ दिवस (मिरवणुक) |
| बुध्द पौर्णिमा | मे | १ दिवस |
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंती | मे | ३ ते ५ दिवस (मिरवणुक) |
| बकरी ईद | जून | १ दिवस |
| वटपौर्णिमा | जून | १ दिवस |
| छत्रपती शाहू महाराज जयंती | जून | १ दिवस |
| मोहरम | जुलै | १० ते १२ दिवस |
| महाराष्ट्रीय बेंदूर | जुलै | १ दिवस |
| साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती | ऑगस्ट | ५ ते ७ दिवस (मिरवणुक) |
| नागपंचमी | ऑगस्ट | १ दिवस |
| स्वातंत्र्य दिन | ऑगस्ट | १ दिवस |
| रक्षाबंधन/नारळी पौर्णिमा | ऑगस्ट | १ दिवस |
| महर्षि मार्कंडेय महामुनी जयंती | ऑगस्ट | १ दिवस |
| श्रीकृष्ण जन्माष्टमी | ऑगस्ट | १ दिवस |
| दहिहंडी | ऑगस्ट | १ दिवस (मिरवणुक) |
| पोळा | सप्टेंबर | १ दिवस |
| गणेशोत्सव | ऑगस्ट-सप्टेंबर | ११ दिवस (मिरवणुक) |
| ईद ए मिलाद | सप्टेंबर | १ दिवस (मिरवणुक) |
| नवरात्रोत्सव | सप्टेंबर-ऑक्टोबर | १० दिवस (मिरवणुक) |
| कोजागिरी पौर्णिमा | ऑक्टोबर | ५ दिवस |
| दिपावली | ऑक्टोंबर-नोव्हेंबर | ५ दिवस |
| टिपू सुलतान जयंती | नोव्हेंबर | १ दिवस |
| महापरिनिर्वाण दिन | डिसेंबर | १ दिवस |
| काळा दिन (बाबरी मशिद) | डिसेंबर | १ दिवस |
| ख्रिसमस | डिसेंबर | १ दिवस |
| थर्टी फस्ट | डिसेंबर | १ दिवस |


संपादन : अमोल व्यवहारे । मो. ९९२२६००७९९

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या पदाधिकारी निवडी संपन्न

**सांगोला, दि.२२ मार्च-**

सांगोल्यातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळ अध्यक्षपदी नरेश बनसोडे यांची निवड करण्यात आली. नूतन कार्यकारिणी निवडीसाठी तानाजीबापू बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली.यावेळी निवडलेली कार्यकारिणी अशी - अध्यक्ष नरेश बनसोडे, उपाध्यक्ष महेश प्रक्षाळे, राजू माने, विनोद बनसोडे, स्वप्नील कांबळे, सोमनाथ बनसोडे, खजिनदार प्रविण बनसोडे, सहखजिनदार रूपेश बनसोडे, आकाश आठवले, सचिव विकास बनसोडे, सहसचिव विनायक जावीर, विजय माने कार्याध्यक्ष रणजित बनसोडे, कार्यकारिणी सदस्य जयश्री बनसोडे, रेश्मा बनसोडे, रतन बनसोडे, रूपाली काटे, जयश्री कसबे, अविनाश बनसोडे, अनिल बनसोडे, रामा बनसोडे, अमित सावंत, वैभव भोरकडे, अतुल बनसोडे, भिमराव बनसोडे, प्रविण जगधने, प्रसिध्दी प्रमुखपदी बापूसाहेब ठोकळे.

### सुवर्णकार समाजाचा राज्यस्तरीय वधु - वर परिचय पालक मेळावा उत्साहात संपन्न

**पंढरपूर दि.२२ मार्च**

सुवर्णकार समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर पालक परिचय मेळावा नुकताच पंढरपूर येथील फरताळे दिंडी भवन येथे झाला. यावेळी सांगली, कोल्हापूर, सोलापूर, सातारा, बीड, धाराशीव, नांदेड, पुणे, मुंबई, नगर, विजापूर येथील पालक होते. उदयोजक महेश साठे यांचे हस्ते संत नरहरी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. वधु वरांनी आपला परिचय करून दिला. आनंद कासेगावकर व आयुर्वेदाचे अभ्यासक रत्नाकर वेदपाठक यांना समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुत्रसंचालन रेखा चंद्राराव व गणेश गोडबोले यांनी केले. सारंग महामुनी, सुमित पारखे,विशाल दिक्षीत, केशव महामुनी, सदानंद महामुनी यासह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### तरुणाचा विहिरीत बुडून मृत्यू

**बार्शी, दि.२२ मार्च**

शहरातील आदर्श मंगल कार्यालयाच्या पाठीमागे असलेल्या विहिरीत बुडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, पंकज नागनाथ भालेराव (वय ३५, रा. वाणी प्लॉट, बार्शी) हा आपल्या मित्रासोबत पोहण्यासाठी विहिरीत उतरला असता पाण्यात बुडाला. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दल आणि नगरपालिकेच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचाव कार्य सुरु केले. शोध मोहिमेदरम्यान पंकजचा मृतदेह सापडला. घटनेची माहिती मिळताच त्याचा भाऊ राहुल भालेराव तातडीने घटनास्थळी पोहोचला. त्यानंतर पोलिसांना खबर देण्यात आली असून पुढील आवश्यक कार्यवाही सुरु आहे. या दुर्दैवी घटनेमुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## निधन वृत्त...

### छाया ढवण



**बार्शी, दि. २२ मार्च-**

बार्शी तालुक्यातील सौंदरे येथील छाया मधुकर ढवण (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे.

### केशव पाटील



**पिलीव दि. २२ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील सेवानिवृत्त कृषी सहाय्यक केशव गेना पाटील यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८० वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### लक्ष्मण चव्हाण



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

निवृत मुख्याध्यापक लक्ष्मण सोपान चव्हाण यांचे दि. २२ मार्च रोजी सकाळी ८ वाजता वयाच्या ८७ वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्यविधी मोदी स्मशानभूमी येथे करण्यात आले. ते लोकसेवा हायस्कूलचे शिक्षक उमेश चव्हाण यांचे वडील होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दोन मुली, सुन, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

### विठाबाई वाडेकर



**अकोले, दि. २२ मार्च-**

चास (ता. अकोले) येथील गं.भा. विठाबाई रामभाऊ वाडेकर यांचे नुकतेच वृद्धपकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्ष होते. त्या अमृतसगार दूध संघ व हरिशचंद्र सह पाणीपुरवठा फेडरेशनचे माजी व्हा. चेअरमन कै. रामभाऊ वाडेकर यांच्या पत्नी होत्या. माजी कृषी अधिकारी दत्तात्रय वाडेकर व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब वाडेकर, रतन रेवगडे, शिला मोरे यांच्या मातोश्री तर अगस्ती साखर कारखान्याचे संचालक कैलासराव शेळके यांच्या मामी होत. चास येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### प्रभावती सातरले



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

प्रभावती नरसिंग सातरले यांचे दि. २२ मार्च रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, दीर, भावजय असा मोठा परिवार आहे. निवृत सह. समाज कल्याण अधिकारी श्रीनिवास सातरले यांच्या मातोश्री व निवृत जिल्हा न्यायाधीश बाबुराव सातरले यांच्या त्या वहिनी होत. शिवाजी नगर, मोदी खाना येथून दि. २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे.

### लता वाघमारे



**सोलापूर, दि. २२ मार्च-**

विजय देशमुख नगर येथील रहिवासी त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या धम्ममित्र लता सुनिल वाघमारे (वय ५५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा, जावई, नात असा परिवार आहे. आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते सुकांत वाघमारे यांच्या त्या आई होत.

# शेतजमिनीच्या वादातून बुद्रुकवाडी येथे एकाचा खून

**एका संशयीत आरोपीविरोधात माढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २२ मार्च -**

माढा तालुक्यातील बुद्रुकवाडी येथे शेतजमीनीच्या वादातून कांतीलाल ज्ञानदेव माने (वय- ५२) या इसमाचा सत्तुर व काठीने मारहाण करून खून केला असल्याची घटना घडली असून याबाबत एका संशयीत आरोपी भिवा संपत्ती बुद्रुक याच्यावर माढा पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे

सदर घटनेची फिर्याद मयताची पत्नी अनुराधा कांतीलाल माने (वय ३२) यांनी माढा पोलिस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार मयत कांतीलाल माने हे संदिप भूजंगराव पाटील यांची शेती करून आपला उदरनिर्वाह करीत होते. त्याठिकाणी एक



सामाईक विहिर असल्याने त्या विहिरीमध्ये संदिप पाटील यांचेसह भिवा बुद्रुक यांचाही हिस्सा होता. भिवा बुद्रुक हा वारंवार तू हि जमीन करायची नाही, तू विहिरीवरची मोटार चालू करायची नाही, तुझा यात काय संबंध नाही अन्यथा तुला जीवे मारीन अशी धमकी देत वारंवार भांडत होता. २२ मार्चच्या रात्री कांतीलाल माने शेतात पाणी द्यायला गेले होते. सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान पत्नी अनुराधा शेतात गेली असता शेतातील विहिरीजवळ कांतीलाल माने रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले. त्याच्याजवळ लोखंडी कोयता व काठी पडलेली होती. त्यामुळे भिवा संपत्ती बुद्रुक यानेच कांतीलाल माने यांच्या गळ्यावर, डोकीत व कपाळावर कोयत्याने वार करून ठार मारले असल्याची फिर्याद अनुराधा माने यांनी माढा पोलिस ठाण्यात दिली आहे. संबंधीत आरोपीवर अट्रॅसिटि व खुनाच्या गुन्ह्याअंतर्गत तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिस आरोपीचा शोध घेत आहेत. घटनेचा तपास बार्शीचे पोलिस उपविभागिय अधिकारी जालिंदर नालकूल यांच्या सह माढा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांच्याकडे असून यांनी घटनास्थळाला भेट दिली आहे. आरोपींना अटक करणेसाठी नागरिकांनी पोलिस ठाण्यात गर्दी केली होती. सायंकाळी ७ वाजेपर्यंत आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले नाही.



घटनेतील आरोपीला अटक करावी यासाठी मयताची पत्नीसह नातेवाईक व वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी माढा पोलीस ठाण्यात व नंतर ठाण्यासमोरील रस्त्यावर ठिया मांडून घोषणाबाजी केली. या दरम्यान आरोपीचा शोध घेत असल्याचे माढा पोलीसांकडून कडून सांगण्यात आले. या काळात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## साहित्य जप्तीचे दिवाणी न्यायालयाचे आदेश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ मार्च -**

अशोका ब्रीजवेज कंपनीतर्फे सा.बां.विभाग पंढरपूर यांचे विरुद्ध लवादाच्या निर्णयानुसार ॲड. प्रशांत शेटे यांचेमार्फत दाखल रक्कम वसूलीच्या न्यायालयीन प्रक्रियेत पंढरपूर येथील पी.डब्ल्यु. डी.चे साहित्य जप्त करण्याचे आदेश पंढरपूरच्या वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधिश श्रीमती एस.एस. पाखले यांनी दिले आहेत.

तीन कोटी ४३ लाख रुपयांच्या वसुलीसाठी बँक खात्याचा तपशीलही दाखल करण्याचे आदेश पारीत करण्यात आले. या प्रकरणाची हकीकत अशी की, अशोका ब्रीजवेज कंपनीस पंढरपूर तालुक्यातील टाकळी अनवली रस्त्याचे टेंडर मंजूर होते. त्याप्रमाणे कंपनीतर्फे काम पूर्ण होऊन त्यांना टोल वसुलीचे अधिकार देण्यात आले. परंतु शासनाकडून त्यांना विकासकामांची पूर्ण रक्कम दिली नाही. हे काम कार्यकारी अभियंता अंतर्गत येत होते. शासनाकडून येणे रक्कमेबाबत उभयतामध्ये वाद झाला. याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरुन सर्वोच्च न्यायालयात माजी न्यायमुर्ती श्रीमती सुजाता मनोहर यांची लवाद म्हणून नियुक्ती केली. या लवादासमोर उभयपक्षांची सुनावणी झाली. लवादाने तीन कोटी ४३ लाख रुपये रक्कम अशोका कंपनीस देणे बाबतचे आदेश दिले. त्याची अंमलबजावणी शासनाकडून झाली नाही. वारंवार मागणी करुन देखील शासनाने कंपनीस सदर निर्णयानुसारची रक्कम दिली नाही. त्यामुळे नाईलाजाने कंपनीने सोलापूर जिल्हा न्यायाधीश यांचेकडे शासनाविरुद्ध दरखास्त दाखल केले. सदर प्रकरण पंढरपूर दिवाणी न्यायालयाकडे वर्ग झाले. या प्रकरणात देखील वारंवार संधी देऊनही रक्कम कोर्टात जमा केली नाही. सदर प्रकरणी शासनाने दाखल केलेल्या उच्च न्यायालयातील याचिका फेटाळण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी ॲड. प्रशांत शेटे यांनी कंपनीच्यावतीने असा युक्तीवाद केला की, रस्ते विकास, बांधणी करणाऱ्या कंपन्यांची बिले दिली गेली नाहीत तर त्याचे गंभीर परिणाम भविष्यातील विकासकामांवर होतील सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्तीचे आदेशही महाराष्ट्र शासन पाळत नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे घटनात्मक पेच होतील पंढरपूर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशांनी सदर युक्तिवाद ऐकुन सा.बां. विभागातील संपुर्ण साहित्य खुर्च्या, टेबल, कपाटे, लॅपटॉप, पंखे, ट्युब आदी वस्तु जप्त करण्याचे आदेश दिले. जप्त मुद्देमाल न्यायालयीन कस्टडीत ठेवण्याचे आदेश दिले. बँक खात्यातील रक्कमेचे तपशील कोर्टात सादर करण्याचे महत्वपूर्ण आदेश दिले आहेत. याप्रकरणी ॲड. प्रशांत शेट,ॲड. उदय बागल (पंढरपूर), ॲड. सचिन गोरवे (पुणे) यांनी काम पाहिले.

## कुर्डुवाडीत दहा दिवसांचे श्रामनेर शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डुवाडी, दि.२२ मार्च -**

कुर्डुवाडी येथे भारतीय बौद्ध महासभा सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम विभाग अंतर्गत माढा तालुक्याच्या वतीने दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचे आयोजन केले आहे.

यामधे बौद्ध धम्माची माहिती दिली जाणार आहे. दहा दिवसात तालुक्यातील प्रमुख गावात श्रामनेर संघाची चारीका होणार असून पूज्य भन्ते धम्मबोधी यांची धम्मदेसना होणार आहे. यासाठी केंद्रीय शिक्षक म्हणून दिलीप सरोदे हे शिबिरार्थीना मार्गदर्शन करतील. शिबिरात जवळपास पंचवीस शिबिरार्थीनी सहभाग नोंदवला असल्याचे भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष अविनाश भालशंकर यांनी सांगितले. शिबिरास बौद्ध उपासकांनी उपस्थित राहण्याचे आवाहनही त्यांनी केले. शिबिरास बौद्ध धम्म परिषद समितीचे विशेष सहकार्य लाभले आहे.

## श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने प्रभू श्रीरामचंद्रांच्या १०१ मूर्तीचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि .२२ मार्च**

येथील श्रीराम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने दि. २३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता १०१ प्रभू श्रीरामचंद्रांच्या मूर्तीचे वाटप करण्यात येणार आहे.



सदर कार्यक्रम प्रियदर्शनी मंगल कार्यालयात माजी खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामीजी, विरक्त मठाचे बसवलींग महास्वामीजी, समाधी मठातील वेदमूर्ती आण्णू महाराज, ह.भ.प. आबा महाराज पाटील कुरनूरकर यांच्या सानिध्यात आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी आ. देवेंद्र कोठे, कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष महेश पाटील, माजी आ. राम सातपुते, अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले, वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, ॲड. प्रदीपसिंह राजपूत, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, माजी नगराध्यक्ष दिलीप शिंदे, माजी नगराध्यक्ष मसलिंगप्पा खेडगी, माजी उपनगराध्यक्ष यशवंत धोंगडे, उद्योगपती गणेश कोळी, उद्योगपती संदीप फुगे, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख संजय देशमुख, माजी उपनगराध्यक्ष महेश डोळे, रिपाई तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे याची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमास राम भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्रीराम उत्सव समितीचे ऋषी लोणारी यांनी केले आहे.




## टेंभूर्णीत बोबडे परिवाराकडून इफ्तार पार्टी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२२ मार्च -**

येथील ओम साईराज मंगल कार्यालयात दि.२१ मार्च रोजी बोबडे परिवारांसह बोबडे पार्टीतर्फे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये मुस्लिम समाजातील बांधव मोठ्या संख्येन सहभागी झाले होते.

सामाजिक एकोपा निर्माण होण्याकरिता इफ्तार पार्टीची मदत होत असून त्यामुळे विचारांची देवाणघेवाण होते. आपण सर्व एक आहोत ही भावना वृद्धिंगत होण्यासाठी रोजा इफ्तार पार्टी महत्त्वाची असल्याचे मनोगत भाजपचे माढा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांनी व्यक्त केले. या इफ्तार पार्टीसाठी मदरसा मस्जिदचे रास्तापुरे रावसाहेब, मक्का मस्जिदचे रहीम तांबोळी, जामा मस्जिदचे रियाज तांबोळी, तिन्ही मस्जिदचे प्रमुख यासह सरपंच सुरजा बोबडे, उपसरपंच राजश्री नेवसे, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक सेलचे शब्बीर जहागीरदार, अनुराधा बोबडे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा स्वराली बोबडे, उद्योजक नागेश बोबडे, दशरथ देशमुख, संतोष तांबडे, आयुब पटेल, सतीश नेवसे, नामदेव धोत्रे, परमेश्वर खरात, श्रीकांत लोंढे, सिकंदर आतार, राहुल टिपाले,बाबा मुलाणी, ग्रामपंचायत सदस्य सचिन होदाडे, नागनाथ वाघे, जयवंत पोळ, बाळासाहेब ढगे, गौतम कांबळे, ग्रा.पं.सदस्य प्रतिनिधी सोमनाथ ताबे, राम पवार यांच्यासह बोबडे पार्टीतील सर्व कार्यकर्ते व मुस्लिम समाजातील महिला व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात आरोग्य जनजागृती कार्यक्रम संपन्न

**माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानचे सजग आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल**

**तभा वृत्तसेवा । दिपक भाकरे**
**सांगोला, दि.२२ मार्च -**




सांगोल्यातील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान संस्थेच्या आरोग्य विभागांतर्गत 'सजग आरोग्याची उभारू गुढी, स्वस्थ कुटुंबाची बसवू घडी' या संकल्पनेवर आधारित आरोग्य जनजागृती कार्यक्रम येथील उत्कर्ष विद्यालयात उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमात सर्वाइकल कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर, पॅपस्मिअर चाचणीचे महत्त्व आणि प्रतिबंधक लसीकरण यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सोलापूर येथील अश्विनी मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलच्या डॉ.माधवी रायते यांनी मार्गदर्शनात आपल्या मानसीक स्वास्थ्यासाठी समतोल पद्धतीचा आहारा ज्यामध्ये प्रथिने, प्रोटीन्स, फळे, कच्च्या भाज्या यांचा योग्य समावेश असला पाहिजे. तरच आपले स्वास्थ्य चांगले राहते असे सांगितले. सिव्हिल हॉस्पिटल सोलापूरच्या डॉ.विद्या तिरणकर यांनी मनोगतात सर्वाइकल कॅन्सर आणि स्तनाच्या कॅन्सरची लक्षणे, कारणे, निदान व प्रतिबंधात्मक उपाययोजन यावर सखोल माहिती दिली. विशेषतः पॅपस्मिअर चाचणी ही महिलांसाठी किती महत्त्वाची आहे आणि ती वेळेवर करून घेतल्यास कॅन्सरच्या धोक्यापासून कसे बचाव करता येऊ शकते, यावर त्यांनी भर दिला. डॉ.निकिता देशमुख यांनी 'एचपीव्ही' प्रतिबंधक लसीकरण कसे व कोणत्या वयात घेणे गरजेचे आहे हे समजावून सांगितले. तसेच यासंबधी सहकार्य करू असेहा त्यांनी सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ.संजीवनी केळकर, खजिनदार डॉ.शालिनी कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, सहसचिव डॉ. केतकी देशपांडे, आरोग्य विभाग प्रमुख डॉ.सुपर्णा केळकर यांनी परिश्रम घेतले. संस्थेच्या सीईओ अश्विनी कुलकर्णी यांनी सुत्रसंचलन केले.

**आ.अभिजीत पाटील यांच्या मध्यस्थीने**

# ऊसतोड वाहतूकदारांचे पंढरपुरातील उपोषण स्थगित

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२२ मार्च -**

ऊसतोड मजुरांचे माध्यमातून कारखान्यांना ऊस पुरवठा करताना ट्रॅक्टर मालक हे मुकादमांना मध्यस्थ धरून मजुरांची टोळी करतात. ती करताना लाखो रुपयांचा अर्थिक व्यवहार मुकादम आणि वाहन मालक यांच्यात होत असतो. मात्र काही मुकादमांकडून वाहनमालकांची मोठ्या प्रमाणात फसवणुक केली जात असल्याच्या घटना घडत आहते. यामध्ये फसवणुक झालेल्या वाहन मालकांना न्याय मिळावा आणि




संबंधित मुकादमांना अटक करावी या मागणीसाठी पंढरपूरात तहसील कार्यालयासमोर स्वाभिमानी ऊसतोड वाहतूक संघटनेच्यावतीने सुरू असलेल्या उपोषणकर्त्यांची आमदार अभिजीत पाटील यांनी भेट घेत फसवणुक झालेल्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे उपोषण थांबविण्यात आले.यावेळी बोलताना आमदार अभिजीत पाटील म्हणाले गेल्या काही वर्षात महाराष्ट्रामध्ये जे ऊस वाहतूकदार आहेत त्यांची मोठ्या प्रमाणावर टोळी मुकादमांकडून फसवणूक होत आहे. राज्यात जो ऊस वाहतूकदार करणारा वर्ग आहे तो छोटा शेतकरी आहे. शेतामध्ये मशागतीसाठी घेतलेला ट्रॅक्टर कारखाने सुरू झाल्यानंतर त्याच्या माध्यमातून ऊस वाहतुकीसाठी लावत असतो. त्यातून मिळणाऱ्या उत्पादनामधून उपजीविका करीत असतो. एक दोन एकर शेती असलेला हा शेतकरी उसाची वाहतूक करतो आणि बाहेरून ऊसतोड मजूर पुरविणारा मुकादम हे २० लाख ते २५ लाख रुपये बिनव्याजी उचल घेत असतो. हे मुकादम अनामत उचल घेऊन आणि करार केल्यानंतरही मजुर पुरवित नाहीत. त्यामुळे फसवणूक होत आहे. परिणामी राज्यात फसवणूक झालेल्या काही ऊस वाहतूकदारांनी आत्महत्याही केली आहे.

या ऊस वाहतूकदारांची फसवणूक होऊ नये यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना सरकारने करावी यासाठी आपण पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्यासह अनेक ठेकेदार व नागरिक उपस्थित होते.

> काबाडकष्ट करून ट्रॅक्टर ठेकेदार ऊसटोळी व्यवसाय करत असतो परंतू त्यांचीच फसवणूक करून मुकादम टोळ्या देत नाहीत. त्यावर पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांना सूचना देऊन तत्काळ कारवाई करण्याचे सांगितले आहे.
>
> **- आमदार अभिजीत पाटील**

# महापालिकेत लोक अदालतीत १० कोटींचा मिळकतकर वसूल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**



सोलापूर महापालिका आवारात शनिवारी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतमध्ये मिळकत करासंदर्भात २ हजार ८४० मिळकतदारांनी हजेरी लावली. १० कोटी १२ लाख ७३ हजार १४९ रुपये मिळकतकर वसूल झाला. १ कोटी ८० लाख २९ हजार ६१३ रुपये सूट मिळवली आहे. १२२ गाळेधारकांनी ९ लाख ९ हजार ७०९ रुपये जमा केले आहेत. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली याचे नियोजन केले होते.

मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांच्या माध्यमातून कर निरीक्षक व कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले. या लोक अदालतीमध्ये मालमत्ता कर विभागाकडून सुमारे २४ हजार, भुमी व मालमत्ता विभागाकडील थकबाकीदार असलेल्या मिळकतदारांची, गाळेधारकांची प्रकरणे तडजोडी करीता दाखल करण्यात आलेली होती. दाखल प्रकरणनिहाय सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यामार्फत संबंधित मिळकतदारांना नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. लोक अदालतमध्ये मिळकतदारांच्या थकबाकीतील नोटीस फि, वॉरंट फि व शास्तीची जी रक्कम आहे

त्यामधील ५० टक्के रक्कम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ''ड'' प्रकरण ८ कराधान नियमातील नियम ५१ नुसार सुट म्हणून देण्यात आली आहे. या लोक अदालतीमध्ये मिळकत कर विभागांतर्गत २७६५ मिळकतदारांनी ६ कोटी ८१ लाख २७ हजार ५३६ रुपये थकबाकी भरली. धनादेशापोटी ७५ जणांनी एक कोटी ५१ लाख १६ हजार रुपये जमा केले. तर मिळकत कर संदर्भात धनादेश सोडून एकूण १ कोटी ८० लाख २९ हजार ६१३ रुपये सूट मिळवली आहे. २८४० मिळकतदारांकडून आज १० कोटी १२ लाख ७३ हजार १४९ रुपये कर वसूल केला आहे. मिळकत कर विभागांतर्गत १० ते २२ मार्च

दरम्यान एकूण ६ हजार ३५४ मिळकतदारांकडून १७ कोटी ४७ लाख ९७ हजार ५५८ रुपये कर जमा झाला आहे. महापालिकेच्या भूमी व मालमत्ता विभागाअंतर्गत १२२ गाळेधारकांकडून ९ लाख ९ हजार ७०९ रुपये वसूल झाले आहेत. या अंतर्गत आतापर्यंत १ कोटी २२ लाख ६८ हजार ५५४ रुपये वसूल झाले आहेत.

**बोजा चढवलेल्या मिळकतीचा १ एप्रिलनंतर होणार लिलाव**

थकबाकी असलेल्या मिळकतीवर बोजा चढविलेल्या मिळकतीचा अधिनियमातील तरतुदीनुसार दि. १ एप्रिल नंतर जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. याची सर्व थकबाकीदार मिळकतदारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.

# अधिकृत बसस्टॉप बनताहेत अनाधिकृत रिक्षास्टॉप

- **विनापरवाना रिक्षांना आर.टी.ओ.चा ''ब्रेक'' आवश्यक !**
- **रिक्षाचालकांच्या मनमानी कारभाराला प्रशासन देणार का फुलस्टॉप?**

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२२ मार्च-**



**सोलापूर : शहरातील व्ही.आय.पी रोडवर बसस्टॉप आहे. या बसस्टॉजवळच रिक्षा चालकांनी रिक्षास्टॉप करून ठेवला आहे. त्यामुळे स्टॉपवर बस आल्यावर प्रवाशांना चढण्यास अडचणी होत आहे. (छाया : केवल तिवारी)**

सोलापूर शहरात परिवहन व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी महापालिकेची असताना, महापालिका मात्र यामध्ये अपयशी किंबहुना पुरेशी ठरताना दिसत नाही. त्यामुळे शहरातील विविध बसस्टॉपचे आता रिक्षास्टॉप मध्ये रूपांतर होताना दिसत आहे. याकडे महापालिका प्रशासनासह परिवहन विभागाचे देखील सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे. शहरातील विविध बस स्टॉपचे रूपांतर रिक्षास्टॉप मध्ये होत असून प्रवासी दिसताक्षणी रिक्षा चालक ब्रेक लावून मनमारी कारभार करताना दिसत आहे. या मनमानीवर प्रशासनाने कुठेतरी ''ब्रेक'' लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

सोलापूर स्मार्ट शहरातील स्मार्ट रस्त्यांवर नेहमीच रिक्षाचालकांचा घोळका असतो. एखादा प्रवासी पायी निघाला असता, मागचा पुढचा कोणताही विचार न करता तात्काळ ब्रेक लावून रिक्षा जागेवर उभी करतात. किंवा बस स्टॉप वर बसची प्रतीक्षा करत असलेल्या प्रवाशांसमोर रिक्षा उभी करून रस्त्यांवर अडथळे निर्माण करतात. असे प्रसंग वारंवार इतर वाहनधारकांना नाईलाजाने सहन करावे लागतात. प्रवाशांची दळणवळण व्यवस्था स्थानिक प्रशासनावर असते. मात्र महापालिका प्रशासनाची परिवहन व्यवस्था मोडकळीस आल्याने, सोलापूरकरांना रिक्षाचा आधार घ्यावा लागत आहे. एकीकडे रिक्षा चालकांनी वाहतुकीचे नियम पाळणे आणि त्यातून आपला उदरनिर्वाह चालवणे गरजेचे असताना तसे तंतोतंत होताना दिसत नाही. शहरातील व्हीआयपी तसेच इतर रस्त्यांवर नेहमीच रिक्षा चालकांची वाढत असलेली मक्तेदारी शहरवासीयांना आणि वाहनधारकांना डोकेदुखी ठरत आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे.

शहराची दळणवळण व्यवस्था महापालिका प्रशासनावर अवलंबून आहे. शहरातील एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी बसेस आवश्यक असताना शहराला बसेसची कमतरता मोठ्या प्रमाणात जाणवते. बस नसल्याने परिवहन व्यवस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अशा स्थितीत नागरिकांना दळणवळणासाठी रिक्षाची मदत घ्यावी लागते. सुसाट बेफाम आणि बेफिक्रेने चालवणाऱ्या रिक्षा चालकांच्या मनमानी कारभारामुळे अनेक अपघात घडतात. शहरातील विविध रस्त्यांवर हे चित्र दिसते. परवानाधारक तसेच विनापरवाना रिक्षाचालकांची संख्या शहरात दिवसेंदिवस वाढत आहे. विनापरवाना रिक्षाचालकांवर आरटीओचे कोणतेही निर्बंध दिसत नाहीत.

### रिक्षा चालकांनी वाहतुकीचे नियम पाळले पाहिजे



सोलापूर शहरातील रिक्षाचालकांनी प्रशासनाने तयार केलेल्या वाहतुक नियमांचे पालन करावे. अपघातासारख्या दुर्दैवी घटना टाळण्यासाठी नियम पाळून व्यवसाय करावा. प्रवासी दिसताक्षणी रस्त्याच्या मधोमध रिक्षा उभी करू नये. मागील वाहनधारकांचा देखील विचार करावा. त्याच पद्धतीने सुसाट रिक्षा न चालवता वेग मर्यादा पाळावी.

**- अनिल क्षीरसागर, वाहनधारक**

### शहरात अनाधिकृत रिक्षांचे पसरते जाळे

सोलापूर शहरात जेवढी परवानाधारक रिक्षाचालकांची संख्या आहे. तेवढ्याच संख्येत विनापरवना रिक्षाचालकांची संख्या आहे. त्यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत जात आहे. अशा विनापरवाना रिक्षाचालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे. कारवाई केली असता, विविध रिक्षासंघटना बंद किंवा इतर मार्गे परिवहन व्यवस्थेला बाधा आणू शकतात. त्यामुळे देखील प्रशासन कडक कायदेशीर कारवाई करण्यास धजावते. त्यामुळे शहरातील नागरिकांसाठी परिवहन व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी कारवाईमध्ये शिथिलता आणली जाते. मात्र याचा रिक्षाचालकांनी कोणताही गैरफायदा घेऊ नये. असे संकेत प्रशासनामार्फत दिले जात आहेत. रिक्षा चालकांनी वाहतुकीचे नियम पाळून तसेच मनमानी कारभाराला ''ब्रेक'' लावून दळणवळण व्यवस्था आणि उदरनिर्वाह उत्तम मार्गे चालवावा. एवढे यानिमित्ताने सांगण्यात येत आहे.

### अनधिकृत तसेच स्क्रॅप रिक्षांची वाढती संख्या

उपप्रादेशिक परिवहन कार्यालय नुसार शहरात अधिकृत परवानाधारक वृक्षाचालकांची संख्या सुमारे १५ हजारांच्या आसपास आहे. परंतु तेवढ्याच संख्येत अनाधिकृत म्हणजेच विनापरवाना रिक्षा चालकांची संख्या जवळपास १५ हजार इतकी आहे. साधारणपणे एकट्या सोलापूर शहरात दुपटीने रिक्षाचालकांची संख्या वाढलेली आहे. मग तसे पाहिले असता सोलापूर शहरात ३० हजाराहून अधिक परवाना व विनापरवाना अशा रिक्षाचालकांची संख्या प्राथमिक स्तरावरून दिसून येते.

# तरूणीचा विनयभंग करून पैशांची फसवणूक; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

महाविद्यालयीन तरूणीशी स्नॅपचॅट ॲपद्वारे मैत्री करून तिचा विनयभंग करून पैशांची फसवणुक करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तरूणीने दिलेल्या फिर्यादीवरुन ओंकार सिध्दाराम दिंडोरी (रा. शेळगी,) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ओंकार दिंडोरी याने पिडीत महाविद्यालयीन तरूणीशी स्नॅपचॅट ॲपद्वारे मैत्री केली. पिडीतेला एका कॅफेमध्ये बोलावून तिला लग्न करण्याबाबत प्रपोज केले. त्यानंतर ओंकार याने आपल्या वडीलांचा ॲक्सीडेंट झाल्याचे सांगून त्यांच्या उपचारासाठी पिडीतेकडून ३२ हजार २०० रुपये ट्रान्सफर करवून घेतले. त्यानंतर पैसे परत मागितले असता ओंकार याने तिचा हात धरून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व पिडीतेच्या भावास मारण्याची धमकी दिली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कर सल्लागाराची ५८ लाखांची फसवणूक

**कार्यालयातील कर्मचाऱ्यांनेच घातला गंडा**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

सोलापुरातील नामांकित कर सल्लागार (चार्टर्ड अकाउंटंट) यांची त्यांच्याच कार्यालयात काम करणाऱ्या व्यक्तीने ५८ लाखांची फसवणूक केली. हा प्रकार शनिवार २२ मार्च रोजी उघडकीस आला आहे. जुलै २०२१ ते एप्रिल २०२४ या काळात ही फसवणूक करण्यात आली.

नंदकिशोर रामनिवासजी काबरा (वय ६२, रा. बुधवार पेठ श्राविका शाळेजवळ सोलापूर) हे सोलापुरातील नामांकित कर सल्लागार आहेत. त्यांच्या कार्यालयात आरोपी लक्ष्मण भीमाशंकर कोनाळे (रा. मल्लिकार्जुन नगर अक्कलकोट रोड सोलापूर) हा अकाउंटंट म्हणून काम पाहत होता. त्याने जुलै २०२१ मध्ये कोनाळे याने छत्रपती शिवाजी चौक परिसरातील कर्नाटक बँकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे एन आर काबरा अँड कंपनी या नावाने बँक खाते उघडले. त्यासाठी फिर्यादी काबरा यांच्या कार्यालयातील त्यांच्या नावाचा शिक्का आणि लेटर पॅड चा वापर आरोपीने केला. आणि तो या कंपनीचा मालक असल्याचे त्याने भासविले.

यानंतर आरोपीने फिर्यादीचे खातेदार तसेच त्यांच्या कामाची फी म्हणून एन.आर. काबरा अँड कंपनी या नावाने आलेले धनादेश आरोपीने स्वतः उघडलेल्या खात्यात जमा करून घेतले ती रक्कम १३ लाख ४७ हजार ३३३ इतकी होती. त्याचप्रमाणे १५ मार्च २०२३ पासून चार एप्रिल २०२४ पर्यंत फिर्यादीच्या खातेदारांनी इन्कम टॅक्स व जीएसटी भरण्याकरिता रक्कम दिली होती. त्याबद्दल आरोपीने बनावट चलन भरणा केलेली पावती खातेदारांना दिली. आणि ती सर्व रक्कम स्वतःच्या फायद्या करिता वापरली. यानंतर आरोपीने खाते रकमांच्या ठिकाणी परस्पर खाते क्रमांक बदलला. त्या ठिकाणी स्वतःसह आणि त्याचे मित्र शशिकांत मसळे, रविकांत मसळे व आनंद म्हंता यांचे खाते क्रमांक जोडले. त्या खात्यांवर फिर्यादींच्या खातेदारांचा येणारा ४४ लाख ६३ हजार ७०९ इतका आयकर परतावा स्वतःच्या फायदा करिता ट्रान्सफर करून घेतला. यामध्ये फिर्यादी आणि त्यांचे खातेदार यांची एकूण ५८ लाख ११हजार ०४२ इतकी रक्कम काढून घेऊन फसवणूक केली आहे. याप्रकरणी नंदकिशोर काबरा यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोडभावी पोलीस ठाण्यात आरोपी लक्ष्मण कोनाळे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड करत आहेत.



# युवासेनेचा युवा विजय दौरा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

युवासेना आयोजित युवा विजय महाराष्ट्र दौऱ्यात युवा सेना शहर जिल्हाच्या वतीने दौरा उत्साहात पार पडला.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते एकनाथराव शिंदे, युवा सेना मुख्य मार्गदर्शक खासदार श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार व युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश भाई सरनाईक, मुख्य सचिव राहुल लोंढे, सचिव किरण साळी व पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा दौरा झाला. युवासेना कॉलेज कक्ष जिल्हाप्रमुख अनिकेत राठोड यांच्या प्रयत्नांनी शहरातील वालचंद, संगमेश्वर, आय टी आय, भारती विद्यापीठ, वसुंधरा या पाच महाविद्यालयांवर युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर, पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक वीरेंद्र मंडलिक, सदस्य शिवाजी जाधव, सुजीत खुर्द, प्रियांका ताई परांडे व युवा सेनेचे जिल्हा प्रमुख प्रियदर्शन साठे, ऋतुराज सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत व विद्यार्थ्यांच्या आणि युवासैनिकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात उद्घाटन पार पडला.

# जिजाऊ रथ यात्रा मंगळवारी शहरात पोहचणार

## सहभागी होण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

मराठा सेवा संघ महाराष्ट्र आयोजित मराठा जोडो अभियान अंतर्गत संपूर्ण राज्यात जिजाऊ रथ यात्रेचे आयोजन केले आहे. संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर साहेबांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १८ मार्च शहाजी महाराज यांचे जन्म दिनी वेरूळ गढी येथून रथ यात्रेस मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला, ४५ दिवसांच्या प्रवासानंतर पुणे येथील लाल महलात रथ यात्रेची सांगता होईल.

रथयात्रे सोबत संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर, मराठा सेवा संघाचे ज्येष्ठ मार्गदर्शक प्रा. अर्जुनराव तनपुरे यांचेसह केंद्रीय पदाधिकारी आहेत. अशी माहिती विभागीय अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी दिली. जिल्ह्यात २३ रोजी सांगोला येथे रथयात्रेचे आगमन व स्वागत होईल मिरवणुकीनंतर पंढरपूरला मुक्काम होईल. पुढे अकलूज टेंभुर्णी मार्गे येऊन कुडूवाडीला मुक्काम. २५ मार्चला कुर्डुवाडी, माढा, अनगर, मोहोळ मार्गे मंगळवारी सायं ५.३० वाजता शहरात छत्रपती संभाजी महाराज चौकात जिजाऊ रथ यात्रेचे भव्य स्वागत होईल. स्वागतनंतर अनेकविध पथकांच्या सोबत




वाद्यासह रथयात्रा मिरवणुकीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात अभिवादन व पूजन करून चार हुतात्मा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन होईल. ७ वाजता नंतर चार हुतात्मा चौकात शाहीर पोवाडे चा कार्यक्रम व त्यानंतर त्याच ठिकाणी मार्गदर्शनपर सभेचे आयोजन केले आहे. अशी माहिती जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. जी. के. देशमुख यांनी दिली. सध्या समाजात एकमेकात असणारा संवाद, समन्वय, ओलावा कमी होताना दिसत आहे. यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी संभ्रम दूर व्हावा. धार्मिक, जातीय व सामाजिक सलोखा निर्माण व्हावा यासाठी पुरुषोत्तम खेडेकर साहेबांनी संपूर्ण समाजाला ''चला पुन्हा एकदा एक होऊन सर्व शक्तिमान होऊया, वाद मिटवून संवाद साधूया '' अशी एकत्र येण्याची हाक दिली आहे. म्हणून जिजाऊ शिवरायांचा एकीचा व नेकीचा संदेश घेऊन ही जिजाऊ रथ यात्रा मंगळवार २५ मार्च रोजी सायं ५.३० वाजता सोलापूर शहरात येत आहे. राष्ट्रमाता जिजाऊंचे दर्शन आणि जिजाऊ शिवरायांचे विचार घेण्यासाठी सोलापुरातील सर्व समाजातील बांधव व भगिनींनी बहुसंख्येने रथयात्रेमध्ये सहभागी व्हावे. असे आवाहन शहराध्यक्ष शिवश्री सूर्यकांत पाटील यांनी केले.




# माळशिरसच्या लोक अदालतीत साडेपाच कोटीची वसुली

**तभा वृत्तसेवा**
**नातेपुते, दि.२२ मार्च -**

माळशिरस तालुका विधी सेवा समितीमार्फत येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे आवारात दि. २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोक आदालतीत ७ हजार ३६३ दाखल पूर्व प्रकरणे ठेवण्यात आली पैकी १ हजार २२४ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली.

याचे उदघाटन माळशिरस जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश तथा विधी सेवा समितीचे अध्यक्ष आर.व्ही. ताम्हाणेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी विविध न्यायालयाचे न्यायाधीश श्री. हुल्ली, श्रीमती धानोरकर, श्री. निहारकर, श्री. पेठे, श्री. देशपांडे, श्री. पाटील यांचेसह माळशिरस वकील संघटनेच्या अध्यक्षा देव आदी प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी मोटार अपघात दावे, एम.एस.इ.बी केसेस व दिवाणी-फौजदारी प्रकरणे ठेवण्यात आली. त्यापैकी तडजोडीने ४१३ प्रकरणे निकाली काढण्यात आली माळशिरस तालुक्यातील नगरपरिषद, नगरपंचायती, ग्रामपंचायतकडील घरपट्टी कर, विविध बँकांचे थकीत कर्ज, एमएसईबीकडील थकित वीज बिले इ. दाखल पूर्व प्रकरणांमध्ये तडजोड होऊन एकूण ५ कोटी ४० लाख ८५ हजार ९४१ रूपयांची वसुली करण्यात आली. वर्षानुवर्षे कोर्टात न्यायासाठी होणारे त्यांचे हेलपाटे वाचले. तसेच मानसिक त्रासापासून त्यांची मुक्तता झाल्यामुळे अनेक पक्षकारांनी समाधान व्यक्त केले.

# संघासाठी जीवन अर्पण

जे का रंजले गांजले, त्यासी म्हणजे आपुले' देव तेथेची जाणावे, तोच साधू ओळखावा, या उक्तीप्रमाणे पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम ९९ टक्के आदिवासी लोकवस्ती असलेल्या मोखाडा तालुक्यात ढेवबांध नदीलगत सह्याद्री आदिवासी बहुविध सेवा संघ संचालिच श्री सुंदर नारायण गणेश संस्कर केंद्रात कार्यकर्ता म्हणून कार्यरत असलेले श्री. वसंत साठे अर्थात येथील प्रत्येक आदिवासी जनसामान्यांचे साठे काका अविरतपणे गेली ४५ वर्षे आदिवासी उन्नतासाठी स्वतःला झोकून देत आहेत. या कार्यासाठी सोडल्यानंतर त्यांच्या गुरुंनी त्यांना सांगितले होते की, या कार्यासाठी आलाय स्वतःच्या पायावर चालत पण जायचंय मात्र चौघांच्या खांद्यावर. गुरुंचा या आदेशाचे साठेकाकांनी आजही पालन केलेले आहे. असे तळमळीचे कार्यकर्तेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बलस्थान आहेत.

त्यांनी आदिवासींची शैक्षणिक, सामाजिक व आरोग्यविषयक प्रगती व्हावी, म्हणून अनेक माध्यामांतुन उपक्रम राबवून आदिवासी वनवासींची सेवा केली आहे. काकाचे आयुष्य खडतर प्रवासामधून बळण घेत मोखाडासारख्या अठरा विश्व दारिद्र्याने पछाडलेल्या भागात येऊन आदिवासींच्या उन्नतीसाठी स्थिरावून आजवर कार्यरत राहिले आहे. साठेकाकांचा जन्म २३ मार्च १९३३ साली सोलापूर येथे झाला आहे. घरची परिस्थिती हलाकीची. त्यांना तीन भाऊ आणि तीन बहीणी, तसेच आई, वडील असा मोठा परिवार त्यामुळे दहावीपर्यंत सोलापूर येथेच शिक्षण घेतले. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारांचा मनावर पगडा बसला आणु पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून संघाने काम करण्यास त्यांनी स्वतःला झोकून दिले. वयाच्या २१ व्या वर्षापासून संघाच्या कामाच्या निरनिराळ्या जबाबदार अंगावर पडल्याने, पूर्ण पणे वेळ संघाचे काम सुरू केले. काकाकडे जनसंपर्क वाढविण्याची कला अवगत असल्याने संघाचे कार्य करत असतांना दांडगा जनसंपर्क निर्माण झाला. साठे काका अविवहित आहेत. म्हणून पूर्ण वेळ कार्यकर्ता राहण्यास त्यांना कुठल्याही अडचणी येत नाहीत. दरम्यान, संघाचे काम सुरू असतानच. मुंबई येथील संघाच्या कार्यालयाची जबाबदारी काळांवर वरिष्ठानी टाकली. त्यावेळी असंख्या उद्योगपती दुकानदार, व्यापारी व स्वयंसेवी संस्था यांच्याशी काकांची जवळीक वाढली त्यांचा फायदा घेत काकांनी संघ परिवारातील संस्थाना आर्थिक मदत मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. सतत २५ वर्षे त्यांनी मुंबईत संघ कार्यलयाची ईमाने ईतबारे जबाबदारी सांभाळली आहे. १९७७ च्या आणिबाणी काळात संघाचा निष्ठावंत कार्यकर्ता असल्याने दोन वर्षे नाशिक कारागृहात कारावासही भोगला आहे. परंतु या कारावासाला न जुमानता काकांनी आपले कार्य पुढे अजून जोमाने सुरु केले.



तथापी कारावासानंतर आदिवासी व वनवासी भागात काकांची खरी वाटचाल सुरू झाली आहे. सध्याही आदिवासी बहुविध सेवा संघाच्या सुंदर नारायण गणेश संस्कार केंद्रात पूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून नियुक्ती झाली. शून्यातून केंद्रात नावारुपास आणण्यास काकांचा सिंहाता वाटा आहे. हे केंद्र केवळ तालुका जिल्हा अथवा राज्यात नव्हतर संपूर्ण भारतभर नावारुपास आले आहे. प्रत्येक क्षेत्रातील नागरिकांची केंद्राशी नाळ जोडली जावी म्हणून काकांनी आपल्या जनसंपर्काच्या कलेतून हजारोंचे या केंद्राशी नाते जोडलेले आहे. देवबांध केंद्रात रुगणसेवा वसतिगृह, गोशाळा, भाऊबिज भेट, स्मृतीवन व वनशेती अशा विविध प्रकाराच्या योजना सुरू करण्यासाठी काकांचे मोठे योगदान आहे. आणि या सर्व योजना आजमितीस सुरू असून कायमस्वरुपी या योजना सुरू राहतील याचे नियोजनही करण्यात काकांचा मोठा सहभाग राहिला आहे.

त्याचप्रमाणे कोरोना आजाराचे ३५०० कुटुंब उपाशी आहेत हे कळल्यावर लगेच ३५०० कुटुंबांना धान्यकिट वाटपाची व्यवस्था केल्याने आदिवासी बांधवांच्या उदराग्नी शांत करुन त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले. दरवर्षी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक साहित्य वाटप करत असतो. त्याचप्रमाणे जि.प. शाळांना लागणारे बेंच, सतरंज्या, स्कूल बॅग, छत्र्या भाऊबीज भेट-उत्सव दरवर्षी देवबांध परिसरातील एक गांव (ग्रांमपंचायत) त्या मधील ७ ते ८ पाडे घेऊन ६०० भगिनींना नवीन साडी, फराळ पुडा व भोजन दिले जाते. दीपावलीच्यानंतर येणाऱ्या पहिल्या, फराळ व भेटवस्तू शहरातून गोळा केल्या जातात व त्याला शहरी बांधव निधी व अन्नदान आदीसाठी तत्परतने प्रतिसाद देतात, असा अनुभव आहे. याच माध्यमातून देवबांध परिसरातील १० गावात भजनी मंडळांना भजनाचे साहित्य भेट देण्यात आले आहे. त्यातून धर्मजागरणाचा एक यशस्वी प्रयोग संस्थेने केला आहे.

**- भगवान खैरनार**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : अक्कलकोट रोडवरील वळसंग टोळ नाक्यावर शनिवारी दुपारी सिमेंट वाहतूक करणाऱ्या बल्कर वाहनाने अचानक पेट घेतला. त्यावेळी अग्निशामक दलाच्या जवानांनी पाणी व फोम चा वापर करून आग आटोक्यात आणली. यामध्ये बल्कर वाहन जळून खाक झाले आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### कुलसचिव घारे ८ एप्रिलला मुंबई विद्यापीठात रुजू होणार

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर



विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे या मुंबई विद्यापीठात आपल्या मूळ पदावर ८ एप्रिलला रुजू होतील. मुंबई विद्यापीठातून त्या लीनवर या विद्यापीठात कुलसचिव पदावर रुजू झाल्या होत्या. मुंबई विद्यापीठाने लीन रदद् केल्यामुळे कुलसचिव पदावरून ७ एप्रिलला कार्यमुक्त करण्यासाठी त्यांनी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांच्या अर्ज केला असल्याचे सौ. घारे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना सांगितले.

### गरम पाण्यात हात घातल्याने १३ महिन्याचे बाळ भाजले

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

अंघोळीसाठी तापवलेल्या पाण्यात हात घातल्याने १३ महिन्याचे बाळ भाजून जखमी झाले. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी ७.३० वाजता उत्तर सोलापूर तालुक्यातील डोणगाव येथे घडला. आरव युवराज राठोड (वय १३ महिने) असे बालकाचे नाव आहे. शुक्रवारी सायंकाळी अंघोळीसाठी पाणी गरम केले होते. ते पाणी ठेवलेल्या भांड्यात आरव याने हात घातल्याने त्याचा उजवा हात भाजला. त्यास रात्री ८ वाजता वडील युवराज राठोड याने उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### चक्कर येऊन पडल्याने नावदगीत तरुणीचा मृत्यू

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

अक्कलकोट तालुक्यातील नावदगी शिवारात अचानक चक्कर येऊन पडल्याने तरुणीचा मृत्यू झाला. ही घटना शुक्रवारी दुपारी ३.३० च्या सुमारास घडली. ऐश्वर्या श्रीशैल हत्ती (वय २१, रा. नावदगी ता. अ. कोट) असे तरुणीचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी ३.३० च्या सुमारास ऐश्वर्या ही तरुणी नावदगी शिवारात असताना तिला अचानक चक्कर आल्याने ती खाली पडली. त्यात तिची शुध्द हरपल्याने तिला वडील सोमनाथ पुजारी यांनी सायंकाळी ७.१० वाजता शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### छातीत दुखून श्वास घेण्यास त्रास झाल्याने विवाहितेचा मृत्यू


**सोलापूर, दि. २२ मार्च -**

छातील दुखून श्वास घेण्यास त्रास झाल्याने विवाहितेचा मृत्यू झाला. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप येथे घडला. लक्ष्मी शंकर टेळे (वय २७) असे विवाहितेचे नाव आहे. १८ मार्च रोजी सकाळी आठ वाजता लक्ष्मी यांना राहत्या घरी असताना अचानक छातील दुखून श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तिला खासगी रुग्णालयात उपचारास केले. तेथून रात्री ९.४० वाजता पती शंकर याने शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारादरम्यान शनिवारी मध्यरात्री तिचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कार दुचाकीला धडकल्याने दोघे जखमी

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

सोलापूर ते मंद्रुपच्या दिशेने दुचाकीवर जाताना पाठीमागून कारची धडक बसल्याने दोघे जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी सायंकाळी ५.४० वाजता केएलई शाळेजवळ घडला. मिथून हरिश्चंद्र राठोड (वय ३६) व रवि धनसिंग राठोड (वय ३८, दोघे रा. घोडातांडा




ता द सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत. सोलापुरातील केएलई शाळेजवळून मिथून आणि रवि असे दोघे दुचाकीवर बसून घोडातांडाकडे शुक्रवारी सायंकाळी ५.४० वाजता जात होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या चार चाकी कारच्या चालकाने दुचाकीला धडक दिली. यात डोक्याला आणि पोटाजवळ जखम होऊन मिथून तर दोन्ही हात व पायाला खरचटल्याने तसेच डोक्याला मुकामार लागल्याने श्रीकांत राठोड याने दोघांना सायंकाळी ६.३० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# यंदा पहिलीपासून राज्यात सीबीएसई अभ्यासक्रम

## एनसीईआरटीच्या धर्तीवर अंमलबजावणी; शिक्षकांमध्ये कहीं खुशी, कहीं गम

**तभा वृत्तसेवा । अमोगसिद्ध मुंजे**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

राज्यात येत्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांसाठी एनसीईआरटीच्या धर्तीवर सीबीएसई केंद्रीय मंडळाच्या वेळापत्रकाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या नव्या बदलानुसार पहिलीच्या वर्गाची नवीन पुस्तके येत्या जूनपूर्वी उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्यात नवीन शैक्षणिक धोरणानुसार, एनसीईआरटीच्या धर्तीवर असलेल्या अभ्यासक्रमानुसारच पुस्तके तयार केली जात आहेत. पहिली ते बारावी पुस्तकेही यानुसार टप्प्याटप्प्याने बदलणार आहेत. ही संपूर्ण प्रक्रिया पाच वर्षांत पूर्ण केली जाणार आहे. याबरोबरच राज्यात टप्प्याटप्प्याने सीबीएसई केंद्रीय मंडळाचे वेळापत्रक लागू करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून शाळांचे शैक्षणिक वेळापत्रक सीबीएसई प्रमाणे केले जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून सीबीएसईच्या वार्षिक वेळापत्रकानुसार १ एप्रिलपासून नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात होणार आहे. सीबीएसई अंतर्गत असलेली पाठ्यपुस्तके इंग्रजी व हिंदी माध्यमात उपलब्ध आहेत. मराठीसह अन्य माध्यमांसाठी ती उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्य मंडळांच्या शाळांचे वार्षिक वेळापत्रक १५ जूनपासून सुरू होत आहे. सीबीएसईमुळे शाळा आणि शिक्षण क्षेत्रातून अनेक प्रतिक्रिया उपस्थित होत आहेत. अनेक शिक्षक व पालकांनी सरकारच्या निर्णयाचे स्वागत केला आहे. सीबीएसई अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना सर्वांगिण ज्ञान, केंद्रीकृत संस्थांमध्ये भविष्यातील संधी, सकारात्मक विद्यार्थी परीक्षा वातावरण, विद्यार्थी अनुकूल अभ्यासक्रम, लवचिक शिक्षण, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणासाठी फायदा होणार आहे. शिवाय जीवनविकास कौशल्य विकसित होणार आहे. विद्यार्थ्यांच्या समग्र विकासावर लक्ष केंद्रीत असणार असून स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरणारा अभ्यासक्रम असणार आहे. इंग्रजी माध्यमांमधील शाळांकडून विद्यार्थ्यांची होणारी लूट थांबणार आहे.त्यामुळे शिक्षकांमधून सीबीएसईचे स्वागत होत आहे.

अनेक शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी सीबीएसईच्या अभ्यासक्रमाबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. यामुळे राज्यातील व स्थानिक संस्कृती, परंपरा व कला यांचे महत्व कमी होणार आहे. क्रांतीकारक व थोर पुरूष यांचे चरित्र संक्षिप्त व थोडक्यात शिकविले जाणार आहे. ग्रामीण भागातील शिक्षकांना इंग्रजी भाषा कठीण जात असल्याने इतिहास, भूगोल, परीसर अभ्यास यासह इतर विषयांचे अध्ययन व विद्यार्थ्यांना अध्यापन करताना अडचणी येणार आहेत. सीबीएसई वेळापत्रक तीस मिनिटाचे असल्याने जि.प. शाळेत राबविताना अडचण येणार असून एकाच शिक्षकाला तीस मिनिटाचे नऊ तास शिकविणे कठीण जाणार आहे. म्हणून सीबीएसई अभ्यासक्रमाबद्दल नाराजी आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात कहीं पे खुशी कहीं पे गम दिसून येते.

### शैक्षणिक अनुभवाची ग्वाही



शालेय अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेचा सुधारणा करणे आणि विद्यार्थ्यांच्या एकसारख्या शैक्षणिक अनुभवाची ग्वाही देणे आहे. समान शैक्षणिक पॅटर्न, व्यावसायिक मार्गदर्शन, इंटरनॅशनल पॅटर्न नवीन तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षण व विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि शारीरिक विकासावर लक्ष्यामुळे विद्यार्थी जागतिक स्तरावर प्रतिस्पर्धा करण्यास सक्षम होतात.

**- श्रीकांत भरले,**
**संस्थापक अध्यक्ष, ट्रॉय पब्लीक स्कूल हत्तूर**

### भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हावेत



सीबीएससी अभ्यासक्रम हा गणित, विज्ञान व स्पर्धात्मक परीक्षेवर भर देणारा असल्याने सध्याच्या स्पर्धात्मक युगामध्ये व जागतिक पातळीवर स्वतःला सिद्ध करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम योग्य वाटतो. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून हा अभ्यासक्रम अंमलात आणण्यापूर्वी शिक्षकांना सीबीएससी पॅटर्न प्रमाणे प्रशिक्षण देणे व ग्रामीण, दुर्गम भागातील शाळेच्या भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध असणे ही गरजेचे वाटते.

**- सीता पाटील**
**जिल्हा परिषद शाळा कोरवली**

### महान व्यक्तींचा इतिहासात समावेश असावा



या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करून विद्यार्थ्यांना उन्हाचा त्रास होऊ नये याचाही विचार होणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमात केंद्रीय पातळीवर बदल करून महाराष्ट्र राज्यातील थोर नेते क्रांतिकारक व इतर अनेक महान व्यक्तींच्या कार्याचा इतिहासात समावेश असावा. जेणेकरून महाराष्ट्राची ओळख विद्यार्थ्यांना होईल .

**- उज्वला साळुंखे,**
**सुरवसे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सोलापूर**

### सीबीएसई काळाची गरज

आयआयटी, नीट, जेईई सारख्या स्पर्धात्मक परिक्षेत स्टेट बोर्डचे विद्यार्थी सीबीएसई विद्यार्थ्यांच्या तुलनेत मागे असल्याचे दिसते. याचे एकमेव कारण म्हणजे अभ्यासक्रमातील तफावत हेच दिसून येते. म्हणून सीबीएसई वर आधारित शिक्षण स्वागतार्ह आहे. परंतु हे पेलण्यासाठी शिक्षक व विद्यार्थी सक्षम असणे गरजेचे आहे .शिक्षकांना प्रशिक्षित करणे व बालवयात विद्यार्थ्यांचा पाया भक्कम करणे काळाची गरज आहे.

**-संजीवकुमार बगले,**
**श्री कोचिंग क्लासेस, मंद्रुप**

### संस्कृतींना महत्व कमी

सीबीएसई अभ्यासक्रमामुळे स्थानिक, राज्यातील थोर महापुरूषांचे चरीत्र थोडक्यात असणार आहे. शिवाय कला, परंपरा व संस्कृती यांना फारसा महत्व नसणार आहे. मायभाषेत शिक्षण नसल्याने विद्यार्थ्यांना अध्यापन कठीण जाते. देशात समान अभ्यासक्रम असल्याने अनेक अपरीचित गोष्टी समजण्यास अवघड होते. विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक आहे.

**- भालचंद्र शिंदे, कलाशिक्षक, मंद्रुप**

### राज्य अघाडीवर येण्यास मदत



विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम प्रचंड वाढला आहे. याच बाबींचा विचार करून स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळविणे तसेच जागतिक स्तराव नेतृत्व करणारा सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी सीबीएसई पॅटर्न राबविला जात आहे. ग्रामीणमधील विद्यार्थ्यांना सर्व गोष्टींचे ज्ञान मिळते. यातून शालेय शिक्षणात महाराष्ट्र निश्चितच आघाडीवर येईल.

**- शुभांगी पवार**
**जिल्हा परीषद शाळा, बीबी दारफळ, उत्तर सोलापूर.**

### इंग्रजी शाळांमधील लूट थांबणार



यापूर्वी राज्य बोर्ड व सीबीएसई अभ्यासक्रम समांतरच होता. त्याच पद्धतीने सीबीएसई अभ्यासक्रम तयार केला आहे. राज्य शासनाने सीबीएसई अभ्यासक्रम सर्व शाळांमधून सुरू करण्याचा घेतलेला निर्णय योग्य आहे. त्यातून ग्रामीण भागातील मुले शहरी मुलांशी स्पर्धा करू शकतात. याशिवाय सीबीएसईच्या नावाने इंग्रजी शाळांकडून होणारी पालकांची लूट थांबणार आहे.

**- वाघेश शास्त्री, मुख्याध्यापक,**
**उध्दवराज शाळा, सोलापूर**

### विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण



इयत्तापहिलीच्याविद्यार्थ्यांसाठीसीबीएसई पॅटर्न नुसार शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. यामुळे विदयार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार शिक्षण मिळेल. हा अभ्यासक्रम व पाठ्यक्रम जीवन विकास कौशल्य विकसित करणारा असून देशापातळीवर अभ्यासक्रमात समानता राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या समग्रविकासावर लक्ष केंद्रित करणारा आहे. स्पर्धा परीक्षा तयारीसाठी उपयुक्त आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच जेई व नीटसाठी फायदेशीर असणार आहे.

**- पंडित साबा, अध्यक्ष,**
**दक्षिण सोलापूर तालुका, प्राथमिक शिक्षक संघ**

### नोकरीच्या संधी उपलब्ध



देशभरातील विद्यार्थाना सातत्यपूर्ण, सुव्यवस्थित आणि दर्जेदार शिक्षण मिळेल. विद्यार्थ्यांना विविध संकल्पना सखोलपणे समजतात. आणि याचा फायदा स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी मदत होते.

देशात इतर भागातही त्रासमुक्त स्थलांतर करण्याची परवानगी मिळेल. मुलांच्या समस्या सोडवण्याच्या कौशल्यावर भर देत असल्याने विद्यार्थ्यांचा करिअर विकास, कौशल्य वाढीस मदत मिळेल तसेच भविष्यात विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीच्या संधी मिळतील.

**-शांता बोलदे , शिक्षिका**
**जिल्हा परीषद शाळा , स्वन्नेवस्ती कंदलगाव**

## पत्नीवर कुऱ्हाडीने घाव घालून खूनाचा प्रयत्न

**पतीविरुध्द गुन्हा दाखल**

**नई जिंदगी मधील घटना**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर कुऱ्हाडीने घाव घालून तिच्या खुनाचा प्रयत्न करणाऱ्या पतीविरुध्द एमआयडसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



शबाना मैनुद्दीन पिरजादे (वय रा. सिध्देश्वर नगर भाग ३, नई जिंदगी, सोलापूर) असे जखमी पत्नीचे नाव आहे. याबाबत अलिशा उर्फ अलमान मैनुद्दीन पिरजादे (वय १४) या मुलीच्या फिर्यादीवरुन मैनुद्दीन अलीसाब पिरजादे याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२० मार्च रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास राहत्या घरी मैनुद्दीन पिरजादे याने पत्नी शबाना हिच्या चारित्र्यावरसंशय घेऊन तिला शिवीगाळ करून लोखंडी पाता व लाकडी दांडका असलेल्या कुऱ्हाडीने शबाना हिस तुझे जान से मारता हूं, जिंदा नही छोडूंगा असे म्हणून डोक्यात घाव लावून गंभीर जखमी केले. त्यामुळे याबाबत एम आयडीसी पोलिस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.





## विध्यावाचस्पती शंकर अभ्यंकर प्रवचन

**सोलापूर : कै.नागेश सहस्त्रबुद्धे यांच्या प्रथम पुण्यस्मरणनिमित्त शनिवार सायंकाळी किर्लोस्कर सभागृहात देवी भागवतविध्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांचे प्रवचन झाले. (छायाचित्र : केवल तिवारी)**

### उदरनिर्वाह करण्यासाठी करीत होता चोरी

# ७२ वर्षीय चोरटा पोलिसांच्या ताब्यात

**१४ सायकलींची चोरी उघड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

उदरनिर्वाह करण्यासाठी सायकल चोरी करणाऱ्या एका फिरस्ती चोरट्यास पोलिसांनी ताब्यात घेतले त्याच्याकडून शहरातील पाच पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोरीला गेलेल्या १४ सायकली जप्त केलेल्या आहेत.

बाबुलाल शामलाल कुकरेजा (वय ७२ रा चिप्पा चाळ, भैय्या चौक,सोलापूर)असे गुन्हा नोंद झालेल्या आरोपीचे नाव आहे. शहर गुन्हे शाखेचे सहा पोलिस निरीक्षक संदीप पाटील व त्याचे पथक गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करीत होते. त्यावेळी त्यांनी सदर




बझार पोलिस ठाण्याकडील हिस्ट्री शीटर बाबुलाल कुकरेजा यास चौकशीसाठी ताब्यात घेतले,त्याच्याकडे कौशल्यापूर्वक तपासणी केली असता आरोपीने एकुण १४ सायकल चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. शहरातील १२ दखलपात्र व दोन अदखलपात्र असे एकुण १४ गुन्हे उघड झाल आहेत. आरोपीवर या अगोदर ही चोरीचे गुन्हे दाखल असून तो सराईत गुन्हेगार आहे. त्याच्या मागे कोणीच नातेवाईक नसून तो फिरस्ती आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलिस निरीक्षक संदीप पाटील, पोलिस अंमलदार विजयकुमार वाळके, विद्यासागर मोहिते, तात्यासाहेब पाटील, गणेश शिंदे, उमेश पवार या पथकाने केली.

## दुचाकी चोरट्यांना पाठलाग करून पोलिसांनी पकडले

**९ दुचाकींसह साडे तीन लाखांचा मुद्देमाल केला जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

अक्कलकोट रोड, हिंदू स्मशान भूमी जवळ चोरीची दुचाकी विक्री करण्यासाठी आलेल्या चोरट्यांना पोलिसांनी शिताफीने पाठलाग करून त्यांना पकडले. दोघा चोरट्यांना अटक करीत त्याच्या ताब्यातील ९ दुचाकी असा एकुण साडे तीन लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कामगिरी शहर गुन्हे शाखेच्या पथकाने केली आहे.

आयान उर्फ वडा सैफन मुच्छाले (वय १९ रा मुस्लीम पाच्छा पेठ,सोलापूर), असिफ म.हुसेन बडेपीर(वय १८ रा. मुस्लीम पाच्छा पेठ, इकबाल फॅशनजवळ) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

जेलरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अक्कलकोट रोड, हिंदू स्मशानभूमी येथे दोन व्यक्ती चोरीची दुचाकी विकण्याकरीता थांबल्याची माहिती पोलिसांनी मिळाली. जेलरोडचे डीबी पथक लागलीच सदर घटनास्थळी पोहोचले. त्या ठिकाणी दोन जण विना नंबर प्लेटची दुचाकी घेवून थांबलेले दिसले. पोलिस आल्याचे पाहताचा चोरट्यांनी पळ काढला. पोलिस अंमलदारांनी शिताफीने पाठलाग करून त्यांना लागलीच पकडले. त्यांनी आयान मुच्छाले व असिफ बडेपीर अशी नावे सांगितली. त्याना त्याच्या ताब्यातील दुचाकी संदर्भात विचारणा केली असता त्यानी उडवा उडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे अधिक विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्यांनी ९ दुचाकी जेलरोड पोलिस ठाण्याच्या विविध ठिकाणाहून चोरी केल्याची कबुली दिली. चोरी केलेल्या दुचाकीचे स्पेअर पार्ट काढून विक्री करण्याच्या उद्देशाने ठेवल्याचे चोरट्यांने सांगितले. असा प्रकार एकुण साडे तीन लाख रुपये किंमतीच्या ९ दुचाकी चोरीचा गुन्हा उघड केला आहे. ही कामगिरी सहा पोलिस निरीक्षक निलेश पाटील सोनवणे, पोलिस उपनिरीक्षक सातपुते, शरीफ शेख, गजानन कणगीरी,संतोष वायदंडे या पथकाने केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६४

**मना बोलणे नीच सोशीत जावे ।**
**स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।।**

त लहान सहान कारणावरुन का असेना, इतराशी झालेला वाद-विवाद, भांडणतंटा, वैर, बदल्याची भावना या बाबी मानवाला आहे त्या किंवा प्राप्त होणा-या सुखापासून काही प्रमाणात का होईना पण दूर नेतात. एखादयाशी कोणत्याही कारणास्तव भांडणतंटा करावा लागला तर काही काळ का होईना त्या व्यकितबद्दल संताप होऊन वैराची भावना निर्माण होते. ही भावना किंवा असे विचार आपल्या मुळ मानवी विचारात बदल करतात. एखाद्याबद्दल आपल्या मनात द्वेष, वैर निर्माण होते. जेंव्हा आपल्या मनात द्वेष, वैरभावना निर्माण होते तेंव्हा आपण बैचैन होतो. बेचैन होतो म्हणजेच आपली शांतात भंग होते. आपण अशांत होतो. आपली अशांती आपणाला आहे त्या सुखापासून दूर नेतेच पण आपल्याबरोबर आपल्या सहवासात असणा-यांनाही सुखापासून दूर नेते. वाद-विवाद, भांडण तंट्यासाठी अनेक बाबी कारणीभूत असतात. या अनेक बाबींपैकी एक बाब म्हणजे एखादयाने आपणाला किंवा आपल्या एखादयाला उणे-दुणे, हाणुन-पाडून, टाकून-घालून बोलणे ही होय. दुस-याने अयोग्य बोललेले आपण किंवा आपल्या वतीने एखादयाने ऐकलेले असते. असे ऐकलेले बोलणे आपण सहन करीत नाहीत. या बोलण्याने आपणाला चीड येते, राग येतो, समोरच्याचा बदला घ्यावा वाटतो,



त्यासाठी आपण आपली प्रतिष्ठा, शक्ती पणाला लावण्याची तयारी करतो आणि त्यामुळे मुळ सुखापासून आपण दूर जाऊ लागतो.

ईतरांनी आपल्या बद्दल एकही अपशब्द बोलू नये किंवा ईतरांनी आपल्या बद्दल चांगलेच बोलावे अशी अपेक्षा करणे चुक आहे. आपण इतरांबद्दल बोलतांना विचारपुर्वक बोलावे. आपले बोलणे अकारण कोणाला तरी खुपेल, टोचेल असे नसावे. आपण तीन माकडांची चित्रे पाहिली असणार. ही तीन चित्रे मानवी जीवनाचा आदर्श, मानवी जिवनात आनंद मिळविण्याचा मार्ग दाखविणारी आहेत. एका माकडाने आपल्या तोंडावर हात ठेवला आहे, तो हात मी खोटे किंवा इतराबददल वाईट बोलणार नाही असे दर्शवितो. कानावर हात ठेवलेले माकडाचे चित्र मी वाईट, अयोग्य, नकोते ऐकणार नाही हे दर्शविते. डोळ्यावरील हात ठेवलेले चित्र मी वाईट, अयोग्य पाहणार नाही असे दर्शविते. अर्थात, आपल्यासाठी, समाजासाठी जे सुखकारक नाही, म्हणजेच जे अयोग्य आहे त्या बाबी आपण पाहायच्या, ऐकायच्या, बोलायच्याच कशाला ?. अशा बाबतीत आपण आपल्या डोळ्यावर, कानावर, तोंडावर हात ठेवणे योग्य असते. एखाद्या वेळेस कोणी आपल्याबद्दल वाईट बोलले तर ते सहन करण्याची मानसिकता आपण ठेवायला हवी. यामुळे आपणाला आनंद तर मिळेलच पण आपल्याबरोबर इतरांनाही आनंद मिळेल. या अनुषंगाने श्री समर्थ रामदास स्वामींचे,

मना बोलणे नीच सोशीत जावे ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावे ।।

हे वचन लक्षात ठेवावे. अशाने आपल्या जीवनातील आनंदलहरी निश्चितच वाढतील.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - चांगला दिवस, शहीद दिन |
| दि. २३ मार्च २०२५ | जागतिक हवामान दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४६ | |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. नवमी (२९.३८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पूर्वाषाढा (२८.१७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वरियान (१७.५७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - तैतिल (१७.३६) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : बिकट परिस्थितीतही आपण सावरू शकतो. सम ाजाकडून मान : सन्मान मिळेल, प्रतिष्ठा वाढेल, धन : संपत्ती मार्ग सुचतील. शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता, प्रवास होईल.

**वृषभ** : विचारविनियम करण्यास वेळ मिळेल. कार्य, धंद्याात गती चांगली राहील. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल. विनाकारण दुसऱ्या भानगडीत पडण्यापासून मुक्त रहा.

**मिथुन** : काही विशिष्ट कामात व स्थिती आपल्या बदल घडवून येईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता. उद्योग:धंद्याद वाढ होण्याची शक्यता. विद्यार्थ्यांना यश मिळेल.

**कर्क** : स्पर्धा करण्यासाठी आपली अनुकलता नसणार. सामाजिक कार्य चांगले राहील. कौटुंबिक चिंता करण्याची काळजी नाही.

**सिंह** : लाभ व मान-सन्म ान आपल्या भाग्यात उपयोगी पडेल. भावांकडून लाभ होण्याची शक्यता, समन्वय असणे आवश्यक आहे. खाण्यापिण्यावर लक्ष द्या.

**कन्या** : चांगली बातमी आपल्याला उत्साही बनवेल. कामात येणारे अडथळे दूर होण्याची शक्यता. कर्जापासून अंतराने राहावे. केलेल्या काम ावर खुशी राहील.

**तुळ** : मोठी हानी होण्याची शक्यता. शारिरीक स्वास्थ्यावर लक्ष दया. सांभाळून व गोड बोला. हलगर्जीपणा व स्वार्थीपणा परिणामकारक आहे.

**वृश्चिक** : राजकीय क्षेत्रात बदल होण्याची शक्यता. त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करा. जीवनात स्थिती सामान्य राहील किंचित वाढेल. दुसऱ्याची प्रशंशा करू नका.

**धनु** : आळस करू नका, नवीन ओळखीचा फायदा होईल. उद्योग:धंद्यात आपला विजय निश्चित मानला जातो. आर्थिक व्यवहार काटेकोरपणे करावा.

**मकर** :जवळच्याकडून सावधानता बाळगून कामे करा. प्रगतीच्या होईल.धनलाभ संभवतो. उद्योगधंदा चांगला होईल. कामे झाल्यामुळे प्रसन्नता वाटेल.

**कुंभ** : आपल्या कामात भरभराट होईल. अर्धांगीणीबरोबर भावनात्मक समस्या निर्माण होतील. प्रवास योग असल्याने सुखाचा होईल. जिवनात यश मिळेल. आनंदी रहाल.

**मीन**: योजना फायद्याची राहील. दिवस मागे केलेल्या कामांमुळे चांगला, प्रगतीकारक बनवेल. जमीन वाहन, मशीन आदी ठिकाणी लाभ होण्याची शक्यता. दुसऱ्यांच्या कामात हस्तक्षे करू नका. महिलांना आनंदी दिवस राहील.

# कलचुरी राजवंशातील महाराणी जयतादेवीचा शिलालेख सापडला

## नितीन अणवेकर यांच्या संशोधनास यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

सोलापूर तुळजापूरच्या सीमेवर दिंडेगाव आहे. येथे भलामोठा दुर्लक्षित शिलालेख आहे अशी माहिती मिळताच समाजसेवक ज्ञानेश्वर कदम यांच्या समवेत इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर यांनी शिलालेखाची पाहणी केली. तो शिलालेख कलचुरी राज वंशातील महाराणी जयता देवीची स्तुती करणारा शिलालेख असल्याचे निष्पन्न झाले.

दिंडेगाव येथे शिलालेख असल्याचे समजताच ऐतिहासिक सर्वेच्या निमित्ताने अणवेकर तेथे गेले. त्यांनी शिलालेखाचे ठसे घेतले. पुरातत्व संशोधन विशाल फुटाणे यांच्याशी संपर्क साधला त्यानंतर पुणे येथील संशोधिका सायली पलांडे दातार व हळ्ळेकन्नड लिपीचे गाढे अभ्यासक पुरातत्व संशोधक डॉ श्रीनिवास पडीगार यांच्याशी संपर्क साधला असता हा शिलालेख महाराणी जयतादेवीचा असून तो देशात प्रथमच सापडला असल्याचे सांगितले. त्यांनी अणवेकर यांचे कौतुक केले. दिंडेगावी सापडलेला जयतादेवीचा शिलालेख दहा फुट उंचीचा असून दोन फुट रूंद आहे. तो राणीची प्रशस्ती लिहिण्यासाठी घेतला होता. परंतू तीन फुटा पर्यत संस्कृत व कन्नड भाषेतील श्लोक कोरल्यानंतर जयतादेवी राणीची स्तुती प्रारंभ होताच तो पूर्ण न करता अर्धवट सोडून देण्यात आला आहे.सापडलेल्या शिलालेखात संभू (नमस्तुंग-शिरसुंबी इ.) आणि विष्णूचे वराह रूप (जयत्यविष्कृतम् विष्णोर्ववरहम् क्षोभितार्णवम् इ.) ची





स्तुती करणारे पहिले दोन संस्कृत श्लोक आहेत. यात जोगामा ते रायमुरारी सोविदेवा (११६७-७६) पर्म्मदी, बिज्जला दुसरा या राजांची वंशावळीची माहिती आहे. त्यानंतर रायमुरारी सोयदेवाची राणी जयतादेवीच्या स्तुतीसाठी कन्नड श्लोक आहेत. शिलालेख राणीची स्तुती झाल्यानंतर अचानक थांबतो. पुढचे लिखाण नाही. पुढील आठ फुटावर कोणताही मजकूर कोरण्यात आलेला नाही.शिलालेख नऊ लिंगेश्वर मंदिराच्या संदर्भातील असून मंदिरामध्ये नंदीच्या पाठीवर शिवलिंग विराजमान आहे.त्या शिवलिंगावर नऊ शाळुंखी आहेत. असे अद्भुत शिवलिंग देशात दुर्मिळ असून याच वैशिष्ट्य शिवलिंगाची प्रतकृती शिलालेखाच्या वरील बाजूस कोरलेले आहे.या वरून हा शिलालेख नवलिंगेश्वर मंदिराच्या संदर्भातील असल्याचे दिसून येते.

### जयतादेवीचा शिलालेखामुळे संशोधनास नवे वळण

इ.स ११६७ हे वर्ष बसवकल्याण येथे लिंगायतांची व बिज्जल राजाची राजतरंजित अशी कल्याणक्रांती झाली. त्यात अनेक लिंगायत शिवशरण आणि शिवशरणी यांच्या प्राणाची आहुती पडली. लिंगायत आणि बिज्जल राजा यांच्यातील संघर्षात महात्मा बसवन्ना यांनी कृष्णा व मलप्रभा नदीच्या संगमावर कुडलसगम येथे समाधी घेतली. त्यानंतर प्रतिक्रिया म्हणून लिंगायत गणेचारी दलानी बिज्जल राजाचा राजमहलात घुसून वध केला. या धमधूमीच्या काळात या राणीच्या प्रशस्तीचे लिखाण अर्धवट सोडून देण्यात आले. जयतादेवीचा शिलालेख सापडल्यामुळे या संशोधनाला चालना मिळेल..

**- विशाल फुटाणे, इतिहास पुरातत्व संशोधक**

### असे शिल्प देशात प्रथमच

नंदीच्या पाठीवर शिवलिंगाचे शिल्प आणि त्यावर नऊ साळुंखी असे शिल्प देशात प्रथमच दिसून आले आहे. सातारा येथील पाटेश्वर उत्तर भारतातील कालिंजर येथील प्राचीन मंदिरामध्ये नंदीच्या पाठीवर शिवलिंग आहे. परंतु या दोन्ही ठिकाणच्या पेक्षा हे शिवलिंग आकाराचे मोठे आहे. यावरून सोलापूरच्या या परिसरात मत्तमयूर ही शैवपशुपात संप्रदायाची एक शाखा येथे असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**- साईली पलांडे दातार, इतिहास पुरातत्व संशोधिका पुणे**

# ईच्छा भगवंताची परिवाराकडून पार्थ पवार यांना वाढदिवसानिमित्त दिल्या शुभेच्छा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र युवा नेते पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर येथील ईच्छा भगवंताची मित्र परिवाराच्या वतीनं राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांनी त्यांच्या वाढदिनी उपक्रम राबवत, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील पुस्तकांचे पार्थ पवार यांचा तुलाभार करून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुंबई येथील देवगिरी निवासस्थानी हा उपक्रम पार



पाडला. या सत्कार सोहळ्याप्रसंगी खा. सुनेत्रा अजित पवार, राष्ट्रवादी युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, बारामती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निरीक्षक सुरेश पालवे, सोलापूर शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष संतोष पवार,उदय माने, मोहित नायडू, सोलापूर राष्ट्रवादी शहर उपाध्यक्ष किरण शिंदे, राष्ट्रवादी शहर सरचिटणीस अमोल जगताप, शहर संघटक माणिक कांबळे, हुलगप्पा शासम,शहर संघटक ऋषी येवले, लखन जाधव मुंबई,दीपक आरगेल, महादेव राठोड, आनंद गावडे आदींची उपस्थिती होती.

# श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या अध्यक्षपदी संदीप महाले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ अध्यक्षपदी संदीप महाले, कार्याध्यक्षपदी बाबुराव क्षीरसागर यांची निवड करण्यात आली.

श्रीराम जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या उत्सव समिती २०२५-२६ बैठकीत ही निवड झाली. सचिवपदी नागेश मंजेली, सहसचिवपदी सिकंदर कतारी, प्रसिद्धी प्रमुख रोहन श्रीराम, मीरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख पदी ओंकार होमकर, उत्सव उपाध्यक्षपदी अनिल अंजनालकर, अर्जुन शिरकुल, माधवी अंधे, विराज अलकुंटे



यांची नियुक्ती पत्र देण्यात आले. महामंडळाच्या वतीने प्रभू श्रीराम चंद्र जयंती साजरा करून प्रत्येक मानवाला धर्म, अर्थ,काम, मोक्ष, मिळण्याकरिता श्रीराम जयंतीच्या एक दिवस अगोदर होम हवन यज्ञ करण्यात येणार असल्याचे पंडित वेणुगोपाल जिल्ला यांनी सांगितले.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्याना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केलं. याप्रसंगी मध्यवर्ती महामंडळाचे पंडित वेणुगोपाल जिल्ला पांतलू, संजय होमकर, संजय साळुंखे, अक्षय अंजिखाने, सुधीर बहिरवाडे, गणेश चिंचोळी, भिम ाशंकर पदमगोंडा, सागर अतनुरे, यतीराज होनमाने, शिवराज गायकवाड, सतिष पारेली, अर्जुन मोहिते, विश्वनाथ प्याटी, भिमाशंकर जमादार, बिपिन पाटील, विजय कुलथे, लक्ष्मण सरवदे, केतन अंजिखाने, नरेश ताटी, अमर गट्टी, विठ्ठल सरवदे उपस्थित होते.

## सोमवारी सामुदायिक साखरपुडा सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

वीरशैव लिंगायत गवळी समाज सोलापूरच्या वतीने सोमवार दि. २४ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता सोलापुरातील बलिदान चौक, तुळजापूर वेस मोफत सामुदायिक साखरपुडा सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती अध्यक्ष मनोज मलकुनाईक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी आ. विजयकुमार देशमुख, माजी सभागृह नेते संजय कोळी, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, माजी नगरसेवक किरण देशमुख, जगदीश पाटील, अनंत जाधव, विक्रांत वानकर, राजकुम ार पाटील, मनीषा हुच्चे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सोहळ्याचे हे चौथे वर्ष आहे. तुळजापूर वेळेस युवा गवळी समाज या उपक्रम ाचा आयोजक आहे. या पत्रकार परिषदेत केदार जानगवळी, किसन अंजीखाने, संतोष रानसरजे, सचिन अंजीखाने, सागर दहीहंडे, मयूर अंजीखाने उपस्थित होते.



# बोरामणी कुरण पर्यटन केंद्रात विद्यार्थ्यांची वनशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**

जगभर २१ मार्च हा दिवस जागतिक वन दिन म्हणून साजरा केला जातो. वनांचे महत्त्व अधोरेखीत करण्यासाठी विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये वनसंरक्षण आणि संवर्धन विषयक जनजागृतीपर कार्यक्रम शासकीय स्तरावरुन राबवले जातात.

याचाच एक भाग म्हणून उपवनसंरक्षक कार्यालय सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र कार्यालय सोलापूर यांच्या नियोजनामध्ये बोरामणी कुरण पर्यटन केंद्र येते जागतीक वन दिनाच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामधे वनपरिचय, संवर्धन मार्गदर्शन, जंगल सफारी, वन भोजनाचे (अल्पोपहार) नियोजन करण्यात आले. कार्यक्रमास खडकी येथील जिल्हा परिषद शाळेचे साठ विद्यार्थी आणि शिक्षक उत्साहाने सहभागी झाले.

या सहलीमधे काळवीट, निलगाय हे प्राणी आणि पखूर्डी, मॉन्टेग्यूचा भोवत्या, पठाणी होला , ठिपकेवाला होला, अनेक प्रकारचे चंडोल, सातभाई, खाटीक, चिरक, बुलबूल, ब्राह्मणी मैना, वेडा राघू, जांभळा शिंजीर, भारद्वाज असे माळावरचे पक्षी, अनेक प्रकारची फुलपाखरे प्रत्यक्ष पाहुन विद्यार्थी भारावून गेले. यावेळी जीआयबी फाउंडेशनतर्फे वन्यजीवांचे छायाचित्र आणि माहिती असलेल्या फलकाद्वारे वनपरिचय करुन दिला. राजकुमार कोळी यांनी विद्यार्थ्यांना छायाचित्रे आणि माहिती फरकाची ओळख करुन दिली. कार्यक्रमास सोलापूर वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित कुमार गांगुर्डे हे प्रमुख मार्गदर्शक लाभले. वनपाल शशिकांत सावंत, बोरामणी कुरण पर्यटन केंद्राचे व्यवस्थापक पंकज चिंदरकर, जीआयबी फाउंडेशनचे सचीव राजकुमार कोळी उपस्थित होते. वनसेवक आदित्य शिंदे, बसवराज हीरोळे, भिमान्ना नायकोडे, युवराज पाटील, सचिन साळुंखे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## झोपेच्या ६० गोळ्या खाल्याने एकजण उपचारास दाखल

**सोलापूर, दि. २२ मार्च-**

राहत्या घरी अज्ञात कारणातून झोपेच्या ६० गोळ्या खालल्याने एकास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले होते. त्यास सायंकाळी उपचार करून घरी सोडण्यात आले. हा प्रकार शुक्रवारी दुपारी १.३० वाजता घडला होता.



सिध्देश्वर चंद्रकांत हायगुंडे (वय ४४, रा. न्यू संतोष नगर, सोलापूर) असे व्यक्तीचे नाव आहे. शुक्रवारी दुपारी १.३० वाजता राहत्या घरी सिध्देश्वर याने अज्ञात कारणातून झोपेच्या ६० गोळ्या खालल्या. त्यानंतर त्यास दुपारी ३.३० वाजता मित्र योगेश जगताप याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले. तो शुध्दीवर होता. त्याच्यावर उपचार करून त्यास सायंकाळी ५.३० वाजता घरी सोडण्यात आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## पतीकडून पत्नीला लोखंडी रॉडने मारहाण

**सोलापूर, दि. २२ मार्च -**

पतीकडून पत्नीला विनाकारण रॉडने मारहाण करून जखमी करण्यात आले. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडकबाळ येथे घडला. प्रतिभा आमसिध्द बनसोडे (वय ३२, रा. वडकबाळ ता द सोलापूर) असे जखमी विवाहितेचे नाव आहे. राहत्या घरी पती आमसिध्द याने विनाकारण लोखंडी रॉडने मारल्याने प्रतिभा यांच्या डोक्याला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने भाऊ प्रविण गडेराव यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी वार्षिक तपासणी दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २२ मार्च -**

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी हे सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या वार्षीक तपासणी दौऱ्यावर असून २० मार्च रोजी त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी, करमाळा विभाग येथे तपासणी घेतली.

वार्षीक तपासणी दरम्यान उपविभागातील सर्व पोलीस ठाण्यांच्या वार्षीक कामगिरीचा आढावा घेवून अभिलेखांची पडताळणी केली. तसेच उपविभागातील पोलीस अधिकारी यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. फुलारी यांना नुकतेच महामहीम राष्ट्रपती पोलीस सेवा पदक हे दुसऱ्यावेळी मिळाल्याबद्दल करमाळा येथील नागरिकांतर्फे त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला आहे. तसेच वर्षभरात चांगले काम करणाऱ्या पोलीसांना प्रशिस्तपत्र देवून सन्मानीत करण्यात आले आहे. २१ मार्च विशेष



पोलीस महानिरीक्षक यांनी पंढरपूर येथे भेट देवून पंढरपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीतील भक्तीसागर (६५ एकर) परीसरात वृक्षारोप केले. त्यानंतर पंढरपूर शहर पोलीस ठाणे अंतर्गत काळा मारूती या पोलीस चौकीचे उद्घाटन केले. पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे पंढरपूर शहरातील वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी, समस्त वारकरी, विश्व वारकरी सेना तसेच वारकरी संप्रदाय पाईक संघ यांचेकडून भक्तीमय व पारंपरीक पध्दतीने सत्कार करण्यात आला. पंढरपूर येथील सराफ असोसिएशन, व्यापारी समिती, पोलीस पाटील संघटनेच्या वतीने सत्कार झाला.

पंढरपूर शहर व सांगोला पोलीस ठाण्याची तपासणी करण्यात आली. यावेळी पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलिस अधिकारी अजीत पाटील, अर्जुन भोसले, स. पोलिस अधिक्षक अंजना कृष्णा, परिविक्षाधीन पोलिस उपअधिक्षक राहूल मडावी आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलक:- (८६) आदर्श

श्री गुरुजींच्या वडिलांचे नाव सदाशिवराव व आईचे नाव लक्ष्मीबाई आहे. हे दोघेही

ताई-भाऊजी नावाने परिचित होते. या ताई- भाऊजींच्या नऊ लेकरांमध्ये फक्त हा माधव जिवंत राहिला होता. हा माधव बालपणापासून तल्लख बुद्धिमत्तेचा होता आणि इतरांची दु:खे व अडचणी दूर करण्यासाठी मित्रत्वाचे नाते जोडणारा होता. हा माधव शिकत कुठे होता ! मध्य प्रदेशातील महाकोशल विभागातील अंतर्भागातील सरायपल्ली या खेड्यातील शाळेत. कारण येथील शाळेत भाऊजी हे ज्ञानदानाची आस्था असलेले सच्चरित्र शिक्षक होते व ताई धर्मपरायण स्त्री होती. करारीपणा, निस्तृहपणा, कर्तव्यनिष्ठा, धर्मनिष्ठा, परिश्रम शीलता आणि ज्ञानोपासनेची आवड हे गुण श्री गुरुजींच्या जीवनात माता-पित्यांच्या जिवंत आदर्शा मुळे प्रकटले आहेत व या थोर आदर्शाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख श्री गुरुजींनी अनेक वेळा केला आहे.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त वृत्त



## कुसमोड येथील जिल्हा परिषद शाळेस स्वच्छ शाळा सुंदर शाळा पुरस्कार

**पिलीव, दि. २२ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर शाळेस मरवडे (ता. मंगळवेढा) येथील छत्रपती शिवाजी सांस्कृतिक व क्रिडा मंडळाच्या वतीने स्वच्छ शाळा सुंदर शाळा हा पुरस्कार प्रसिद्ध कवी इंद्रजित भालेराव, शिवाजी काळुंखे, छत्रपती परिवाराचे सुरेश पवार व इतर मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देणयात आला. मुख्याध्यापक सुहास कोल्हे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत घडयाळे, उपाध्यक्षा स्वाती गारुळे, माजी अध्यक्ष व शिक्षणतज्ञ प्रा संजय पाटील, नंदीनी मदने,पल्लवी मदने, पूनम लवटे, ज्ञानेश्वर मदने, नाथा मदने, मनोज मदने, संजय मदने, राहुल मदने, सहशिक्षक सुनिल डुरे, शिक्षक नेते रमेश सरक, अमोल नष्टे, राजु चौरे यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला.




## पाण्याचा वापर जपून करा : प्रा. ढोबळे

**करकंब, दि. २२ मार्च-**

पाण्याचे महत्व सांगताना पाणी जपून का वापरले पाहिजे?,त्याचे निसर्गावर होणारे दुष्परिणाम, घरगुती नळाला तोट्या बसविणे, जमिनीतील पाणीपातळी वाढण्यासाठी पाणी आडवा पाणी जिरवा यासारखे उपक्रम राबवणे आवश्यक आहे. पृथ्वीवरील पाण्याचे स्रोत अत्यंत मर्यादित आहेत वरचेवर पाण्याचा वापर वाढत असून यापुढील काळात पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे मनोगत विज्ञानशिक्षिका मनिषा ढोबळे यांनी व्यक्त केले. करकंब येथील रामभाऊ जोशी हायस्कूल येथे जागतिक जलदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी स्काऊट मास्टर महादेव पुजारी, प्रा. विनय कुलकर्णी यांनीही पाणी बचतीचे महत्त्व सांगून त्याचा योग्य प्रकारे नियोजन करून कश्या प्रकारे वापर करावा याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. हेमंत कदम यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनींना पाण्याची बचत करण्यासाठी शपथ दिली. याप्रसंगी प्रा. हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, स्काऊट मास्टर महादेव पुजारी, नरसिंग एबोते, प्रा. विनय कुलकर्णी, प्रा. नागेश घुले, प्रा. सुरेश दहिगिरे, प्रा. संजय पाटील, सोमनाथ माने, शकूर बागवान, अफ्रिन शेख आदी उपस्थित होते.



## दिर्घायुष्यासाठी दात निरोगी असणे गरजेचे : डॉ. सावन पालवे


**अकलूज, दि. २२ मार्च-**

आजच्या धावपळीच्या युगात निरोगी शरीरासाठी मौखीक आजार होवु नये याची काळजी घेणे गरजेचे आहे. निरोगी शरीरासाठी आणि दिर्घायुष्यासाठी दात निरोगी असणे महत्वाचे आहे ,असे मत अकलूज येथील दंतरोग तज्ञ डॉ. सावन पालवे यांनी व्यक्त केले. माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघ व रूद्रा डेंटल क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने माळशिरस तालुक्यातील पत्रकारांसाठी मोफत दंत रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी डॉक्टर सावन पालवे यांनी निरोगी दातांचे महत्व, दातांचे आजार आणि त्यावरील ऊपचारांची माहिती दिली. यावेळी तालुक्यातील पत्रकार माळशिरस तालुका मराठी पत्रकार संघाचे मार्गदर्शक चंद्रकांत कुंभार भाग्यवंत नायकुडे , कदम-पाटील, राजेंद्र मिसाळ, कृष्णा लावंड, नागेश लोंढे, गणेश जाधव, बापू नायकुडे यांच्यासह तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते. पुढे बोलताना डॉक्टर सावन पालवे म्हणाले की,पत्रकार हा समाजातील महत्वाचा घटक आहे.निरोगी समाजासाठी पत्रकार निरोगी असणे अत्यंत गरजेचे आहे. पत्रकार हे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करुन समाजासाठी अहोरात्र योगदान देत असतात. त्या सामाजिक बांधिलकीतून आणि सुप्रसिद्ध ह्रदयरोग तज्ञ डॉक्टर एम.के.इनामदार हे दरवर्षी पत्रकारांची मोफत आरोग्य तपासणी करत आले आहेत. त्यांचा आदर्श घेवुन रूद्रा डेंटल क्लिनिक च्या वतीने ही दरवर्षी पत्रकारांची मोफत दंत रोग तपासणी करण्यात येणार आहे असेही त्यांनी सांगितले.

## जवाहर महाविद्यालयात गणित प्रकल्प सादरीकरण उपक्रम

**अणदूर, दि. २२ मार्च-**

जवाहर विद्यालयात गणित प्रकल्प सादरीकरण उपक्रम घेण्यात आला. मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी, रोहित मोरे, प्रशांत धर्मसाले यांनी उपक्रमाचे औपचारिक उदघाटन केले.या गणित सादरीकरण उपक्रमात सातवी वर्गातील चाळीस विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता.गणित प्रकल्पात हॅन्डमेड तयार केलेले, संख्येचा उतरता क्रम, संख्येचे प्रकार, वर्ग संख्या, घन संख्या, थ्रीडी शेप, घड्याळ, मापनाची साधने, घातांकाचे नियम, पायथ्यागोरसचा सिध्दांत, वर्तुळाचे घटक, संख्याचे विस्तारित रूप, लसावि-मसावि इत्यादी संकल्पना प्रकल्पातून सादर करण्यात आल्या होत्या. या उपक्रमांतर्गत उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या मैथिली राजमाने, कादंबरी महाबोले, श्रावणी हगलगुंडे, अनाम इनामदार, रेवती गायकवाड या पाच विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य बक्षीस देऊन सन्मानित केले. या गणित प्रकल्प सादरीकरण उपक्रमास विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी भेट दिली. या प्रकल्प सादरीकरण उपक्रमास गणित शिक्षक बाबासाहेब शिंदे, तानाजी कार्ले, अमोल रोकडे, अनिल धर्मसाले, शितल गिते, पूजा कुळमेथे, आवटे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हा उपक्रम राबविण्यासाठी पल्लवी मैत्री यांनी परिश्रम घेतले.



# वैराग तालुका निर्मितीच्या मागणीकडे वेधले लक्ष

### अधिवेशनामध्ये आ. दिलीप सोपलांनी उठवला आवाज

**तभा वृत्तसेवा**
**वैराग दि २२ मार्च**

बार्शी तालुक्याचे आमदार दिलीप सोपल यांनी अधिवेशनामध्ये वैरागकरांच्या दोन प्रश्नावर आवाज उठवून सभागृहाचे लक्षं वेधून घेतले आहे. एक वैराग तालुका निर्मिती आणि दुसरा ग्रामीण रुग्णालयाचा प्रश्न अधिवेशनामध्ये मांडला आहे. या दोन प्रश्नांमूळे वैरागकरांच्या अपेक्षा पुन्हा एकदा उंचावल्या आहेत. आतापर्यंत बार्शी तालुक्यातील कोणतीही निवडणूक असू द्या ती वैराग तालुका निर्मितीच्या विषयाशिवाय पार पडलेली नाही. वैराग तालुका निर्मितीचा विषय शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, कॉंग्रेस आणि भाजपा अशा सर्व पक्षानी हाताळल्यानंतर वैराग तालुका होऊ शकला नाही.



खासदारकी असो वा आमदारकी, जिल्हा परिषद असो वा पंचायत समिती प्रत्येक निवडणूकीत वैराग तालुका निर्मितीचा विषय गाजतोच, वैराग तालुका निर्मितीचा विषय आजपर्यंत प्रत्येक पक्षाने सोयीप्रमाणे चिघळला आहे. पण वैराग तालुका मात्र निर्माण करू शकले नाहीत ही वैराग भागाची शोकांतिका म्हणावी लागेल.

वैराग भागाचा सर्वांगीण विकासासाठी वैराग तालुका होणे महत्वाचे आहे. त्यासाठी सुमारे तीस वर्षापासून वैराग भाग तालुका होण्याची वाट बघत आहे. तालुक्यातील एकमेव मुख्य असलेली भोगावती नदी,तीन मध्यम प्रकल्प, संतनाथ कारखाना, शैक्षणिक संस्थाचे माहेरघर, उपबाजार समिती, पोलीस ठाणे, प्रशस्त शासकीय इमारती व मोकळ्या जागा, तुळजापूर -उस्मानाबाद-मोहोळ-माढा-बार्शी-उ. सोलापूर अशा सर्व तालुक्यांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण, शेती-प्रगतीचा चढता आलेख, आवश्यक असलेली लोकसंख्या, दळणवळणाच्या सुविधा, जिल्ह्याला जोडणारा जवळचा मार्ग, अध्यात्मिक वारसा अशा अनेक वैशिष्टपूर्ण बाबी लाभल्या असतानाही अद्याप तालुका होऊ शकलेला नाही. यापेक्षा लहान असणाऱ्या ग्रामपंचायतीचे तालुक्यामध्ये रूपांतर झाले मात्र वैरागचा विषय रेंगाळतच राहीला. तालुका निर्मितीसाठी अनेक वेळा मागण्या, आंदोलने झाली मात्र राजकीय अनास्थेमुळे आजपर्यंत पदरी निराशाच पडली आहे .

३० वर्षापासून वैराग ग्रामीण रुग्णालयाची मागणी असून देखील याकडे पुढारी, नेतेमंडळीचे दुर्लक्ष असून हा प्रश्न भिजत ठेवला आहे. वैराग नगरपंचायत, बाजार उपसमिती, व्यापारी वर्ग, शैक्षणिक व दळणवळणाचे केंद्र म्हणून ओळखले जाणारे वैराग शहर आहे. वैरागच्या परिसरातील सुमारे ५७ गावांतील लोकांचा दररोज वैरागशी संपर्क असतो. वैराग शहरामध्ये परिसरातील गावांसाठी स्वतंत्र पोलीस स्टेशन आहे. या भागामध्ये दररोज विविध प्रकारचे गुन्हे घडत असतात. अपघात, मारामारीच्या प्रसंगी रूग्णांच्या सेवेसाठी याठिकाणी ग्रामीण रुग्णालय नसल्याने बार्शी किंवा सोलापूरला उपचारासाठी न्यावे लागते. असे प्रसंग नेहमीच घडतात. वैराग शहराची व परिसरातील गावांची लोकसंख्या पाहता व वैराग मध्ये ग्रामीण रुग्णालयाची मागणी गेल्या ३० वर्षांपासूनची असताना देखील आज पर्यंत रुग्णालय न निर्माण झाल्याने तात्काळ उपचाराअभावी अनेकांना रस्त्यामध्येच जीव गमवावा लागल्याचे प्रसंग घडले आहेत. वैरागकरांच्या मागणी नंतर सोलापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी नवीन ग्रामीण रुग्णालय निर्माण झाली. परंतु वैरागकरांना नेहमीच राजकीय पुढारी व प्रशासनाकडून डावलले गेले. कोरोना संसर्गाच्या महामारीच्या सुरुवातीच्या काळात राज्याचे उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्री, पालक मंत्री यांना वैरागच्या ग्रामीण रुग्णालयाच्या पूर्ततेबाबत ग्रामस्थ व विविध राजकीय, सामाजिक संघटनांच्या वतीने निवेदन दिल्यानंतर लवकरात लवकर ग्रामीण रुग्णालयाची उभारणी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. परंतु ते आश्वासन हवेतच राहिले आहे. आता आ. दिलीप सोपल यांनी अधिवेशनामध्ये वैरागकरांच्या ग्रामीण रुग्णालयाच्या मागणीची मागणी केलीने शासनाने याकडे राजकीय दृष्टीने न पाहता आरोग्याच्या दृष्टीने पहावे. वैराग भागातील लोकांचे असलेले वैराग तालुका निर्मिती आणि ग्रामीण रुग्णालय या मागण्या अधिवेशनामध्ये मांडल्या असून याकडे वैरागकरांचे लक्षं लागून राहिले आहे.




## पोलिस पाटील संघटनेच्यावतीने पोलिस महानिरीक्षक सुनील फुलारी यांचा सत्कार

**करकंब, दि. २२ मार्च-**

कोल्हापूर परिक्षेत्र पोलीस महानिरीक्षक मा.सुनील फुलारी यांना केंद्रीय गृहमंत्रालयाकडून उत्कृष्ट प्रशासकीय सेवेसाठी दुसऱ्यांदा राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल पोलीस पाटील संघटनेच्यावतीने त्यांचा यथोचित सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. देशातील ३५ लाख पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यातून हा पुरस्कार दिला जातो. यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर,पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले पोलीस पाटील संघटनेचे राज्य प्रसिद्ध प्रमुख तोफिक शेख,जिल्हाध्यक्ष ॲड. नानासाहेब शिंदे,पोलीस पाटील स्वप्निल लोखंडे, अनिल पाखरे, वैभव चंदनशिवे, पोलीस पाटील प्रतिनिधी पंडित देठे, कृष्णा इंगळे उपस्थित होते.

## मळोली येथील दर्गा बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२२ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील मळोली येथील दर्गा बंधाऱ्यासाठी विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रयत्नाने व स्टेट फंडातून एक कोटी एकवीस लाख रुपयाचा निधी मंजूर होऊन बंधाऱ्याचे काम ही उत्कृष्ट पद्धतीने प्रगतीपथावर चालू चाहे.

बंधाऱ्याची वारंवार मागणी अरविंद जाधव यांनी आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडे केली होती त्यांच्या मागणीचा व वस्तुस्थितीचा विचार करून दर्गा या ठिकाणी बंधार्यास स्टेट फंडातून एक कोटी एकवीस लाख रुपयाचा निधी मंजूर केला असून सदर बंधाऱ्याचे काम उत्कृष्ट पद्धतीने प्रगतीपथावर चालू असून सदरच्या कामाची अभियंता जे .ई. शिंदे यांनी कामाची पाहणी करून कामाचा दर्जा उत्कृष्ट असल्याची शिफारस केली आहे सदरचे काम नियमाप्रमाणे चालू असून सद्यस्थितीत सदरचे काम ५० टक्के पर्यंत झाले असून सदरचे काम पूर्ण होतात राज्य विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व विधानसभेचे आमदार उत्तमराव जानकर व मान्यवरांच्या हस्ते समारंभपूर्वक उद्घाटन केले जाणार असल्याची माहितीअरविंद जाधव यांनी माध्यमाशी बोलताना दिली आहे. दर्गा बंधाऱ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीसाठ्यात वाढ होऊन लगतच्या विहिरीला पाणी फुटणार असून शेतीच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याचे त्यांनी सांगितले.




## महिलेला मारहाण तर अल्पवयीन मुलीशी गैरवर्तन; आरोपी फरार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.२२ मार्च-**

शहरातील रिंग रोड परिसरात एका महिलेवर तिच्या पूर्वीच्या ओळखीच्या व्यक्तीने घरात घुसून मारहाण व विनयभंग केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी दि. २० रोजी सकाळी घडली. या हल्ल्यात महिलेच्या १४ वर्षीय मुलीलाही आरोपीने मारहाण व अश्लील भाषेत शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. पोलिसांत या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला आपल्या दोन मुलांसह राहते व ब्युटी पार्लर चालवते. आरोपी किरण शिवाजी कटके (रा. उपळाई रोड, बार्शी) याच्याशी तिची २०१४ पासून ओळख होती. गुरुवारी सकाळी १० वाजता संशयित आरोपी कटके हा मोटारसायकलवरुन पीडितेच्या घरासमोर आला व शिवीगाळ करु लागला. महिला घरात जाऊ लागली असता आरोपीने घरात घुसून लाकडी काठीने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तिला मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले.

दरम्यान, शाळेतून परत आलेली तिची १४ वर्षीय मुलगी आईला सोडवण्यासाठी पुढे सरसावली असता आरोपीने तिलाही मारहाण करुन तिच्यासोबत अश्लील वर्तन केले व अश्लील भाषेत शिवीगाळ केली. या घटनेनंतर महिला पोलीस ठाण्याकडे जात असताना आरोपीने तिला रस्त्यात थांबवून पुन्हा मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## डॉ. जितेंद्र जळकुटे यांना पीएच.डी. पदवी

**बार्शी दि. २२ मार्च-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय,



बार्शी येथील इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. जितेंद्र जळकुटे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर या विद्यापीठातून इंग्रजी विषयातील पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. विद्यापीठात झालेल्या मुलाखती दरम्यान सेलू येथील प्रोफेसर डॉ. निर्मला पद्मावत, चेअरमन म्हणून प्रोफेसर डॉ. प्रभाकर कोळेकर उपस्थित होते. त्यांनी आतापर्यंत २४ पुस्तकांचे लेखन देखील केलेले आहे. त्याचबरोबर पाच संशोधन प्रकल्प देखील त्यांनी पूर्ण केलेले आहेत. कर्मवीर वाचन संस्कृती, बार्शी या शैक्षणिक उपक्रमाच्या माध्यमातून जवळपास २० हजार विद्यार्थ्यांना वाचन संस्कृतीमध्ये सहभागी करुन घेतलेले आहे. सध्या ते शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय बार्शी येथे इंग्रजी विषयाचे अध्यापन करत आहेत. त्यांना जवळपास १६ वर्षांचा अध्यापनाचा अनुभव आहे. आतापर्यंत त्यांना विविध संस्थेच्या १३ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. त्यांच्या या यशाचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे व सहसचिव ए. पी. देबडवार यांनी केले. शालेय समितीचे चेअरमन डॉ. जी.एम. पाटील, प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी देखील त्यांचे अभिनंदन केले.

## डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त करकंब येथे पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२२ मार्च-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिवस सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक स्वरूपाचा प्रमुख भारतीय सण व उत्सव म्हणून भारत व जगामध्ये साजरा केला जातो. आंबेडकरवादी अनुयायी, दलित व दलितेतर नागरीकही हा दिवस समतादिन म्हणून तर महाराष्ट्र शासन ज्ञानदिन म्हणून साजरा करते.

शंभरपेक्षा अधिक देशातील अनुयायांकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात येते.या अनुषंगाने करकंब



ता.पंढरपूर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या.प्रथमतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा व प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्रिवार अभिवादन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रजनीकांत शिंदे यांची तर उपाध्यक्ष नेताजी शिंदे,मिरवणूक प्रमुख मनोज शिंदे, खजिनदार गजानन शिंदे, सचिव गोपाळ शिंदे, सहसचिव प्रकाश मोरे यांची प्रमुख सल्लागार सुरेश शिंदे, महेंद्र शिंदे, बापू शिंदे, राजू शिंदे, राजू खरे, वंशदिप शिंदे यांच्या उपस्थितीत एकमताने निवड करण्यात आली. यानिमित्त विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.याप्रसंगी भागवत लोंढे, आप्पा शिंदे, प्रदीप खंकाळ, सचिन शिंदे, आकाश शिंदे, हनुमंत शिंदे, दीपक शिंदे, सुहास शिंदे, शंकर सरवदे उपस्थित होते.

## माढ्यात युवा ग्रुपच्या वतीने १ एप्रिलपासून नाईट क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २२ मार्च-**

युवा ग्रुपच्या वतीने माजी आमदार धनाजीराव साठे यांच्या ८५ व्या वाढदिवसानिमित्त नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा १ एप्रिल पासून सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेच्या मैदानावर सुरू होणार आहे. ही स्पर्धा माढा शहरातील क्रिकेट शौकिनांसाठी परवणी असणार आहे. या स्पर्धेत पुणे, मुंबई, सोलापूर, धाराशिव या शहरी भागासह अनेक तालुक्यातून संघ नोंदणी करत आहेत. या स्पर्धेत प्रथम बक्षीस १ लाख द्वितीय बक्षीस ७१ हजार तृतीय बक्षीस ४१ हजार चतुर्थी बक्षीस २१ हजार तसेच इतर वैयक्तिक बक्षिस असणार आहेत. ही स्पर्धा संत कुर्मदास सहकारी साखर कारखान्याचे संचलन दादासाहेब साठे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असल्याचे आयोजक नगरसेवक नाना साठे यांनी सांगितले. या स्पर्धे साठी स्वराज्य ग्रुप, वेदांत स्पोर्ट, महाराष्ट्र स्पोर्ट, तुफान स्पोर्ट, क्रांती मंडळ यांचे सहकारी लाभत आहे.

# करकंब ग्रामपंचायतच्या वतीने होम मिनिस्टर कार्यक्रम

## प्रियंका माने पैठणी, सुषमा गायकवाड नथ तर आनंदीबाई धायगुडे ठरल्या सोन्याच्या ठुशीच्या मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. २२ मार्च-**

जागतिक महिला दिनानिमित्त करकंब येथे चंदुकाका सराफ व करकंब ग्रामपंचायतच्या वतीने महिलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने टिळक चौक करकंब येथे होम मिनिस्टर अर्थात खेळ पैठणीचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रियंका माने प्रथम क्रमांक पैठणी, सुषमा गायकवाड द्वितीय क्रमांक सोन्याची



नथ तर आनंदीबाई धायगुडे तृतीय क्रमांक सोन्याची ठुशीच्या मानकरी ठरल्या.या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित इतर महिलांनाही बक्षिसे देण्यात आली. तळ्यात मळ्यात, उखाणे, ग्लास पाडणे, डोक्यावर पाण्याचा ग्लास घेऊन चालणे, पाणी नृत्य, प्रश्नमंजुषा इत्यादी स्पर्धांमुळे कार्यक्रमात रंगत आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुचेता देशपांडे होत्या. सरपंच तेजमाला पांढरे, ग्रामपंचायत सदस्या कल्पना देशमुख, वैशाली देशमुख, बाळुबाई खारे, वंदना शहा, मानसी शाह, मेनल शाह, गिरीजा जाधव, सुरैय्या आतार उपस्थित होते. सूत्रसंचालन अबोली व्यवहारे, दिपक बावळे (बारामती) यांनी केले. कार्यक्रम यशस्वी व्हावा यासाठी प्रा. सतीश देशमुख, राजेश शाह, सचिन शिंदे, मनोज शाह व चंदुकाका सराफ पंढरपूरच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### सन्मान व बक्षीसे

मनोज ट्रेडिंग कंपनी व ग्रामपंचायत सदस्या कल्पना देशमुख यांच्यावतीने बाई संजय शिरसकर, शोभा भंडारे, चंद्रमाला कोरके, ज्योती कवडे, गौरी इरकर, आरती भेडकर, राधिका जाधव, दिपाली जाधव, सोनाली मांजरे, जाधव, दिपाली काळे या महिलांना साड्या व इतर बक्षिसे देण्यात आली. तसेच डॉ. मृदुला तळेकर, सुजाता लोहकरे, सुरेखा शेळके, वंदना शाह, वैशाली शिंदे, अबोली व्यवहारे या महिलांचा यथोचीत सत्कार करून सन्मान करण्यात आला.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## अंतराळवीर सुनिता विल्यम्स यांच्या पुनरागमनानिमित्त केतूरमध्ये आनंदोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२२ मार्च-**

केत्तूर (ता. करमाळा) येथील नेताजी सुभाष विद्यालयामध्ये भारतीय वंशाच्या नासा अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांचे २८६ (९ महिने) दिवसांच्या व १७ तासांच्या अवघड अंतराळ प्रवासानंतर पृथ्वीवर बुधवारी दि. १९ मार्च रोजी पहाटे ३.२७ वाजता फ्लोरिडाच्या समुद्रात सुरक्षित पुनरागमन झाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

थोर शास्त्रज्ञ राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात झाली. प्राचार्य काशिनाथ जाधव यांनी सुनिता विल्यम्स यांच्या अवकाशातील प्रेरणादायी यशस्वी प्रवासाबद्दल माहिती दिली. यावेळी प्रशालेमधील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रा.किशोर जाधवर यांनी प्रास्ताविक केले. रामचंद्र मदने यांनी आभार मानले.



### संक्षिप्त वृत्त...



## शिवाजी पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत यश

**सांगोला, दि.२२ मार्च-**

कोर्टी (ता. पंढरपूर) येथील न्यू सातारा कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय प्रकल्प स्पर्धेत सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या मेकॅनिकल विभागातील अंतिम वर्षातील हर्षद घाडगे, अक्षय इंगवले, सुहास इंगवले या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवून कॉलेजचा नावलौकिक वाढविला आहे. या प्रकल्पांतर्गत एकाच वेळी निरनिराळी काम करणारे बहुउद्देशीय यंत्र तयार करण्यात आले. त्यामध्ये नांगरणी, कोळपणी आणि फवारणी आदी कामे केली जाऊ शकतात. असे विद्यार्थ्यांनी पर्यवेक्षकांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी प्रा.जी.एस.भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव ए. आर.गायकवाड व सर्व संचालक मंडळ, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले. कॉलेजचे प्राचार्य डॉ.आर.ए.देशमुख यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.



## करमाळा सकल मराठा समाजाच्यावतीने सभापती प्रा. राम शिंदे यांना निवेदन

**करमाळा, दि.२२ मार्च-**

करमाळा येथे विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांना सकल मराठा समाज यांच्या वतीने मराठा समाजाला आरक्षण मिळावे याबाबतचे निवेदन देण्यात आले. येथील सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा समाजाला ओबीसीत ५० टक्केच्या आतून आरक्षण मिळावे अशी मागणी करण्यात आली. प्रामुख्याने मराठा समाज हा ग्रामीण भागामध्ये रोजंदारी, बिगारी कामे, शेतीतील रोजंदारीची कामे व जनावरे संभाळून स्वतःची उपजीवीका करत आहे. शेतीचे क्षेत्रही कमी आहे. मराठा समाज हा ९० टक्के अल्पभूधारक आहे त्यामुळे हमखास उत्पन्नाचे साधन नाही त्यामुळे मुलांचे दहावीच्या पुढील शिक्षणाचा खर्च करणे पालकांना परवडत नाही. त्यामुळे मुले किंवा मुली बाहेरगावी चांगल्या उच्चशिक्षित शिक्षणाला पाठवणे अवघड झाले आहे. या बाबीकडे गंभीर्याने लक्ष देऊन मराठा समाजातील मुलांना शैक्षणिक आरक्षण ताबडतोब द्यावे ही विनंती समस्त सकल मराठा समाज व बहुजन बांधव करमाळाच्या वतीने करत आहोत. कृपया आपण हा विषय तातडीने मार्गी लावाल ही अपेक्षा असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## जिजाऊ रथयात्रेचे उद्या माळशिरसमध्ये आगमन

**नातेपुते, दि. २२ मार्च-**

जिजाऊ रथ यात्रा सोलापूर जिल्ह्यातील सांगोला या ठिकाणी आगमन करीत असून यानंतर सायंकाळी पंढरपूर येथे सभा व मुक्काम संपल्यानंतर सोमवार दि २४ मार्च रोजी सकाळी ही रथ यात्रा दसुर या ठिकाणाहून माळशिरस तालुक्यात आगमन करीत आहे माळशिरस तालुक्यात रथ यात्रेच्या स्वागताची जय्यत तयारी झाल्याची माहिती मराठा सेवा संघाचे माळशिरस तालुकाध्यक्ष निनाद पाटील यांनी दिली यावेळी कार्याध्यक्ष अमोल माने, भारत सांगडे, सचिव राजेंद्र मिसाळ, जिजाऊ ब्रिगेडच्या माळशिरस तालुकाध्यक्ष शारदा चव्हाण, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष दिगंबर मिसाळ,उपाध्यक्ष सचिन पराडे उपस्थित होते.मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्या संकल्पनेतून ही रथयात्रा काढण्यात आली असून राज्यभरातील मराठा समाज बांधवांना एकत्रित करण्यासाठी मराठा जोडो अभियान राबविण्यात येत असून त्यासाठी १८ मार्च रोजी शहाजी महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त वेरूळ येथील भोसले गढी येथून जिजाऊ रथयात्रेस प्रारंभ झाला आहे माळशिरस तालुक्यात पंढरपूर वरून ही रथयात्रा माळशिरस तालुक्यातील दसुर या गावी सोमवारी सकाळी ९ वा. येत आहे त्या ठिकाणी दसुर ,खळवे व पंचक्रोशीतील बहुजन समाज बांधव व ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात येणार आहे यानंतर या रथयात्रेचे तोंडले, बोंडले, वेळापूर, खंडाळी, चौंडेश्वरवाडी, माळेवाडी अकलूज ,पंचवटी, माळीनगर, पायरी पूल (महाळुंग नगरपंचायत) ३५.४ ,लवंग, संगम या ठिकाणचे ग्रामस्थ, विविध सामाजिक, राजकीय संघटना व बहुजन समाजाच्या वतीने ठिकठिकाणी या रथयात्रेचे स्वागत केले जाणार असल्याची माहिती संयोजकाकडून देण्यात आली. माळशिरस तालुक्यातील संगम या माढा तालुक्याच्या सरहद्दीवरील गावात रथ यात्रेचे सायंकाळी ४ वा. स्वागत केल्यानंतर ही रथ यात्रा टेंभुर्णीकडे प्रयाण करणार असून सायंकाळी कुर्डूवाडी या ठिकाणी या रथयात्रेचे स्वागत करून सायंकाळी कुर्डूवाडी येथे सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

# गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर भंडीशेगावच्या पर्यटन केंद्र कामाचा प्रारंभ

### गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी केली ड्रीम गार्डनची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२२ मार्च -**

भंडीशेगाव (ता. पंढरपूर) येथील ड्रीम गार्डनला पर्यटन स्थळ करण्यासाठी मुंबईतील उद्योजक अजित कंडरे यांच्या पुढाकारातून काम करण्यात येणार आहे. त्या कामाचा प्रारंभ गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर सायंकाळी पाच वाजता माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, आमदार समाधान अवताडे, आमदार राजू खरे, आमदार अभिजित पाटील, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी आमदार दीपक साळुंखे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशील संसारे यांनी भंडीशेगाव येथील ड्रीम गार्डनची पाहणी केली. ड्रीम गार्डनला पर्यटन स्थळ करण्यासाठी लागणारे सर्वती मदत करण्याचे देखील आश्वासन गटविकास अधिकारी संसारे यांनी ग्राम पंचायतीस दिले. यावेळी गणेश पाटील व मंगेश ननवरे उपस्थित होते. भंडीशेगाव येथील ग्राम पंचायत मालकीच्या ४२ एकर माळरानावर सात वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सोलापूर सोशल फाउंडेशनचे आमदार सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नातून साडेसतरा हजार वृक्षांची लागवड करण्यात आली. या ड्रीम गार्डनचे पर्यटन स्थळात रूपांतर होण्यासाठी मुंबईतील उद्योजक अजित कंडरे यांनी काम हाती घेतले असून त्या कामाचा शुभारंभ गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर करण्यात येणार आहे. त्यामुळे येथील कामाला वेगा आला आहे. झुडपे, अनावश्यक फांद्या काढून झाडांच्या बुडांना रंग देण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे ड्रीम गार्डन मधील पाझर तलावाचे खोलीकरण आणि सुशोभीकरण करण्याचे देखील काम सुरू आहे. क्रीडांगणाची देखील या ठिकाणी व्यवस्था करण्यात आलेली आहे. अंतर्गत रस्ते स्वच्छ करून पर्यटकांना सहजपणे ४२ एकर फिरता येईल याची देखील खबरदारी घेण्यात येत आहे. या सर्व गोष्टी पाहून गटविकास अधिकारी संसारे यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी पंचायत समितीचे विस्तार अधिकारी शिवाजी कदम, ग्राम सेवक येलपले, सचिन यड्रावकर, सोमनाथ विभुते उपस्थित होते.



## जमावाने मारहाण केल्या प्रकरणी नऊ आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २२ मार्च-**

वैराग पोलीस स्टेशन अंतर्गत भारतीय दंड विधान संहिताचे कलम १४३ १४७ ३२४ ४५२ ५०४ ५०६ प्रमाणे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. सदर प्रकरणातील फिर्यादीने आरोपीविरुद्ध जमावाने हल्ला करुन गंभीर दुखापत व मारहाण करुन दमदाटी केल्याप्रकरणी गुन्हा नोंद केला होता. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेसमोर झाली.

सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. सरकार पक्षातर्फे तपासलेले साक्षीदार यांचा पुरावा आरोपींना शिक्षा देण्यासाठी पुरेसा नाही व आरोपीविरुद्ध सबळ पुराव्याच्या अभाव असल्याबाबत युक्तिवाद ॲड. एस.एम. गुंड यांनी केला. सदर प्रकरणातील आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन सदर आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. साक्षीदार व अनेक बाबींची पडताळणी करुन मे. न्यायालयाने हा निर्णय दिला आहे. आरोपीच्यावतीने ॲड. एस एम गुंड, ॲड. व्ही.पी जाधव, ॲड. आर. आर. घोडके, ॲड. ए. एस.गुंड, ॲड. आर.के. ननवरे, ॲड. पी. ए. शेळवणे, यांनी काम पाहिले.

## महाळुंग-श्रीपूर आरोग्य वर्धिनी केंद्रातील वाद संपुष्टात

### आशा सेविकांनी मान्य केली चूक

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि.२२ मार्च-**

महाळुंग - श्रीपूर येथील आरोग्य वर्धिनी केंद्रातील कर्मचारी व आशा सेविकांनी डॉ. सचेतन घोडके अपमानस्पद वागणूक देत असल्याने त्यांची तातडीने बदली करण्याची मागणी केली होती. परंतू केंद्रातील आरोग्य सेविकेच्या दबावात डॉ. घोडके यांच्या विरोधात तक्रार केल्याचे मान्य केल्याने वाद संपुष्टात आला आहे.

याबाबत आशा वर्कर्स-गट प्रवर्तक युनियनच्या महासचिव पुष्पा पाटील तसेच नगरपंचायतीचे उपनगराध्य भिमराव रेडे-पाटील यांच्या उपस्थितीत आशा सेविका व कर्मचारी यांची बैठक झाली. यामध्ये आशा सेविकांनी आरोग्य वर्धिनी केंद्रातील आरोग्य सेविकेच्या दबावात येवून व त्यांच्या सांगण्यावरून डॉ. घोडके यांच्या विरोधात तक्रार केली आहे असे निदर्शनास आले. यावेळी महासचिव पाटील व उपनगराध्य रेड-पाटील यांनी आशा सेविकांची चुक लक्षात आणून देत पुन्हा असे वर्तन होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले. यावेळी आशा सेविकांनाही चुक मान्य करत पुन्हा असे वर्तन होणार नसल्याचे लेखी दिल्याने वाद संपुष्टात आला.



## मुस्तीत खासगी वायरमनचा विजेच्या तीव्र धक्याने डीपीवरच जळून मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि.२२ मार्च-**

मुस्ती येथे शेतातील डीपीवर काम करताना खासगी वायरमनचा विजेच्या धक्क्याने डीपीवरच जळून मृत्यू झाला. हा गंभीर प्रकार शुक्रवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडला. कुमार तानाजी घाटगे (वय २५) रा. मुस्ती (ता. दक्षिण सोलापूर) असे मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे. वळसंग पोलीस ठाण्यात याची नोंद झाली आहे. याची माहिती अशी की, मयत कुमार घाटगे हा मुस्ती गावात खासगी वायरमन म्हणून काम करीत होता. वीज वितरण कंपनीचे या गावचे लाइनमन देविदास जमादार यांनी डीपी दुरुस्तीसाठी घाटगे यास सोबत घेतले. मुस्ती-संगदरी गावच्या सीमेवरील बचाटे यांच्या शेती गट क्रमांक २१४ मधील शेतातील डीपी नादुरुस्त झाला होता. या डीपीला मुस्ती व संगदरी दोन्हीकडून वीज पुरवठा होतो. मात्र येथे काम सुरू करण्यापूर्वी लाइनमन जमादार यांनी वीज पुरवठा बंद झाला आहे की नाही याची खात्री केली नाही. जमादार यांनी खाली उभे राहून घाटगे यास डीपीवर काम करण्यास चढवले. मात्र वीज प्रवाह चालू असल्याने घाटगे याचा स्पर्श होताच जागेवर जबर धक्का बसला. यामुळे डीपीवरच घाटगे याचा जागीच जळून मृत्यू झाला. त्याचा मृतदेह डीपी वरचा अडकून पडला. नंतर तो खाली काढण्यात आला. याप्रकरणी तानाजी अंबाजी घाटगे यांनी वळसंग पोलिसात फिर्याद दिली आहे. घाटगे याच्या मृत्यूस जबाबदार असल्याने देविदास जमादार याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पीएसआय सागर पाटील करीत आहेत.



## शिखर शिंगणापूरच्या यात्रेसाठी कावडी मालकांची लगबग

### पाडव्यापासून सुरु होणार कावडी उत्सव


**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २२ मार्च-**

दि. ३० मार्च पासून शिखर शिंगणापूरच्या मोठ्या महादेवाच्या यात्रेस सुरुवात होत असून माळशिरस शहरातून यात्रेस कावडी जाण्याची परंपरा असून या यात्रेसाठी वाजंत्री,सामाननेण्यासाठी वाहन,ठरविण्यासाठी तसेच सिदा जमा करण्यासाठी कावडी मालकांची लगबग सुरु असल्याचे दिसून येत आहे. अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूरच्या मोठ्या महादेवाची यात्रा ३० मार्च पासून सुरु होत आहे. या यात्रेसाठी शहरातील १५ कावडी जात असतात. यामधील महादेव थोरात, नारायण थोरात, शशिकांत बोराटे, नामदेव कुंभार, विजय भोकपडे,सुभाष कोळी, कुमार कोळी यांच्या कावडी खडतर अश्या मुंगी घाटातून जातात तर रखमाजी जंगले,काशिनाथ शिंदे,तानाजी पिसे या रस्त्याने जातात.तर ,शिवाजी वाघमोडे, रामभाऊ सिद,गोरख शिंदे यांच्या कावडी नातेपुते येथील पर्वतेश्वर मंदिरात विवाह सोहळ्यासाठी जातात माळशिरसचे पोलीस पाटील शितल पाटील यांना वराचा मान आहे तर कावड्याना वऱ्हाडीचा मान आहे.

हा कावडी सोहळा पाडव्यापासून हनुमान जयंती पर्यंत चालतो यासाठी वाजंत्री ठरविण्यासाठी तसेच सामान नेण्यासाठी वाहन,तसेच सिदा जमा करण्यासाठी कावडी मालकांची लगबग सुरु आहे.या कावडी सोहळ्यासाठी कावडी मालकास १ लाख रुपया पर्यंत खर्च येतो. अनेक भाविक सिदा देतात,रोख स्वरूपात पैसे देतात व कावडीच्या बिशी मधून खर्च केला जातो.

## संत नामदेव महाराज स्मारकासाठी आराखडा सादर करा

### जिल्हाधिकाऱ्यांच्या शिंपी समाज शिष्टमंडळास सूचना



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २२ मार्च -**

समस्त शिंपी समाजाचे आराध्य दैवत, वारकरी संप्रदाय व भागवत धर्माचे आद्य प्रचारक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक संत शिरोमणी नामदेव महाराज यांचे भव्य स्मारक पंढरीत उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून शिंपी समाजाने स्मारकासाठीचा आराखडा त्वरीत सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिल्या आहेत. यामुळे लवकरच स्मारकाचे काम सुरु होणार असल्याची माहिती संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.

रेल्वे बोर्डाने पंढरपूर येथील ६५ एकर क्षेत्रालगतची जमीन महाराष्ट्र शासनास हस्तांतरित केली आहे. या जागेवर संत नामदेव महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. यासाठी समस्त शिंपी समाज, नामदेव समाजोन्नती परिषद, संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, केशवराज संस्था यांनी आराखडा सादर करावा. तो आराखडा शासनाच्या आर्किटेक्चरकडे देण्यात येईल. त्यानंतर अंतिम आराखडा तयार करून लवकरच स्मारकाच्या कामाचे भूमिपूजन करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सांगितले.

यावेळी अ.भा. नामदेव क्षत्रिय एकसंघाचे संस्थापक अध्यक्ष ॲड. महेश ढवळे, श्री संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे, नामदेव समाज उन्नती परिषदेचे अध्यक्ष संजय नेवासकर, सोलापूर शिंपी समाजाचे अध्यक्ष महेश रेळेकर, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख प्रथमेश परांडकर, नामदेव शिंपी समाज बहुउद्देशीय संस्थेचे युवराज चुंबळकर, राजेश केकडे, गुरुनाथ पतंगे, दास पतंगे, अनिल बोंडगे, धनंजय गोंदकर, एकसंघाचे उपाध्यक्ष नंदकुमार कोसबतवार उपस्थित होते.

ॲड. महेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या प्रयत्नांना यश आले असून पंढरपूर येथील संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांच्या स्मारकाची जागा महाराष्ट्र शासनाकडे हस्तांतरित झालेली आहे. शेगाव दुमाला येथील जमीन ग.नं.१५७, क्षेत्र ६ हे १० आर. ही रेल्वे विभागाच्या ताब्यातील जमीन दि. ३१ जानेवारी २०२५ रोजी पंचनामा करून राज्य शासनाने ताब्यात घेतली आहे. तसेच नोंदणीकृत आदलाबदल दस्त क्र. ५१३/२०२५ दि. ३ फेब्रुवारी रोजी करारनामा नोंदविलेला आहे. महाराष्ट्र शासनाने सदरहू जागा ही संत शिरोमणी नामदेव महाराज स्मारकासाठी रिझर्व करून तसा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांच्याकडे सादर केलेला आहे. यामुळे संत नामदेव महाराजांच्या स्मारकाच्या कामास लवकरच सुरुवात होणार असल्याचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले.

# सोलापूर विमानसेवा : उद्घाटन झाले, पण सेवा कधी सुरू होणार?

### सोशल मीडियावर मिम्स चर्चेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २२ मार्च-**


होटगी रोड विमानतळाचे उद्घाटन होऊन सहा महिने झाले असले तरी प्रत्यक्ष विमानसेवा सुरू होण्याची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. २९ सप्टेंबर २०२४ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते विमानतळाचे ऑनलाइन लोकार्पण झाले. त्यानंतर २३ डिसेंबर २०२४ रोजी प्रत्यक्ष सेवा सुरू होणार असल्याचे जाहीर झाले होते. मात्र, अद्यापही सेवा सुरू झालेली नाही. त्यामुळे सोलापूरकरांमध्ये नाराजी आहे.

सोलापूर ते मुंबई हवाई मार्गासाठी कंपन्यांनी निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला होता. त्यामुळे लवकरच सेवा सुरू होईल, अशी आशा व्यक्त केली जात होती. मात्र, अद्यापही सेवा सुरू झाली नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. उद्घाटन घाईघाईने का करण्यात आले? विमानसेवा सुरू होण्यास इतका विलंब का होत आहे? याबाबत प्रशासन गप्प असल्यामुळे नागरिक संभ्रमात आहेत. होटगी रोड विमानतळ परिसरात काही ठिकाणी अतिक्रमण आहे. अतिक्रमणाचा प्रश्न लवकर सुटल्यास विमानसेवा सुरू होईल अशी आशा सोलापूरकर व्यक्त करत आहेत.

विमानसेवा सुरू होत नसल्याने सोशल मीडियावर उपरोधिक मिम्सचा धडाका सुरू आहे. विमानसेवेचं उद्घाटन केवळ देखाव्यासाठी होतं का? किंवा फक्त उद्घाटन झालं, आता सेवा सुरू व्हायला अजून एक उद्घाटन हवं का? असे प्रश्न नागरिक विचारत आहेत. नागरिक प्रशासनावर टीका करत असून विमानसेवा कधी सुरू होणार, याबाबत ठोस उत्तर मागत आहेत. सोलापूर विमानसेवा सुरू झाल्यास व्यापार, उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. आता नागरिक विमानसेवा सुरू होण्याची प्रतीक्षा कधी संपणार, याकडे डोळे लावून आहेत.

### सोशल मीडियावर मिम्सचा ट्रेंड

सोलापूरच्या विमानतळावर मोठे विमान उडत असल्याचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. मात्र, हा व्हिडिओ प्रत्यक्षात दुसऱ्या देशातील असून, मेमरने गमतीशीरपणे तो सोलापूरच्या आसरा आणि कारखान्याच्या रोडशी जोडला आहे. विशेष म्हणजे, खाली मुद्दाम ३०२६ असा उल्लेख करून विमानसेवेच्या प्रतीक्षेवर उपरोधात्मक टोला लगावला आहे. या व्हिडिओला सहा लाखांहून अधिक वेळा पाहिले गेले असून, दोनशेहून अधिक लोकांनी कमेंट केल्या आहेत. दहा हजारांहून अधिक लोकांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे.



धाराशिव

# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## आश्रम शाळांतील अनाथ विद्यार्थ्यांसाठी मोफत छावा चित्रपट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२२ मार्च -**

राष्ट्रवादी पक्षाचे (अजित पवार गट) महाराष्ट्राचे युवा नेते पार्थ पवार यांच्या वाढदिवसानिमित्त स्वराज्याचे दुसरे छत्रपती श्री संभाजी महाराज यांच्या जिवनावर आधारित सुपरहिट चित्रपट छावा हा तुळजापूर येथील अनिवासी आश्रम शाळांतील अनाथ मुला मुलींना मोफत दाखवण्यात आला.



कार्यक्रमांचे आयोजन तुळजापूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष महेश चोपदार यांनी केले होते.

यावेळी तुळजापूर येथील मान्यवर यांच्या हस्ते छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मुर्तीचे पुजन करण्यात आले.

याप्रसंगी महेश चोपदार, जयवंत पवार, दत्ताभाऊ हुंडेकरी, किशोर भैय्ये, चंद्रकांत लोंढे, कालिदास चिवचिवे, अंबादास साठे, संभाजी चोपदार, सुधीर कुलकर्णी, आशीतोष कदम आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### इंटकचे जिल्हाध्यक्ष जमाले यांचा सत्कार

**तुळजापूर, दि.२२ मार्च -**

बीड जिल्ह्याचे काँग्रेस इंटकचे जिल्हाध्यक्ष रामधन जमाले हे श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी आले असताना देवी दर्शनानंतर धाराशिव जिल्हा आम आदमी पार्टीचे उपाध्यक्ष मधुकर शेळके यांच्याकडून गणेश मूर्ती देऊन त्यांचा सत्कार सन्मान करण्यात आला. यावेळी इंटकचे जिल्हा सचिव सखाराम बेगंडे उपस्थित होते.

### हसेगावची जि.प. शाळा गुणवत्तेत कायम

**कळंब, दि.२२ मार्च -**

सन २०२४ मध्ये झालेल्या नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा प्रतीक्षा यादी क्र. ४ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हासेगाव केज येथील समर्थ अशोक तोडकर याची निवड झाली आहे. या निवडीमुळे हसेगाव शाळेतील गेल्या वर्षातील एकूण ३ विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र ठरले आहेत. पहिल्या यादीमध्ये श्रावणी दशरथ धुमाळ व स्वराज ज्ञानेश्वर तोडकर हे दोन विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र ठरले होते. आता आणखी एक विद्यार्थी प्रवेश पात्र ठरल्यामुळे एका वर्षात तीन विद्यार्थी नवोदय प्रवेश पात्र ठरले आहेत. वरील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन राजाभाऊ गुंजाळ, प्रशांत घुटे, शिवराज मेनकुदळे, विकास खारके, कोकाटे, चौधरी व सर्व शिक्षक मुख्याध्यापक रामेश्वर जगदाळे यांनी केले.



### 'आयडियल' मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात

**तेर, दि.२२ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील हिंगळजवाडी येथील आयडियल इंग्लिश स्कूलमध्ये उत्साहात पार पडले. अध्यक्षस्थानी संस्कार भारती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अनिल देशमुख, मेष्टचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण सरडे, गोडगावचे सरपंच बालाजी भोसले, हिंगळजवाडीचे सरपंच सुरेश नाईकनवरे-पाटील, नामदेव जाधव, संजय ढवळे, अश्विन देशमुख, बालिका देशमुख, पूजा जाधव, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य वैशाली आडसूळ यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांना पालकांसह ग्रामस्थांनी भरभरून दाद दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर लोकगीते, लावणी, बालगीते सादर केली. हे स्नेहसंमेलन प्राचार्य वैशाली आडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली मीनाक्षी लोमटे, उमा कोथिंबीरे, राजकन्या नाडे, ज्ञानदा घुटुकडे, भाग्यश्री खोडवे, सारीका मुळे, शुभांगी घेवारे, नंदिनी शिंदे यांनी यशस्वी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानदा घुटुकडे यांनी केले तर आभार शुभांगी घेवारे यांनी मानले.

### उमरगा येथे रंग भारुडाचे वारी कार्यक्रम

**धाराशिव, दि.२२ मार्च -**

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने रंग भारुडाचे, वारी लोककलेची या कार्यक्रमाचे आयोजन २३ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता विघ्नेश्वर मंदिरासमोर,छत्रपती शिवाजी महाराज चौक,उमरगा येथे करण्यात आले आहे. कृष्णाई उळेकर आणि संच हा कार्यक्रम सादर करणार आहे. लोककलेच्या या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार हे करतील. अध्यक्षस्थानी आमदार प्रवीण स्वामी हे असतील. कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

### जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

**धाराशिव, दि.२२ मार्च -**

शहरातील आनंदनगर पोलीस ठाणे हद्दीत जुगारविरोधी कारवाई करत पोलिसांनी एका आरोपीला रंगेहात पकडले. आनंदनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने नगरपरिषद हद्दीतील तुळजाभवानी शॉपिंग सेंटरमधील पटेल शूज दुकानाच्या बाजूला छापा टाकला. यावेळी विशाल बालाजी पवळे (वय २६, रा. सांजा, ता. जि. धाराशिव) हा फन टार्गेट मटका जुगार खेळत असल्याचे आढळले. पोलिसांनी घटनास्थळावरून एकूण १० हजार ७५० रूपये रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे.

# तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास उच्चाधिकार समितीची मान्यता

### मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी परिपूर्ण अंतिम प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आला होता व प्रशासकीय मान्यतेसाठी तो मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला होता. दि.४ फेब्रुवारीच्या बैठकीत यात कांही बदल सुचवण्यात आले होते व त्याचे अनुपालन करून तो पुन्हा सादर करण्यात आला होता. दि.१७ मार्च रोजी झालेल्या बैठकीत त्याला मंजुरी देण्यात आली असून रु.१८६६ कोटींचा आराखडा मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. आता लवकरच या विकास आरखड्यास अंतिम मंजुरी मिळेल, असा विश्वास मित्रचे उपाध्यक्ष तथा श्री. तुळजाभवानी मंदिर संस्थानचे विश्वस्तआमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी माहिती दिली आहे.



तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये मुख्य दर्शन मंडप व तेथील अनुषंगिक सुविधा श्री तुळजाभवानी देवी छत्रपती शिवाजी महाराजांना तलवार देतानाचा १०८ फुटाचा पुतळा, घाटशिळ, महामार्गाजवळील सोलापूर बायपास पट्ट्यामध्ये व हडको येथे भक्तनिवास, प्रसादालय, पुस्तकालय, भोजनालय, भाविक सुविधा केंद्र, वाहनतळ तयार करणे. वृंदावन गार्डनप्रमाणे आधुनिक उद्यान, वृध्द व दिव्यांगाकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. तसेच विकासकामांसाठी आवश्यक भूसंपादनाकरिता देखील निधीची तरतूद ठेवण्यात आली आहे.

भूसंपादन व शासकीय करापोटी आवश्यक असणारे शुल्क तसेच विकासकामांसाठी लागणारा निधीसाठीचा अंतिम प्रारूप आराखडा प्रशासकीय मान्यतेसाठी उच्चाधिकार समितीकडे सादर करण्यात आला होता त्यास आता मान्यता मिळाली असून रु. १८६६ कोटींचा आराखडा मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शिखर समितीकडे पाठवण्यात आला आहे व त्याला लवकरच अंतिम मान्यता मिळेल असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### अंतिम मान्यतेसाठी प्रस्ताव मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीकडे; लवकरच मान्यताही मिळेल

तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेऊन भूसंपादन प्रक्रिया राबवली जाणार आहे. प्रचलित दाराच्या कैकपटीने विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी सादर करण्यात आलेल्या या अंतिम विकास आराखड्यात ३० टक्के तरतुद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र तुळजापूरच्या विकासासाठी संपादित केली जाणार आहे त्यांना समाधानकारक मावेजा मिळणार आहे. सर्वांच्या सहमतीने आणि सर्वांना विश्वासात घेऊन, जमिनीचा चांगला मोबदला देण्यात येणार असून आई तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे करण्याचा आपला प्रयत्न आहे.

तुळजाभवानी देवीचे क्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे यासाठी सर्वसमावेशक प्रक्रियेचा अंगीकार करण्यात आला आहे.



पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करुन योग्य आक्षेप व सूचनांचा आरखड्यात अंतर्भाव करण्यात आला आहे.

शहरात व शहराकडे सोलापूर, बार्शी, धाराशिव, औसा व नळदुर्गकडून येणाऱ्या पाच प्रमुख रस्त्यावरील प्रवेशाच्या ठिकाणी आकर्षक कमान बसवण्याच्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट घेण्याचे ठरले असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

## धान्य गोदाम, स्वस्त धान्य दुकान व शिवभोजन केंद्राची जिल्हाधिकाऱ्याकडून पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी धाराशिव येथील शासकीय धान्य गोदामाची पाहणी केली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती स्वाती शेंडे, तहसीलदार श्रीमती मृणाल जाधव आणि पुरवठा निरीक्षक अमोल बाहेकर उपस्थित होते.

पाहणी दरम्यान, गोदामातील दप्तर व धान्याची तपासणी करण्यात आली.थप्पीनिहाय धान्य मोजणी करून त्याची गुणवत्ता तपासण्यात आली. तसेच गोदामपाल यांना स्वच्छतेबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या.

जिल्हाधिकाऱ्यांनी धाराशिव येथील स्वस्त धान्य दुकान क्र.०१ (संचालक सुशीलकुमार अजमेरा) यांची पाहणी केली.ई-पॉस मशीनद्वारे लाभार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या धान्याच्या वितरणाची तसेच ई-केवायसी प्रक्रियेची तपासणी करण्यात आली. ३१ मार्चपर्यंत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेतील सर्व लाभार्थ्यांचे १०० ई-केवायसी पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी धान्याच्या नमुन्यांची तपासणी तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

यानंतर, जिल्हाधिकाऱ्यांनी शिवभोजन केंद्र (सिद्धांत हॉटेल-हॉटेल तुळजाई, जिल्हा रुग्णालयासमोर, धाराशिव) येथे भेट देऊन अन्नाच्या गुणवत्तेची आणि वितरण प्रक्रियेची पाहणी केली.

गरजू व गरीब लाभार्थ्यांना शासनाच्या निर्णयानुसार स्वस्त दरात भोजन मिळते का, याची खातरजमा केली. तसेच शिवभोजन केंद्राचा परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना दिल्या.

## धाराशिवमध्ये भरधाव बुलेटची धडक; एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

धाराशिव शहरातील डी-मार्ट समोर राष्ट्रीय महामार्ग ५२ वर भरधाव बुलेटच्या धडकेत एकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हा अपघात १६ मार्च रोजी सायंकाळी ७ ते ७:१५ च्या दरम्यान घडला.

याबाबत माहिती अशी की, दिलीप तुकाराम वाकुरे (पाटील) रा. ढोकी, ता. जि. धाराशिव हे कारमध्ये बसण्यासाठी जात असताना विक्रांत राजेंद्र जोगदंड (रा. जुळे सोलापूर, ता. जि. सोलापूर) याने भरधाव आणि निष्काळजीपणे चालवलेल्या रॉयल एनफिल्ड बुलेट (क्र. एम एच१३ ईबी १६४४) ने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात दिलीप वाकुरे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी मृताचे पुत्र सत्यजीत दिलीप वाकुरे (रा. सुतार गल्ली, ढोकी, ता. जि. धाराशिव) यांनी आनंदनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी आरोपी विक्रांत जोगदंडविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम २८१, १२५ (अ), १२५ (ब) आणि १०६ (१) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

## आळणी येथील शेतकऱ्यांचा तेर येथील महावितरण कार्यालयात ठिय्या



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.२२ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील आळणी शिवारातील शेतकऱ्यांचे महावितरणाच्या मनमानीमुळे अतोनात नुकसान होत असून, आळणी गावच्या शेतकऱ्यांनी महावितरणच्या तेर येथील सहा. कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन आळणीचा वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. पुढील तीन आठवड्यात आळणीचा वीजपुरवठा सुरळीत चालू करू, अशी लेखी हमी सहा कार्यकारी अभियंता स्वामी यांनी शेतकऱ्यांना दिली.

आळणी येथील शेतकऱ्यांना शेतीला पुरवठा होत असलेल्या फिडर वरून भडाचीवाडी व खामगाव या गावांनाही विजपुरवठा होत आहे. त्यामुळे या गावचा जास्त भार असल्याने आळणी गावास आठ दिवसामधून एक दिवस वीजपुरवठा मिळतो.

त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यास विद्युत मंडळ जबाबदार राहील, असा इशारा आळणी येथील शेतकऱ्यांनी महावितरण कंपनीच्या तेर येथील कार्यालयास दिला. यावेळी आळणी येथील शेकडो शेतकऱ्यांनी तेर येथील महावितरणचे उप कार्यकारी अभियंता स्वामी यांना निवेदन देऊन तीन आठवड्यात उपाययोजना करण्यात यावी, अशी मागणी केली.

दरम्यान सहा. कार्यकारी अभियंता स्वामी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार खामगाव लिंक लाईनचे काम पुढील तीन आठवड्यात केले, जाईल अशी लेखी हमी आळणी येथील शेतकऱ्यांना दिली.

निवेदनावर प्रदीप वीर, रमेश गवाड, सौरभ गरड, पोपट गाडे, सुधाकर माळी, नेताजी कोरे, नेताजी तोडकर, विकास पाटील, प्रदीप वीर, शंकर माळी, अंकुश कोरे यांच्यासह शेतकऱ्यांचा सह्या आहेत.

### संदीप कुदळे लाईनमनची 'दादागिरी'

आळणी शिवारातील विद्युत देखरेखीसाठी संदीप कुदळे नामक लाईनमनची नियुक्ती आहे. अनेक वेळा रात्रीच्या वेळी काही शेतकऱ्यांच्या शेतात लाईटचे शडूल असताना सुद्धा लाईन गायब असते. शेतकऱ्यांनी लाईनमन कुदळेंना संपर्क केला असता नाना विविध कारणे देवून हा लाईनमन टोलवा टोलवी करतो. याबाबत वरिष्ठांना तक्रार करतो, असे शेतकऱ्यांनी म्हणताच कोणाला सांगायचे ते सांगा असे बोलून दादागिरी करतो. सदरील लाईनमनला वरिष्ठांनी समज देवून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमातंर्गत क्षेत्राय गावभेट कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२२ मार्च -**

लोहारा तालुक्यातील मार्डी येथे मुख्यमंत्री शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत महसूल प्रशासन तहसील कार्यालय लोहारा यांच्या वतीने दि.२१ मार्च रोजी क्षेत्रीय गाव भेट कार्यक्रम घेण्यात आला.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख म्हणुन उपविभागीय अधिकारी उमरगा गणेश पवार, तहसीलदार लोहारा रणजितसिंह कोळेकर, पुरवठा नायब तहसीलदार खडे, मार्डी येथील श्रीमंत पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष आप्पासाहेब पाटील, उपसरपंच शरद कदम,योगेश देवकर, अदि उपस्थित होते. यावेळी संगायो योजने अंतर्गत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेचा पात्र अर्जदार यांना लाभ देण्यात आला. यावेळी महसूल प्रशासनातील विविध विषयासंबंधी व विविध योजना संबंधी माहिती ग्रामस्थांना देण्यात आली. यावेळी कार्यक्रमाची प्रस्ताविकपर सविस्तर माहिती तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांनी सांगितली.

यावेळी मंडळ अधिकारी वाजिद मणियार यांनी शेत रस्त्याबाबतच्या विविध तरतुदी बाबत सविस्तर माहिती दिली. तसेच ग्रीस्टॅग या योजनेची माहिती ग्राम महसूल अधिकारी किशोर पवार यांनी दिली. पुरवठा नायब तहसीलदार खडे यांनी पुरवठा विभागातील विविध स्वरूपाची माहिती ग्रामस्थांना दिली. सांगयो इंगायो विभागातील विविध स्वरूपाच्या योजनांची माहिती पटेल यांनी दिली. तसेच निवडणूक विभागामार्फत (बीएलओ) माणिकशेट्टी यांनी माहिती दिली. यानंतर उपविभागीय अधिकारी गणेश पवार यांनी ग्रामस्थांना विविध प्रकारची माहिती देऊन लोकांच्या अडीअडचणी जाणुन घेऊन चर्चा करून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक शिंदे यांनी केले तर आभार दिपक रेड्डी यांनी मानले. या कार्यक्रमास गावातील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## उमरगा येथे भरधाव वाहनाच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू; आरोपी फरार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

तालुक्यातील महादेव गल्ली येथे एका भरधाव वाहनाच्या धडकेत ५९ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. हा अपघात २१ मार्च २०२५ रोजी सकाळी ९:३० च्या सुमारास घडला.

याबाबत माहिती अशी की, दत्तु मनोहर पिस्के (वय ५९, रा. महादेव गल्ली, उमरगा) आणि त्यांचे सोबती अमोल मिरकले हे मोटरसायकल (क्र. चक २५ थ ६५७९) वरून जात असताना अज्ञात वाहनचालकाने आपल्या भरधाव आणि निष्काळजीपणे चालवलेल्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दत्तु पिस्के गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला.

विशेष म्हणजे, अपघातानंतर आरोपी वाहनचालकाने जखमींना मदत न करता घटनास्थळावरून वाहनासह पसार झाला. या घटनेनंतर दत्तु पिस्के यांचा मुलगा किरण पिस्के (वय ३७) यांनी उमरगा पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

पोलिसांनी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## सहारा गुंतवणूकदारांच्या ठेवी रिफंड करा : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**

लोकसभेत सहारा समूहातील गुंतवणूकदारांच्या परतफेडीच्या प्रक्रियेबाबत महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. खासदार ओमप्रकाश भूपालसिंह उर्फ पवन राजेनिंबाळकर यांनी लोकसभेत अतारांकित प्रश्न क्र. १८६० च्या माध्यमातून गुंतवणूकदारांचे पैसे कधी आणि कसे परत मिळणार? याबाबत स्पष्टता मागितली.

सहकारिता मंत्री अमित शहा यांनी दिलेल्या उत्तरात सांगितले की, सहारा समूहाच्या चार सहकारी संस्थांमध्ये ५.४२ लाख गुंतवणूकदारांचे एकूण १,१३,५०४ कोटी जमा आहेत.

मात्र, अनेक गुंतवणूकदारांना त्यांच्या ठेवी परत मिळालेल्या नाहीत, त्यामुळे सरकार या प्रक्रियेला गती देण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. खासदार राजेनिंबाळकर यांनी गुंतवणूकदारांच्या तक्रारींचा संदर्भ देत सरकारकडे विचारणा केली की, सरकारने संपूर्ण रक्कम कधीपर्यंत परत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे आणि या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली जात आहेत?

यावर उत्तर देताना सहकारिता मंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केले की, उच्चतम न्यायालयाच्या आदेशानुसार, २४,९७९.६७ कोटींपैकी ५,००० कोटींची रक्कम सहकारी संस्था केंद्रीय निबंधकांकडे हस्तांतरित करण्यात आली असून, पात्र गुंतवणूकदारांना पारदर्शक प्रक्रियेद्वारे थेट बँक खात्यात पैसे जमा करण्यात येत आहेत. सीआरसीएस-सहारा रिफंड पोर्टलद्वारे परतफेड प्रक्रिया सुरू दि.१८ जुलै २०२३ रोजी सीआरसीएस-सहारा रिफंड पोर्टल (https://mocrefund.crcs.gov.in) सुरू करण्यात आले. ही प्रक्रिया न्यायमूर्ती आर. सुभाष रेड्डी (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय) यांच्या देखरेखीखाली पार पाडली जात आहे. दि.२८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत, १२,९७,१११ गुंतवणूकदारांना एकूण २,३१४.२० कोटींची परतफेड करण्यात आली आहे. सध्या प्रत्येक पात्र गुंतवणूकदाराला ५०,००० पर्यंतचा प्रारंभिक परतावा देण्यात येत आहे. खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सरकारकडे संपूर्ण गुंतवणूकदारांना पूर्ण रक्कम परत मिळेल याची गॅरंटी द्यावी.

रिफंड प्रक्रियेत येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करून पोर्टल अधिक सुटसुटीत करावे. ३१ डिसेंबर २०२५ पूर्वीच सर्व गुंतवणूकदारांना पैसे मिळतील यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी लोकसभेत केली. याबाबत महत्त्वाचे निर्देश गुंतवणूकदारांसाठी देण्यात आले असून गुंतवणूकदारांनी सीआरसीएस-सहारा रिफंड पोर्टल (https://mocrefund.crcs.gov.in) वर ऑनलाईन अर्ज करावा.

आधार लिंक असलेले बँक खाते आणि गुंतवणुकीचे योग्य पुरावे अपलोड करणे आवश्यक आहे. जर अर्जात काही त्रुटी असतील, तर १५ नोव्हेंबर २०२३ रोजी सुरू झालेल्या री-सबमिशन पोर्टलवर सुधारित अर्ज सादर करावा. अधिक माहिती आणि सहाय्यासाठी पोर्टलवर मदत सुविधा उपलब्ध आहे.



सर्व गुंतवणूकदारांनी आपल्या ठेवी परत मिळवण्याबाबत वरील माहिती आधारे दिलेल्या पोर्टलचा वापर करून घ्या, असे आव्हान खासदार ओम प्रकाश राजे निंबाळकर यांनी केले आहे.

खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी सरकारला जास्तीत जास्त गुंतवणूकदारांना लवकरात लवकर परतावा मिळेल यासाठी प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे.

# धाराशिव जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जागतिक वन दिनी विविध जनजागृती उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
जागतिक वन दिनानिमित्त आज २१ मार्च रोजी वन विभाग व सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने जिल्ह्यात विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध व चित्रकला स्पर्धा, वृक्षदिंडी तसेच वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. धाराशिव शहरातील भाई उद्धवराव पाटील कन्या प्रशाला येथे वृक्षारोपण करून संपूर्ण शहरात वृक्षदिंडी काढण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी श्री.कीर्ती कुमार पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपजिल्हाधिकारी प्रविण धरमकर, विभागीय

वन अधिकारी बाळकिशोर पोळ, सामाजिक वनीकरणचे विभागीय वन अधिकारी विश्वास करे, तुळजापूर वनपरिक्षेत्र अधिकारी तसेच इतर क्षेत्रीय व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी जिल्हाधिकारी पुजार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मानवी आयुष्यात वनांचे महत्त्व स्पष्ट केले.

तसेच येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड

करण्याचे आवाहन करून पर्यावरण संवर्धनासाठी जनजागृती करण्याचा संदेश दिला.



# पीक विमा, रस्ता रोको आंदोलन रद्द

**उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार; पिक विमा अभ्यासक अनिल जगताप यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
केंद्र शासनाच्या पिक विमा परिपत्रक विरोधातील २५ मार्च २०२५ चा नारंगवाडी चौक तालुका उमरगा येथील रस्ता रोको आंदोलन रद्द करण्यात आले असून चारच दिवसात संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याची माहिती पिक विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी दिली आहे.

केंद्र शासनाने ३० एप्रिल २०२४ रोजी काढलेल्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्याचे पिक विमा नुकसान भरपाई देताना प्रचंड नुकसान होत आहे. एकूण नुकसानीच्या केवळ २५ टक्केच नुकसान भरपाई देण्याची तरतूद या परिपत्रकामध्ये आहे. त्यामुळे शेतकऱ्यातून मोठ्या प्रमाणात याला विरोध होत आहे.

खरीप २०२३ व खरीप २०२४ मध्ये या परिपत्रकाने एकट्या धाराशिव जिल्ह्याचे पंधराशे कोटी रुपयाचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना अतिशय अल्प प्रमाणात विमा नुकसान भरपाई मिळत आहे.



या परिपत्रकाविरुद्ध अनिल जगताप यांनी याचिका दाखल केल्यानंतर ४ जुलै २०२४ ला राज्य तक्रार निवारण याचिका दाखल केली होती. समितीची मंत्रालय मुंबई येथे बैठक होऊन हा केंद्राचा विषय आहे असे केंद्राकडे बोट दाखवत राज्याने हातवर केले. त्यानंतर धाराशिव, तुळजापूर, उमरगा येथे परिपत्रका विरुद्ध लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन केले. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. त्यामुळे २५ मार्च रोजी नारंगवाडी चौक येथे रस्ता रोको आंदोलन आयोजित केले होते. सत्ताधाऱ्यांनी वेळोवेळी परिपत्रक रद्द होणार असल्याच्या घोषणा मिळाल्या मात्र ते केवळ खोटी आश्वासने निघाली.

विधान सभेच्या अधिवेशनामध्ये कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी मार्च अखेरपर्यंत खरीप २०२४ चा विमा वाटप करणार असल्याचे घोषित केले आहे.

त्यामुळे आंदोलन करून कंपनी किंवा शासन परिपत्रक रद्दची अट रद्द करेल याची शाश्वती नाही. एकदा विमा वाटप झाल्यानंतर शेतकऱ्यांना खूप मोठ्या आर्थिक प्रमाणात नुकसान होईल कारण यावर्षी सर्वसाधारणपणे प्रतिहेक्टर ६,२०० प्रमाणे विमा भरपाई मिळणार आहे.

त्यामुळे या परिपत्रकाला आव्हान देत उच्च न्यायालयात तातडीने याचिका करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने येत्या चार दिवसात उच्च न्यायालयात याचिका दाखल करून परिपत्रकाला स्थगिती आदेश मागणार असल्याचे अनिल जगताप यांनी सांगितले.

या परिपत्रकाविरुद्धची आता ही शेवटची लढाई आहे. न्यायालयात दिलासा मिळाला तरच शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. त्यामुळे तातडीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करत असल्याचे अनिल जगताप यांनी सांगितले.

## जागतिक मौखिक आरोग्य दिनानिमित्त आरोग्य जागरूकतेचा संकल्प

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
२० मार्च हा जागतिक मौखिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. याचा उद्देश लोकांमध्ये तोंडाच्या आरोग्याचे महत्त्व पटवून देणे आणि त्याकडे दुर्लक्ष केल्यास होणाऱ्या दंत व इतर आजारांपासून

बचाव करण्यास प्रवृत्त करणे हा आहे. यंदाच्या वर्षीचा संदेश आनंदी तोंड असेल तर आनंदी मन राहील असा आहे.

वेगाने वाढणारे शहरीकरण,बदलती जीवनशैली, पाणी पुरवठ्यातील फ्लोराईडची कमतरता आणि साखरयुक्त

पदार्थांचे वाढते सेवन या कारणांमुळे दात आणि हिरड्यांचे आजार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. खराब मौखिक

आरोग्यामुळे हृदयविकार, मधुमेह, दात किडणे, अल्झायमर,

उच्च जोखीम कर्करोग, लठ्ठपणा, श्वसनाचे विकार, संधिवात, मूत्रपिंडाचे आजार आणि वंध्यत्व यांसारख्या गंभीर आजारांना आमंत्रण मिळते.

संतुलित आहार घ्यावा व साखरयुक्त पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवावे. लहान मुलांना लहानपणापासून

दात घासण्याच्या योग्य सवयी लावाव्यात. जिभेची स्वच्छता राखावी, कारण जिभेवर जमा होणारे

जिवाणू तोंडाच्या दुर्गंधीचे व अल्सरचे कारण ठरू शकतात. मुले योग्य रीतीने दात घासत आहेत का, हे पालकांनी सात-आठ वयापर्यंत तपासावे.

मुलांच्या दंत आरोग्यासाठी दंतवैद्याकडे नियमित तपासणी करणे आणि दैनंदिन स्वच्छतेच्या सवयी रुजवणे गरजेचे आहे.जागतिक मौखिक आरोग्य दिनानिमित्त

आपल्या मौखिक आरोग्याची काळजी घेण्याचा संकल्प करूया असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी

डॉ. सतिष हरिदास आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विनयशिल कुलकर्णी यांनी केले आहे.

**धाराशिव ग्रंथोत्सव २०२४**

# २४ आणि २५ मार्चला साहित्य, वाचन व संस्कृतीचा अनोखा उत्सव

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्या वतीने धाराशिव ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन २४ व २५ मार्च रोजी करण्यात आले आहे. या उत्सवात ग्रंथदिंडी, परिसंवाद, कवी संमेलन आणि ग्रंथप्रदर्शन यांसारखे विविध कार्यक्रम होणार आहेत.

सोमवारी, दि.२४ मार्च रोजी सकाळी १०:३० वाजता पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,आमदार सर्वश्री सतीश चव्हाण, विक्रम काळे, राणाजगजीतसिंह पाटील, प्रा.डॉ. तानाजीराव सावंत, कैलास पाटील घाडगे, प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधा साळुंके, जिल्हा कोषागार अधिकारी अर्चना नरवडे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, सहायक धर्मदाय आयुक्त आर. आर. कोरे, सहाय्य ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष व्ही.जी. सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

ग्रंथदिंडी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोरून निघणार आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्या हस्ते ग्रंथदिंडी पूजन होईल. ग्रंथ दिंडीचे संयोजक हे समर्थ रावसाहेब बाबा पाटील वारकरी शिक्षण संस्था मेडसिंगाचे संचालक ह.भ.प. ज्ञानेश्वर सूर्यवंशी हे असतील. वाचन संस्कृती - समस्या, संधी व उपाय या विषयावर दुपारी १२ ते २ दरम्यान परिसंवाद होणार आहे. अध्यक्षस्थानी डॉ. बालाजी इंगळे हे असतील. यामध्ये बाल साहित्यिक समाधान शिकेतोड, प्रा. रवी सुरवसे, प्रा.डॉ. आयेशा चिस्ती, एस.एल. पवार हे सहभागी असतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रजनी रावळे ह्या करतील. दुपारी चार ते सायंकाळी सहा वाजता दरम्यान कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. नामांकित गझलकार भागवत घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली हे संमेलन होणार असून यामध्ये आनंद वीर, संजय धोंगडे, प्रा. अलका सपकाळ, डॉ. संजय सोनटक्के, अश्विनी धाट, मनीषा थडवे, अस्मिता बुरगुटे, शंकर खामकर, कविता पूदाले, शेखर गिरी, युसुफ सय्यद, आश्रुबा कोठावडे, जयश्री तेरकर, विजय गायकवाड, मीना महामुनी, सुवर्णा शिनगारे, सुषमा सांगळे, कृष्णा साळुंखे, रमेश मंमाळे, भूमिपुत्र वाघ, टी.डी. गंगावणे, सोनाली अरडले, संध्याराणी कोल्हे हे कवी सहभागी होतील. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद हंगरगेकर हे करतील. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा - संधी आणि आव्हाने या विषयावर २५ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ वाजतापर्यंत परिसंवाद आयोजित केला आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र अत्रे हे असतील. यामध्ये प्रा. प्रशांत चौधरी, प्रा.डॉ. दीपक सूर्यवंशी व प्रा. प्रशांत गुरव हे सहभाग घेतील. कथाकथन कार्यक्रम २५ मार्च रोजी दुपारी १२ ते १ वाजतापर्यंत राहील. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनिता गुंजाळ कवडे ह्या असतील. यामध्ये वसुंधरा गुरव, तनुजा मंजुळे, सुषमा मोरे, सृष्टी कोळी, अनुज कांबळे सहभागी होतील, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्याम नवले हे करतील.

धाराशिव जिल्ह्याची प्राचीन ओळख या विषयावर परिसंवादाचे आयोजन दुपारी ३ ते ४ वाजता दरम्यान करण्यात आले असून अध्यक्षस्थानी साहित्यिक, इतिहास व पुरात्व संशोधक युवराज नळे हे अध्यक्षस्थानी असतील. यामध्ये रविंद्र शिंदे व जयराज खोचरे हे सहभागी होतील. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हनुमंत पडवळ हे करतील.

ग्रंथ प्रदर्शन व विक्री ही सकाळी १० ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत राहील.समारोप समारंभ २५ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बी.एड व आर.पी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रकाश कांबळे असतील. अध्यक्षस्थानी नितीन तावडे असतील. सूत्रसंचालन साधना विश्वेश्वर ह्या करतील. धाराशिव ग्रंथोत्सव हा वाचनप्रेमी आणि साहित्य रसिकांसाठी एक महत्त्वाचा उपक्रम ठरणार असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे व ग्रंथोत्सव समन्वय समितीने केले आहे.

# विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेवून उद्योजक बनावे : डॉ. पेरके



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
भविष्यातील संधीसोबतच स्पर्धेचा विचार करत विद्यार्थ्यांनी नोकरी मागे न लागता उद्योजक बनण्याच्या दृष्टीकोनातून या प्रशिक्षणाचा फायदा घेण्याचे प्रतिपादन शासकीय कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर पेरके यांनी केले.

ते वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत शासकीय कृषि महाविद्यालय, धाराशिव आणि केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय मधमाशीपालन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते यावेळी बोलत होते.

बोलताना पुढे ते म्हणाले की, शेतीतील उत्पन्न वाढविण्यासाठीही मधमशांची महत्वाची भूमिका असते. तसेच आरोग्यासाठी गुणीकारी असणारा मध तयार करण्यासाठी मधमाशांचा मोलांचे सहकार्य लाभते. यासोबतच मध उद्योगातून मोठी आर्थिक उलाढाल होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना कीटकशास्त्राच्या सहायक प्राध्यापिका डॉ. अनिता साबळे म्हणाल्या, कृषि पदवीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमामध्ये मधमाशीपालन विषयावर विशेष भर देण्यात आला असून प्रत्यक्ष शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाशांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे भविष्यात मधमाशी पालनाकडे वळण्यासाठी हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना अत्यंत उपयोगी राहील.

प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनर हेमंतकुमार डुंबरे (केंद्रीय मधमाशी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे) यांनी मधमाशीपालनाच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले. त्यामध्ये मधमाश्यांचा इतिहास, परागीभवनातील भूमिका,



मधनिर्मिती प्रक्रिया, पेट्यांची निगा, मध संकलन, शासकीय योजनांची माहिती आदी विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मधमाशीपालनाचे प्रात्यक्षिक अनुभव घेतला तसेच हिमाचल प्रदेश व मलेशियातील मधमाशी उद्योजकांशी ऑनलाईन संवाद साधून त्यांच्या अनुभवांमधून मार्गदर्शन घेतले.

प्रशिक्षणाच्या शेवटी विद्यार्थ्यांची परीक्षा घेऊन खादी व ग्रामोद्योग आयोगामार्फत प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. प्रशिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करून मधमाशी संवर्धन व जनजागृती करणार असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनात डॉ. अनिता साबळे, डॉ. महेश वाघमारे, डॉ. जयश्री तवले यांचे योगदान लाभले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदिती घुगे हिने केले.

या प्रशिक्षणात महाविद्यालयातील ९८ विद्यार्थी सहभागी झाले.

# जलसंधारणाच्या कामातून जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्वांचा पुढाकार गरजेचा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२२ मार्च -**
पाणी हा सर्वांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. राज्यातील हजारो धरणांमुळे सिंचनाच्या सुविधेसोबतच पाणी पुरवठ्याच्या योजना सुरू झाल्या आहे. धाराशिव जिल्हा आकांक्षीत असल्यामुळे पाणी, शेती व पर्यटनावर लक्ष केंद्रित करून जिल्ह्यातील नागरिकांचे दरडोई उत्पन्न वाढवून त्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडविणे आवश्यक आहे.जिल्ह्यात जलसंधारणाची जास्तीत जास्त कामे करून जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्वांचा पुढाकार गरजेचा आहे.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पूजार यांनी केले.

मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने जागतिक जल दिवसाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी पुजार बोलत होते. आज २२ मार्च रोजी नियोजन भवन सभागृहातील या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने, धाराशिव पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता विजयसिंह थोरात, जिल्हा परिषदेचे जिल्हा जलसंधारण अधिकारी राऊळ, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सरवदे, बीजेएसच्या कांचनमाला सांगवे, स्वयंम प्रकल्पाच्या उपसंचालक नसीम शेख, सुप्रभा प्रतिष्ठान पुणेचे अध्यक्ष राजेंद्र कासार व जिल्हा जलसंधारण अधिकारी प्रभाकर महामुनी यांची उपस्थिती होती.

पुजार पुढे म्हणाले की, जिल्ह्यात पाण्याच्या बचतीसाठी कमी पाण्याचे पीक घेतले पाहिजे. कमी पाण्यात जास्त उत्पादन हा विचार करून पिकांची लागवड केली पाहिजे.जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी वॉटर बजेटिंगचा विचार करून शेती केली पाहिजे. शासनाच्या अनेक योजना आहेत, या योजनांचा लाभ शेतकऱ्यांनी घेतला पाहिजे. शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना आहे. या योजनेत जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन जास्तीत जास्त गाळ आपल्या शेतात टाकावा, त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणारच नाही यासाठी त्या दृष्टीने काम करण्याची आवश्यकता आहे. यावर्षी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेत जिल्ह्यातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होऊन जिल्हा या योजनेत राज्यात अग्रेसर राहील या दृष्टीने काम करावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

डॉ. घोष म्हणाले की, तलावातील गाळ शेतात टाकल्यास पिकाच्या उत्पादनात वाढ होते.जमिनीची सुपीकता वाढते.कोणत्याही योजनेत लोकांचा सहभाग असल्याशिवाय ती योजना यशस्वी होत नाही. शाश्वत परिवर्तन करायचे असेल तर लोकसहभाग असणे आवश्यक आहे. पाण्याचा वापर योग्य प्रमाणात आणि काटकसरीने करणे आवश्यक आहे. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे.पाणी स्वच्छ कसे राहील व त्याचा वापर कसा करता येईल या दृष्टीने काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

रविंद्र माने म्हणाले की, जिल्ह्यात सरासरी ६०३ मी.मी पाऊस पडतो. ३६५ दिवसांमध्ये मोजकेच काही दिवस पाऊस पडतो. त्यामुळे पाणलोट क्षेत्रासाठी जिल्ह्यात काम करण्याची तसेच भूगर्भात जास्तीत जास्त पाणी मुरवण्यासाठी जलसंधारणाच्या कामांवर भर देण्याची आवश्यकता आहे. जल चळवळीचे रूपांतर लोक चळवळीत झाले पाहिजे, असे ते म्हणाले.

थोरात म्हणाले, पाण्याची कार्यक्षमता वाढविणे गरजेचे आहे. पृथ्वीवर ९७ पाणी समुद्राचे तर ३ टक्के पाणी हे पिण्यायोग्य आहे. पृथ्वीवरील ८०० कोटी लोक ३ टक्के पाण्यांवर अवलंबून आहे. त्यामुळे पाण्याची कार्यक्षमता वाढविण्याची गरज आहे. वाढत्या जागतिक तापमानाचा परिणाम पाणी व पर्यावरणावर होत आहे. नाला खोलीकरण आणि गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या योजनेच्या निमित्ताने पाण्याची कार्यक्षमता वाढविणे आवश्यक आहे. पुढच्या पिढीची जाणीव ठेवून जलक्षेत्रात काम करण्याची आवश्यकता त्यांनी विशद केली.

प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात काम करणाऱ्या कळंब तालुक्यातील श्रीमती प्रिया राखुंडे आपल्या मनोगतातून बोलताना म्हणाल्या, जिल्हा दुष्काळी आहे. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी आहे,



पण जिल्ह्यात साखर कारखाने जास्त आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी आपल्याला पाणी भूगर्भात पाणी मुरवावे लागेल. पारंपारिक पिकांना प्राधान्य देताना कमी पाण्याची पिके आपल्याला घ्यावी लागतील तसेच मिश्र पिकांचा समावेश करावा लागेल. उसासाठी देखील ठिबक सिंचनाचा वापर करावा लागेल. पीक पद्धतीत बदल केले तर पाणी व्यवस्थापनात बदल करता येईल. जलसंधारणाच्या कामात महिलांचा सहभाग घेणे आवश्यक आहे, कारण महिला ज्या क्षेत्रात काम करतात त्यामध्ये यश मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

सांगवे गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार या विषयावर बोलताना म्हणाल्या की, आज शेतकरी रासायनिक शेतीकडे वळला आहे. त्यामुळे कर्क रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. मुलाच्या भविष्याचा विचार करून पाण्याचा वापर काटकसरीने केला पाहिजे. महिलांनी पाण्याच्या क्षेत्रात काम करण्यासाठी पुढे यावे. तलावातील गाळ काढून शेतात टाकावा. त्यामुळे शेतीची सुपीकता वाढण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिलांच्या पुढाकारातून जलसुरक्षित मराठवाडा या विषयावर बोलताना नसीम शेख म्हणाला की, शेत व गावाला पाणीदार करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. शेत पीक पद्धतीत बदल झाले पाहिजे. रसायनमुक्त शेतीसाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. महिलांनी शेती व पाणी या क्षेत्रात काम करावे. जलक्षेत्रातील कामासाठी लोकांनी पुढे येण्याची आवश्यकता आहे, असे त्या म्हणाल्या. यावेळी कासार यांनीही मार्गदर्शन केले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून जल पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना जलप्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील विविध भागातून आलेल्या महिलांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवून घेणे गरजेचे

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२२ मार्च -**

देवणी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना सुचित करण्यात येतो की केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांचा थेट लाभ शेतकऱ्यांना मिळावा यासाठी ॲग्रीस्टिक अर्थात फार्मर आय. डी. नोंदणी मोहीम सबंध राज्यात राबविली जात आहे. महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत ७८ लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून एकट्या पुणे जिल्ह्यात ४ लाख ५ हजार शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळाला ही आहे.

शेतकऱ्यांना आपल्या जमिनीची फार्मर आयडी या नावाखाली आपले कार्ड बनवून घेण्याचे आहे त्यासाठी आपल्या जवळच्या ग्राहक सेवेत जाऊन शेतकऱ्यांचे आधार कार्ड, ७/१२ किंवा, नमुना ८ अ, आधार कार्ड, संलग्न असलेला मोबाईल, (ओटीपी करिता) घेऊन जावे व आपले फार्मर आयडी कार्ड बनवून घ्यावे ज्याप्रमाणे सर्वसामान्य व्यक्तींची ओळख म्हणजे आधार कार्ड आहे. त्याचप्रमाणे शेतकरी असल्याची ओळख म्हणजे फार्मर आयडी राहणार आहे. त्यामुळे ७/१२ शी संबंधित सर्व लाभाकरिता फार्मर आय. डी. अत्यावश्यक होणार आहे. फार्मर आयडी न बनविल्यास पीएम किसान अंतर्गत लाभ बंद होईल, नमो शेतकरी अंतर्गत लाभ मिळणार नाही, पिक विमा भरता येणार नाही, पीक कर्ज मिळणार नाही, कृषीविषयक सर्व योजना करिता आवश्यक आहे. तेव्हा शेतकऱ्यांनी कोणतेही नुकसान होऊ नये म्हणून फार्मर आयडी बनवून घेणे आवश्यक आहे. तर देवणी तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी नजीकच्या ग्राहक सेवा केंद्रात जाऊन आपले फार्मर आयडी बनवून घेणे आवश्यक आहे.



# ई-केवायसी न केल्याने सुमारे चार कोटी अनुदान पडून

**शेतकऱ्यांनी ई-केवायसी करून घ्यावे : तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांचे आवाहन...**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२२ मार्च -**

तालुक्यात सन २०२४-२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील दहा मंडळातील शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. सप्टेंबर आणि ऑक्टोबर मधील बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीसाठी ३२ कोटी ३४ लाखांचा निधी मंजूर झाला आहे. मंजूर निधी संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आले असून अद्यापही ५ हजार ५७६ शेतकऱ्यांनी ई-केवायसी न केल्यामुळे व विविध कागदपत्रे जमा न केल्यामुळे ३ कोटी ९५ लाख ३९ हजार ७०७ रुपये शिल्लक असल्याची माहिती तहसिलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिली आहे.



सन २०२४-२५ च्या सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत सततच्या पावसामुळे,अतिवृष्टीमुळे व ढगफुटीसदृश्य स्थितीमुळे निलंगा तालुक्यातील दहा मंडळातील शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले होते. संबंधित निलंगा तालुका प्रशासनाने पंचनामे करुन शासनास अहवाल सादर केला होता.

सप्टेंबर आणि ऑक्टोबर दोन्ही मिळून निलंगा तालुक्यातील एकूण दहा मंडळातील अतिवृष्टीमुळे झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीपोटी शासनाकडून एकूण ३२ कोटी ३४ लाख रुपये मदत मिळाली आहे.

त्यामध्ये गत सप्टेंबर महिन्यात निलंगा तालुक्यातील अंबुलगा आणि हलगरा या दोन मंडळातील एकूण १० हजार ७६० हेक्टर आर क्षेत्रातील अतिवृष्टी झालेले १६ हजार ५२५ शेतकरी लाभार्थी असून शासनाकडून मदतीसाठी १६ कोटी ६० लाख रुपये मंजूर झाले होते. त्यापैकी १५ हजार ३२१ शेतकऱ्यांना १४ कोटी १० लाख ७१ हजार १४४ रुपये मदत २० मार्चपर्यंत मिळाले असून यातील ६८७ शेतकऱ्यांनी ई-केवायसी न केल्यामुळे त्यांचे एकूण ४६ लाख ५१ हजार ०८८ रुपये तालुका प्रशासनाकडे पडून आहेत.



तसेच ऑक्टोबर महिन्यात निलंगा तालुक्यातील कासार शिरसी, कासार बालकुंदा, मदनसुरी, निटूर, पानचिंचोली, औराद, निलंगा, भूतमुगळी या आठ मंडळातील एकूण ३८ हजार हेक्टर आर क्षेत्रातील अतिवृष्टी झालेले ६० हजार ९१३ शेतकरी लाभार्थी असून शासनाकडून मदतीसाठी ५१ कोटी ७४ लाख रुपये मंजूर झाले होते. त्यापैकी ५६ हजार ५६४ शेतकऱ्यांना ४५ कोटी ४२ लाख १७ हजार ५०६ रुपये मदत मिळाले असून यातील ४ हजार ८८९ शेतकऱ्यांनी ई-केवायसी न केल्यामुळे त्यांचे एकूण ३ कोटी ४९ लाख ३९ हजार ७०७ रुपये प्रशासनाकडे शिल्लक आहेत.

**शेतकऱ्यांनी लवकरच ई-केवायसी करून घावे**
**अन्यथा मदतीची रक्कम शासनाकडे समर्पित होणार...**

यामध्ये कोणी मयत आहेत, कांहीचे आधार लिंक नाही, कांहीनी ई-केवायसी केलेली नाही, कांही भांडण-तंटे, सामायिक क्षेत्र, कोणी बाहेर गावी गेलेले आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ई- केवायसी करून घ्यावे तसेच ऑनलाईनसाठी आधार कार्ड, बँक डिटेल्स, मोबाईल नंबर, व तसेच लागणाऱ्या इतर बाबींसाठी तात्काळ आपल्या संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांना भेटून कागदपत्रे सादर करून घ्यावे. दि. २५ मार्च २०२५ पर्यंत कागदपत्रे अपलोड करण्याची अंतिम तारीख आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर ई- केवायसी करून घावे, आणि आपले कागदपत्रे जमा करावे. अन्यथा शासनाकडून मिळालेली मदतीची रक्कम ही शासनाकडे परत समर्पित होणार आहे.

**- प्रसाद कुलकर्णी,** तहसीलदार, निलंगा

## खेळांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास सहजपणे होतो : डॉ. प्रा. मोघे गोपाळ

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२२ मार्च -**

विद्यार्थ्यांनी मैदानी खेळ खेळले पाहिजेत मैदानी खेळातून शरीर तंदुरुस्त बनते व खेळांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास सहजपणे होतो असे उद्गार शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी THE ROLE OF SPORTS IN PERSON-LITY DEVELOPMENT खेळाच्या माध्यमातुन व्यक्तिमत्व विकास या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.



त्याप्रसंगी डॉ.प्रा. मोघे गोपाळ लक्ष्मीकांत क्रीडा संचालक महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा यांनी काढले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्र. प्राचार्य डॉ. रामकिशन मांजरे हे उपस्थित होते. तर व्यासपीठावर प्रमुख पाहुणे डॉ. अजित मोदजकर इंग्रजी विभाग प्रमुख महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. विष्णू पवार, क्रीडा संचालक प्रा. नेहाल खान उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. मोघे म्हणाले शारीरिक व मानसिक दुष्टया खेळाडू खेळातून कणखर बनतात. व्यक्तिमत्व विकासात सर्वात महत्वाचा घटक म्हणजे नेतृत्वगुण, एकात्मता व बंधुभाव खेळाच्या माध्यमातून संघ भावना वाढते. एकमेकाविषयी आदर निर्माण होतो, बंधुभाव वाढतो, असे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा.डॉ. रामकिशन मांजरे यांनी अध्यक्षीय समारोप केला. तर प्रा.डॉ. विष्णु पवार यांनी आभार मानले.

कार्यकमाचे सुत्रसंचालन क्रीडा संचालक प्रा. नेहाल अहमद खान यांनी केले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध क्रीडा प्रकारातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संक्षिप्त वृत्त...



**महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात बेस्ट लायब्ररी युजर अवॉर्ड प्रदान**

**उदगीर, दि.२२ मार्च -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात 'बेस्ट लायब्ररी युजर अवॉर्ड २०२५' ने महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले, हा पुरस्कार ज्या पाच विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्षात जास्तीत जास्त पुस्तके वाचली असतील अशा पदवी आणि पदव्युत्तर वर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात येतो. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी तग्याळे मेहजबिन तय्यबसाहेब (बीएससी द्वितीय), मडके प्राची श्रीमंत (बीए तृतीय), गायकवाड अनिकेत अंकुश (बीएससी द्वितीय), मुंजेवार सोहेल बशीर (एमएससी द्वितीय) आणि माने राहुल प्रभाकर (एमएससी द्वितीय) या पाच विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, ग्रंथपाल प्रा.डॉ.एल.बी. पेन्सलवार आणि प्रा.डॉ.ए.पी. मोरे यांच्या हस्ते देण्यात आला. या गुणवंत वाचक विद्यार्थ्यांचे म.ए. सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी आणि सर्व संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर.के. मस्के, उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.एन. हल्लाळे, ग्रंथपाल प्रा.डॉ.एल.बी. पेन्सलवार, ग्रंथालय समितीचे सदस्य आणि प्राध्यापक यांनी अभिनंदन केले आहे.




**ॲडव्हान्स कोर्सचे उद्घाटन उत्साहात संपन**

**उदगीर, दि.२२ मार्च -**

श्यामलाल स्मारक कला, क्रीडा व विज्ञान अकॅडमी द्वारा स्पोकन इंग्लीश कोर्स, मराठी हस्ताक्षर कार्यशाळा, मोफत फाऊंडेशन समर कलालेस ४ थी, ५ वी, ८ वी व १० वी, तसेच ५ वी ते ९ वी पर्यंत इंग्रजी विषयाचे अभ्यासक्रम अशा विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा या कार्यक्रमाचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, प्रमुख पाहुणे भारतीय जनता पार्टीचे माजी अध्यक्ष तथा उसतोड कामगार समितीचे प्रमुख गोविंद केंद्रे, शालेय समितीचे सदस्य पंडीतराव सुकनीकर, बिरादार, कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रवीण भोळे, श्यामलाल माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक भारत खंदारे व मुख्याध्यापक विवेक उगिले, पर्यवेक्षक विजयकुमार बैले, राहुल लिमये, शिक्षक, शिक्षिका विद्यार्थी या सर्वांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना पायाभूत शिक्षण, सर्वांगीण विकास, मूल्याधिष्टीत शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थां ही विद्यार्थी केंद्रभूत मानून व्यक्तीमत्व विकासाला चालना देते असे विचार गोविंद अन्ना केंद्रे यांनी आपला मनोगतातून मत व्यक्त केले. सुत्रसंचालन व प्रास्ताविक प्रवीण भोळे तर आभार भारत खंदारे यांनी व्यक्त केले.

**प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न**

**लातूर, दि.२२ मार्च -**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर (पदवी व पदव्युत्तर इतिहास विभाग) आणि वसुंधरा भाषा, मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते २२ मार्च २०२५ या कालावधीमध्ये महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये मोडीलिपी प्रारंभिक प्रशिक्षण वर्ग प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला.

## मुर्टा येथे प्रयागराज महाकुंभ तीर्थाचे पूजन

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२२ मार्च -**

महाकुंभ मेळा हा हिन्दु धर्मांत सर्वात पवित्र मानला जातो. आध्यात्मिक साधकांना प्रयागराज येथील पवित्र त्रिवेणी संगमावर जिथे गंगा, यमुना व सरस्वती या नद्या एकत्र येतात. तेथे महाकुंभ मेळयाचे आयोजन मकर संक्रांत ते महाशिवरात्री या कालावधीत करण्यात आले होते. या पवित्र उत्सवाचा समारोप झाला. परंतु ज्या भाविकांना या महाकुंभ सोहळ्यात जाता आले नाही, अशा भाविकांसाठी अनुलोम या संस्थेच्या माध्यमातुन मौजे मुर्टा (ता.तुळजापुर) येथे दि.२१ मार्च रोजी दर्शन घडविण्यात आले. यावेळी गावातील दांपत्यांच्या हस्ते कलश पुजन करण्यात आले.

यावेळी शरद सुरवसे, सुरज गुंडे, अशोक करदुरे, संगीता करदुरे, हनुमंत चव्हाण, पार्वती चव्हाण, अमोल चव्हाण, मयुरी चव्हाण, सहदेव चुंगे, मिना चुंगे, शिवाजी चुंगे, स्वाती चुंगे, लक्ष्मण थोटे, विजयाबाई थोटे आदि उपस्थित होते.

## कडकडीत उन्हामुळे गरीबांच्या फ्रिजची मागणी वाढली

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२२ मार्च -**

शिरूर आनंतपाळ तालुक्यात दिवसेंदिवस उन्हाचा पारा वाढत चालल्याने गरीबांचा फ्रीज म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मातीच्या मठाला शहरी भागासह ग्रामीण भागातील बाजारात मागणी वाढली आहे. माठाची किमत आपल्या आवाक्यात असल्याने ते खरेदी करतानाही ग्राहक दिसत आहेत.

येथुन जवळच असलेल्या नळेगाव येथील आठवडी बाजारात माठांना भरपूर प्रमाणात मागणी आहे त्यासाठी पारंपरिक व्यवसाय असणाऱ्या कुंभार दादा आठवडी बाजारात गरीबांचे फ्रिज म्हणून ओळखले जाणारे माठ घेऊन



बसलेले दिसत आहेत. या बाजारात जवळपासच्या हिप्पळगाव, थेरगाव, रापका, शिवपुर, सुगाव, गणेशवाडी, कांबळगा, आरी, लक्कडजवळगा अशा अनेक खेड्यातील नागरिक आठवडी बाजार करण्यासाठी येत असतात. यामुळे माठ विक्रेत्यानी मातीचे माठ व रांजण विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत. सध्या उन्हाचा पारा बाढत चालला आहे. मार्च महिना सुरू असून, एप्रिल ते में पर्यंत अतिशय कडक उन असते. त्यामुळे सध्या बाजारात मातीपासून तयार करण्यात आलेल्या माठांना मागणी वाढली आहे. कितीही कडक उन्हाळा असला तरी माठातले थंडगार पाणी पिले तर उन्हाळा तितकासा त्रासदायक जानवत नाही. म्हणून बाजारात या माठाना मोठी मागणी आहे. सध्या बाजारात १५ लिटर पाणी बसणाऱ्या माठाची किमत २०० ते २५० रुपयांला विक्री केली जात आहे. तर रांजन पाचशे ते एक हजार रुपयाच्या पुढे आहे. फ्रिज पेक्षा माठातील पाणी पिण्याचे अनेक आरोग्यदायी फायदे आहेत.

माठातील पाणी नैसर्गिकरित्या थंड असते. माठातील पाणी पिल्याने शरीरातील आंतरिक उष्णता कमी होते. माठातील पाणी पिण्यामुळे शरीरातील वात, पित आणि कफ यांचे संतुलन राहते.

## समाजभान असलेली स्त्री निर्माण होणे आवश्यक : प्रा.डॉ. क्रांती मोरे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२२ मार्च -**

आज महिला अनेक क्षेत्रात आघाडीवर आहेत. महिला सक्षमीकरणाच्या गप्पा मोठया प्रमाणात मारल्या जातात. परंतु केवळ आर्थिकदृष्टया सक्षम झाले म्हणजे महिला सक्षम झाली असे नाही, तर समाजभान असलेली स्त्री निर्माण झाल्यास खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण झाले आहे असे म्हणता येईल असे प्रतिपादन लातूर येथील प्रसिद्ध विचारवंत प्रा.डॉ. क्रांती मोरे यांनी केले.

येथील रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रलच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा.डॉ. मोरे बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबच्या अध्यक्षा सरस्वती चौधरी




होत्या. व्यासपीठावर प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या उदगीरच्या संचालिका ब्र.कु. महानंदा बहेनजी, रोटरी क्लबच्या सचिव ज्योती चौधरी, प्रोजेक्ट चेअरमन महानंदा सोनटक्के उपस्थित होते. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक महानंदा सोनटक्के यांनी केले. पुढे बोलताना डॉ. क्रांती मोरे म्हणाल्या की, महिला आज विविध क्षेत्रात पुढे जात आर्थिक उन्नती करून घेत आहेत, ही समाधानाची बाब आहेत. मात्र आज समाजात होत असलेल्या महिलांवरील अत्याचारावर बोलायला कोणी महिला पुढे येत नाही ही खेदाची बाब आहे असे सांगून लग्नाच्या बाबतीत बिभीत्सपणा वाढला आहे. प्री-वेडींगमुळे लग्न मोडल्याच्या घटना वाढत आहेत अशा घटना टाळण्यासाठी त्यांनी भावी पिढीवर योग्य संस्कार करण्यासाठी महिलांचे योगदान महत्वाचे असल्याचे यावेळी डॉ. मोरे म्हणाल्या.

यावेळी प्राजक्ता भांगे, वैष्णवी पाटील, श्रेया शिरसीकर, नंदा स्वामी, रुक्मिणी हालसे या महिलांचा नारी शक्ती पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबच्या वतीने घेण्यात आलेल्या पाककला व फन गेम्स स्पर्धेतील विजेता महिलांना बक्षीसे देण्यात आले. अंजली मुक्कावार यांनी स्वागतगीत गायिले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. अनिता हैबतपुरे, डॉ. सुलोचना येरोळकर यांनी केले. आभारप्रदर्शन ज्योती चौधरी यांनी केले. कार्यक्रमासाठी सुनीता मदनूरे, विद्या पांढरे, डॉ. सुनीता चवळे, दर्शना मांगुळकर, वैभवी कणसे आदींसह रोटरी पदाधिकारी व सदस्यांनी पुढाकार घेतला.

## लातूर कॉलेज ऑफ फार्मसीत माजी विद्यार्थी मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२२ मार्च -**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला.या मेळाव्यास माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून उत्फुर्त प्रतिसाद दिला आहे.

संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयातील उत्तीर्ण होऊन गेलेले विद्यार्थी देशाच्या नामांकित कंपनीमध्ये कार्यरत आहेत. तसेच स्वतःचा व्यवसाय, मार्केटिंग इत्यादी क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. अशा माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन विद्यमान विद्यार्थ्यांना व्हावे. यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यात माजी विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या वतीने सचिव वेताळेश्वर बावगे व संचालक नंदकिशोर बावगे यांच्या हस्ते करण्यात आले. या संस्थे अंतर्गत विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम गरजू विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणार आहेत. संचालक नंदकिशोर बावगे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर व सखोल मार्गदर्शन केले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी अडचणीमध्ये संस्था व महाविद्यालय सदैव तुमच्या पाठीशी उभे आहे असा विश्वास संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे यांनी उपस्थितांना दिला. माजी विद्यार्थी ऋत्विक पारशेट्टे यांना उत्कृष्ट विद्यार्थी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## मुख्याध्यापिकेला मारहाण, जीवे मारण्याची धमकी; गुन्हा दाखल

**निलंगा येथील शिवाजी विद्यालयातील घटना...**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२२ मार्च -**

निलंगा शहरातील नामांकित असलेल्या शिवाजी शिक्षण प्रसारक संस्था अंतर्गत चालवण्यात येत असलेल्या शिवाजी विद्यालयाच्या मुख्याध्यापिकेला कनिष्ठ लिपिक पदासाठी माझ्या नावाचा प्रस्ताव का? पाठवला नाही म्हणून मारहाण करून गळ्याला चाकू लावून, चाकूचा धाक दाखवत जिवे मारण्याची धमकी देत कार्यालयातील साहित्याची तोडफोड करून महत्त्वाची कागदपत्रे फाडून टाकण्याची घटना शनिवारी दि.२२ मार्च रोजी सकाळी झाली. विद्यालयाच्या जवळपास कांही अंतरावर पोलीस ठाणे असल्यामुळे मुख्याध्यापिकेने धावत पळत पोलीस स्टेशनमध्ये जाऊन आपला जीव वाचवला.

याबाबतची मिळालेली माहिती अशी की, निलंगा शहरातील शिवाजी शिक्षण प्रसारक संस्थेमध्ये गेल्या अनेक वर्षापासून कार्यकारी मंडळात वाद आहे. हा वाद न्यायप्रविष्ठ असून येथील मुख्याध्यापिका दीपश्री तुकाराम जाधव या २४ वर्षापासून शिक्षण संस्थेमध्ये सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. मागील दोन वर्षांपूर्वी त्यांच्याकडे मुख्याध्यापिका पदाचा पदभार देण्यात आला आहे. संस्थेतील कनिष्ठ लिपिक पदाबाबत आठ महिन्यापूर्वी गुणानुक्रमे स्वप्निल शेळके यांची निवड झाली होती. याबाबत राधिका श्रीराम साळुंके यांनी आक्षेप नोंदवला होता. यावाबत २० मार्च रोजी शिक्षण उपसंचालक लातूरच्या कार्यालयात सुनावणी झाली. त्यानंतर शनिवारी दि. २२ रोजी मुख्याध्यापिका दीपश्री तुकाराम जाधव ह्या दररोजच्या प्रमाणे शाळेमध्ये आपल्या कार्यालयातील कामकाज करत असताना राधिका श्रीराम सोळुंके व सुवर्णा श्रीराम सोळुंके या कार्यालयात येऊन लिपिक पदाच्या प्रस्तावावर स्वाक्षऱ्या करून माझा प्रस्ताव का पाठवला नाही, दुसऱ्या व्यक्तीचा प्रस्ताव कोणत्या आधारावर पाठवला त्यांच्या नावाचे मस्टर का भरत आहात म्हणून तिला मारहाण करीत कार्यालयातील





संगणक तोडफोड करून, हजेरीपत्र, कॉम्प्युटर, हालचाल रजिस्टर, या सर्व विविध कागदपत्राची फडाफाडी केली.

त्याचबरोबर मुख्याध्यापिकेला मारहाण करत असताना कार्यालयातील काही कर्मचारी त्या ठिकाणी धावून आले एक जण चक्कर येऊन पडला. या दोघांमध्ये वादावादी सुरू असताना एकीने मुख्याध्यापिकेला चाकूचा धाक दाखवत प्रस्तावावर सह्या कर म्हणून धमकी देण्याचा प्रयत्न केला.

अशा परिस्थितीत त्यांच्या तावडीतून मुख्याध्यापिका श्रीमती जाधव यांनी सुटका करून समोरच पोलीस ठाणे असल्यामुळे धावत-धावत पोलीस ठाणे गाठले व आपला जिव वाचवण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार शाळेतील कार्यालयातच झाला.

मुख्याध्यापिका दिपश्री तुकाराम जाधव यांच्या फिर्यादीवरून आरोपी राधिका श्रीराम सोळुंके व सुवर्णा श्रीराम सोळुंके यांच्याविरुद्ध शासकीय कामात अडथळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आज लातूर मध्ये नाट्यसंगीत प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** येथील आवर्तन व अष्टविनायक प्रतिष्ठान च्या वतीने आज रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी गणेश हॉल अष्टविनायक मंदिर लातूर येथे एकदिवसीय नाट्यसंगीत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले आहे, सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत ही कार्यशाळा होणार आहे. येथील आवर्तन प्रतिष्ठानच्या वतीने अभिजात शास्त्रीय संगीताच्या प्रचार व प्रसारासाठी मासिक संगीत सभेच्या सोबतच अशा अनेक कार्यशाळांचे आयोजन सातत्यपूर्ण आज पर्यंत करण्यात आले आहे. असेच नाट्यसंगीत प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन आज प्रतिष्ठानच्या वतीने केले आहे.

तसे पाहिले तर मराठी संगीत नाटक ही मराठी रंगभूमीने जागतिक रंगभूमीला दिलेली देणगी आहे, असे मानले जाते. विष्णूदास भावे यांनी मराठी रंगभूमीचा श्रीगणेशा केला तर संगीत नाटकाचा लौकिक अर्थाने प्रारंभ अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या संगीत शाकुंतल या नाटकाने झाला. त्यानंतर सौभद्र, रामराज्यवियोग, द्रौपदी, विद्याहरण, शारदा, स्वयंवर, मानापमान, संशयकल्लोळ, एकच प्याला ..अशा संगीत नाटकांची परंपराच निर्माण झाली. १८८० ते १९३० हा संगीत नाटकांच्या आणि पर्यायाने नाट्यसंगीताचा सर्व अर्थांनी सुवर्णकाळ म्हणावा लागेल.

आज आपण पाहतो नाट्यसंगीत ऐकणारा श्रोता वर्गही मोठ्या संख्येने आहे व नाट्यसंगीत गाणाऱ्यांचीही संख्या मोठी आहे, आपल्याकडे अनेक जण नाट्यसंगीत गातात परंतु नाट्यसंगीत गाण्याची नेमकी पद्धत काय नाट्यसंगीता चा विस्तार आणि शास्त्रीय संगीताचा विस्तार यामध्ये फरक काय आहे नाट्यसंगीताचा विस्तार कशा पद्धतीने केला जातो, राग शास्त्राचे नियम याला किती पटीने लागू होतात तसेच विविधतालातील नाट्यसंगीत व त्याचे सादरीकरण कसे करावे या संदर्भात विस्तृत व शास्त्रोक्त मार्गदर्शन होणार आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## 'श्री देशिकेंद्र'चा मैत्रेय ठरला राष्ट्रीय पुरस्काराचा मानकरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** येथील महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था द्वारा संचलित श्री देशिकेंद्र विद्यालयाचा विद्यार्थी मैत्रेय राहुल श्रीमाळे हा भारत सरकारच्यावतीने देण्यात येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराचा मानकरी ठरला आहे.

हा पुरस्कार भारत सरकारच्या केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय अंतर्गत येणाऱ्या डॉ. आंबेडकर प्रतिष्ठानच्यावतीने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पहिले तीन क्रमांक मिळविणाऱ्या अनुसूचित जाती व जमातीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रदान करण्यात येतो. मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत मैत्रेय श्रीमाळे याने ९९ टक्के गुण मिळविले होते.त्यामुळे त्याला हा प्रतिष्ठेचा डॉ. आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाला आहे. या पुरस्काराची तिसऱ्या क्रमांकाची ४० हजार रुपयांची शिष्यवृत्ती त्याला प्राप्त झाली आहे. त्याने मिळविलेल्या या यशाबद्दल आदिनाथ सांगवे, माधवराव पाटील चिंचोलीकर, माधवराव पाटील टाकळीकर, सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, बसवराज येरटे, मुख्याध्यापक रुपसिंग सगर आदींनी कौतुक केले.

## 'जीबीएस'चा रुग्ण दगावल्याने चिंता वाढली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचार सुरू असलेल्या एका ६८ वर्षीय 'जीबीएस' रुग्णाचा बुधवारी रात्री हृदयविकाराने मृत्यू झाला. दरम्यान, अन्य एक रुग्ण गंभीर असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात हाता-पायात कमजोरी, मळमळ, थकवा, असा त्रास जाणवणारा एक ६८ वर्षीय रुग्ण दाखल झाला. उपचारानंतर बरा होत असताना अचानकपणे हृदयविकाराचा त्रास सुरू झाला. त्यामुळे तत्काळ अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान, बुधवारी रात्री मृत्यू झाला. दरम्यान, अन्य एका ४८ वर्षीय रुग्णास अशक्तपणा अधिक जाणवू लागल्याने प्रकृती गंभीर झाली. त्यामुळे आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत.

## मोफत अस्थिरोग शिबिरास लातुरात प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** येथील डॉ अशोक पोद्दार यांच्या पोद्दार हॉस्पिटल अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही आ. अमित देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ९६ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले.

या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिराचे उदघाटन उपअधीक्षक गजानन भातलवंडे, माजीउप महापौर कैलास कांबळे, डॉ. चेतन सारडा, डॉ. दीपक गुगळे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

## 'त्या' हत्याप्रकरणातील आरोपींना मकोका लावा : व्हीएस पँथर्स

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** बीड जिल्ह्यातील दलित युवक विकास बनसोडे यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येचा व्हीएस पँथर्स संघटनेकडून जाहीर निषेध करीत या हत्या प्रकरणातील आरोपींवर अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायदा तसेच मकोकातंर्गत कारवाई करून आरोपींना तात्काळ अटक करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे निवेदनावर जिल्हाध्यक्ष शरद किणीकर, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे, ग्रुप जिल्हाध्यक्ष अजय सूर्यवंशी, सुनील आदमाने, चाकूर तालुकाध्यक्ष अजय वाघमारे, लक्ष्मण कांबळे आदींसह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरी आहेत.

## नागरी समस्यांची गंभीर दखल घेत डॉ. गोऱ्हे यांचे तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** लातूर शहराला भेडसावणाऱ्या नागरी समस्या दूर कराव्यात यासाठी 'माझं लातूर' परिवाराच्या वतीने विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांना निवेदन देण्यात आले होते. याची दखल घेत समस्येची दखल घेत मंत्रालयातील त्यांच्या दालनात दिनांक २१ मार्च २०२५ रोजी बैठक घेतली.

**'माझं लातूर' परिवाराचा पाठपुरावा**

या ऑनलाईन बैठकीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये म्हणून पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करून दूषित पाण्याची समस्या तत्काळ सोडवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या जिल्हा रुग्णालयासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश ही यावेळी देण्यात आले. लातूर जिल्हा रुग्णालय, लातूर शहरातील कचरा व्यवस्थापन, पाणीटंचाई, दूषित पाणीपुरवठा, वाहतूक समस्या तसेच स्वच्छता व्यवस्थेच्या अनुषंगाने विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बैठक पार पडली. या बैठकीत त्यांनी लातूर शहराच्या नागरी समस्यांवर ठोस उपाययोजना राबविण्याच्या सूचना दिल्या. लातूर शहरातील पाणीपुरवठ्याच्या स्थितीचा आढावा घेताना महानगरपालिका आयुक्तांनी स्पष्ट केले की, यंदा पाऊस चांगला झाल्याने सध्या कोणतीही पाणीटंचाई नाही. यावर बोलताना दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी आल्या आहेत, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश डॉ. गोऱ्हे यांनी दिले. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महानगरपालिकेला रिकाम्या प्लॉट्समध्ये कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले. गो ग्रीन गॅलरी, रूफ वॉटर हार्वेस्टिंग यांसारखे उपक्रम राबवले जात असून सांडपाण्याच्या व्यवस्थेसाठी सेप्टिक टँक व सार्वजनिक स्वच्छतागृहांची सोय करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी यांनी दिली.

शहरातील वाढती वाहतूक आणि मुख्य चौकातील कोंडीचा प्रश्न लक्षात घेऊन रिंग रोडचा प्रभावी वापर करण्यावर भर द्यावा असे निर्देश दिले गेले. शिवाजी चौकातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलीस अधीक्षक आणि महानगरपालिका अधिकाऱ्यांनी संयुक्त नियोजन करावे असेही डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. लातूर शासकीय रुग्णालयाच्या जागेच्या हस्तांतरणासह शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा परिषद चिकित्सालय आणि कृषी विभागाच्या प्रकल्पांबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. यासोबतच बस स्थानकाच्या विस्तारासाठी आणि नवीन पर्याय शोधण्यासाठी उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला. अवकाळी पावसामुळे संभाव्य हानी टाळण्यासाठी, पूर्वसूचना यंत्रणा सक्षम करणे आवश्यक असल्याचे डॉ. नीलम गो-हे यांनी यावेळी सांगितले. बैठकीला मंत्रालयातील विविध विभागांचे सचिव, प्रमुख अधिकारी प्रत्यक्ष तर लातूर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, पोलीस अधीक्षक सोमय मुंढे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ उदय मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ प्रदीप ढेले यांच्यासह माझं लातूर टास्क फोर्सचे सदस्य हे ऑनलाइन उपस्थित होते.

## गजबजलेल्या शहरात सी.सी. टि.व्ही. कॅमेरे केंव्हा बसणार?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** शहर स्वच्छ शहर सुंदर शहर या संकल्पनेला धरुन आहे. शहरात अनेक भागात गर्दिची ठिकाणे आहेत. या ठिकाणी सकाळी व सायंकाळी मोठया प्रमाणात लोकांची व वाहनांची रहदारी असते. शहराची लोकसंख्या दिवसेन दिवस वाढत आहे. आज लातूर शहराची लोकसंख्या १० ते ११ लाखाच्या आसपास असलेली पहावयास मिळते.

लातूर शहरामध्ये हॉस्पीटल, शाळा, महाविद्यालये, व्यापारी बाजारपेठा, भाजी मार्केट, मार्केट यार्ड आदी कामासाठी शहरामध्ये वेगवेगळया परिसरामध्ये नागरिकांना गर्दीचा सामना दर दिवशी करावा लागत आहे. या प्रसंगी शहराला सुरक्षीत ठेवण्याच्या दृष्टीने ठिकठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसवण्यात यावेत.

गर्दीच्या ठिकाणामध्ये गंजगोलाई, भाजी मार्केट, भुसार लाईन, कापड लाईन, सोनार लाईन, एस.टी. स्टॅण्ड, सी.टी. बस थांबा, कव्हा रोड, मज्जीद रोड, तसेच जनवारांचा बाजार शहरातील मुख्य चौक, सिर्व्हल हॉस्पीटल इ. ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसवून रहद्दारीच्या ठिकाणी होणारे अनुचित प्रकार महानगरपालिकेने थांबवावेत अशी विनंती रणसम्राट प्रतिष्ठाच्या वतीने करण्यात आली आहे.

## महावितरणच्या कर्मचाऱ्यांना मारहाण कराल तर तुरुंगात जाल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** परिमंडळात वीजबिल वसुली मोहिम तीव्र करण्यात आली आहे. दरम्यान महावितरणच्या कर्मचाांना होणारी धक्काबुक्की, शिवीगाळ अश्या निंदणीय घटना परिमंडळात घडू नयेत यासाठी महावितरण आक्रमक झाले आहे.

महावितरणच्या परिमंडळ प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली असून संबंधित व्यक्तींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करून तात्काळ कारवाईसाठी प्रशासनाकडून पाठपुरावा करण्यात येणार आहे. विजेचे बिल वेळेत भरणे हे ग्राहकाचे कर्तव्य आहे. जर एखादा ग्राहक वीजबिल भरण्याला प्रतिसाद देत नसेल तर त्याा ग्राहकाचा वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. त्याामुळे ग्राहकांनी वीजबिल भरून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

मार्च अखेर निर्धारीत केलेले वीजबील वसुलीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी १० दिवस बाकी आहेत, परिमंडळातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील ग्राहकांकडून चालू महिन्याचे ११२ कोटी ७० लाख रूपये तसेच पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांचे ११ कोटी ७९ असे एकत्रीत १२४ कोटी ४९ लाख रूपये वसुलीचे उदिष्ट आहे. मात्र अद्याप ३५ कोटी ५० लाख वसूल होणे बाकी आहे. ग्राहक वीजबिल भरत नसल्याने महावितरणचे अभियंते, अधिकारी व कर्मचारी यांच्या कडून राबविण्यात येत आहे. या मोहिमेत कर्मचारी थकबाकीदारांच्या दारात पोहचत आहेत. बिल भरले नाही तर वीज नाही असा नाईलाजास्तव पवित्रा घेत महावितरणकडून थकबाकीदारांचा वीज पुरवठा खंडित करण्यात येत आहे. तथापि वीजबिल थकविणाऱ्या ग्राहकांकडून महावितरणच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ, मारहाणीच्या काही अनुचित घटना घडत आहेत.

शासकीय कामात अडथळा आणणे, सरकारी कर्मचाऱ्यांना मारहाण करणे किंवा कार्यालयांची तोडफोड करणे आदी प्रकरणांमध्ये दोषी व्यक्तीकरीता भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये २ ते १० वर्षापर्यंत शिक्षेची तरतूद आहे. अशा प्रकरणांमध्ये व्यवस्थापन संबंधित अभियंते व कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून संबंधितावर नक्की कायदेशीर कारवाई होणार याची जाणीव ठेवत वीज ग्राहकांनी नियमानुसार आणि वेळेत थकबाकीचा भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. सुट्टीच्या दिवसातही वीजग्राहकांना वीजबील भरण्यास अडचण येवू नये याकरिता महावितरणचे सर्वा वीजबील भरणा केंद्र सुरू ठेवण्यात येणार आहेत.

## महिला वकिलांच्या स्पर्धांना प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स असोसिएशनच्या वतीने फक्त महिला वकिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या उपक्रमांचे आयोजन महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील, ॲड. अरुणा वाघमारे, ॲड. वसुधा नाळापुरे, ॲड. अभिलाषा गवारे, ॲड. पल्लवी कुलकर्णी यांनी केले होते.

जागतिक महिला दिन सर्वत्र विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला गेला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स असोसिएशनच्या वतीने लातूरमध्येही सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. तसेच महिला वकिलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, गायन स्पर्धा व कायदेविषयक विषयावर भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना लातूरच्या महिला विधिज्ञांनी भरभरून प्रतिसाद दिला. महिला विधिज्ञांना दैनंदिन कामकाजाच्या ताणतणावातून मुक्त राहून त्यांच्यातील विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून माजी क्रीडा अधिकारी मीरा पाटील, ॲड. किरण चिंते, ॲड. मीरा कुलकर्णी यांची उपस्थिती होती. परीक्षक म्हणून ,ॲड. बबिता संकाये, जयाताई शिंदे, सुनेरा शिंदे या उपस्थित होत्या. पारितोषिक वितरणास ॲड. तेजस्विनी जाधव, ॲड. अनघा पाटील, ॲड. मनिषा दिवे, ॲड. तृप्ती इटकरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास ॲड. अंजली जोशी, ॲड. कल्पना भुरे , ॲड. सुरेखा शृंगारे , ॲड. सपना बोरा, ॲड. छाया मलवाडे , ॲड. प्रतिभा घोडके, ॲड. अपेक्षा जाधव आदिंची उपस्थिती होती.

## युवा प्रशिक्षणार्थ्यांचा सरकारविरोधात संताप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांना ११ महिन्यांची मुदतवाढ द्यावी, आदींसह मागण्यांसाठी मागील १९ दिवसांपासून मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरु आहे. परंतु, शासनाने आंदोलनाची कसलीही दखल घेतली नाही. त्यामुळे या आंदोलनाला पाठिंबा देत लातूर जिल्ह्यातील सहाय्यक संघटनेतर्फे दि. २१ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सरकारविरोधात घोषणाबाजी अन् संताप व्यक्त करीत मागण्यांचे निवेदन दिले.

शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी या माध्यमातून तरुणांच्या हाताला काम दिले. परंतु, मुदत संपताच सरकारनेही हात काढले. आता ११ महिन्यांची मुदतवाढ देऊन कायमस्वरुपी रोजगार द्यावा, मानधनात २५ हजार रुपये वाढ करावी, शासकीय, निमशासकीय सेवेत दहा टक्के आरक्षण देऊन टप्याटप्याने शासकीय सेवेत समायोजन करावे, आदींसह मागण्यांसाठी मुंबईच्या आझाद मैदानावर युवा प्रशिक्षणार्थींचे बेमुदत उपोषण सुरु आहे. परंतु, शासनाने आंदोलनाची कसलीही दखल घेतली नाही म्हणून लातुरात संताप व्यक्त करण्यात आला.

## राज्यस्तरीय महावीर कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्रातील पैलवानांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २२ मार्च -** विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, पुरातन यज्ञभूमी, रामेश्वर (रुई) ग्रामस्थ व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर तालुक्यातील रामेश्वर (रुई) येथे राज्यस्तरीय महाराष्ट्र कुस्ती महावीर स्पर्धा-२०२५ पार पडली.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील २०० पैलवान लाल मातीत उतरले होते. उद्घाटनाची कुस्ती कोल्हापूरचा अभिषेक जोगदंड व रामेश्वर (रुई) येथील जुनेद पठाण यांच्यात झाली. यात जुनेद पठाण हा विजयी झाला. तसेच पुणे येथील भालचंद्र कुंभार व पुण्याचाच सोनू कोलाटकर यांच्यातील स्पर्धेत भालचंद्र कुंभार हा चितपटाने विजयी झाला.



स्पर्धेचे उद्घाटन हिंद केसरी दिनानाथ सिंग यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर ग्रामीणचे आमदार रमेश कराड, महाराष्ट्र केसरी अप्पासाहेब कदम, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त विष्णू जोशीलकर, महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, पैलवान बंडा पाटील रेटरेकर, नजरूद्दीन नाईकवाडी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त दिनेश गुंड, रामेश्वरचे माजी सरपंच तुळशीराम कराड, काशीराम कराड, डॉ. हनुमंत कराड, राजेश कराड, ऋषिकेश कराड, प्रा. विलास कथुरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी हिंद केसरी दिनानाथ सिंग म्हणाले, आधुनिक काळातही लाल मातीवर प्रेम करणारे डॉ. विश्वनाथ कराड यांनी पैलवानांना आधार दिला आहे. त्यातून खेळाप्रती प्रेम दिसून येते. खऱ्या अर्थाने कुस्ती जगविण्यासाठी सातत्याने त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. कुस्ती स्पर्धा सतत अशीच चालत राहावी यासाठी पुढील पिढी तयार आहे, असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. विश्वनाथ कराड यांचे मार्गदर्शन झाले.कुस्ती स्पर्धेचे धावते वर्णन समालोचक बाबा निम्हण यांनी केले. डॉ. महेश थोरवे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विलास कथुरे यांनी आभार मानले.

## प्राचार्य इगे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** जेएसपीएम संचालित शिवाजीराव पाटील कव्हेकर फार्मसी कॉलेज, लातूरच्या प्राचार्यपदी प्रद्युम्न इगे हे रुजू झाल्याबद्दल जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी त्यांचा शाल व ग्रंथ भेट देऊन सत्कार केला.

यावेळी जेएसपीएमचे समन्वयक विनोद जाधव, प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य लक्ष्मीकांत गौंड, प्रा.रोहित येरटे, प्रा.जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य प्रद्युम्न इगे हे प्रचंड अनुभवी व माजी शिक्षणमंत्री अमरिशभाई पटेल यांच्या आर.टी.पटेल इन्स्टिट्युट ऑफ फार्मासिटीकल एज्युकेशन अँड रिसर्च शिरपूर येथे तेरा वर्ष प्राचार्य म्हणून कार्यरत होते . या नियुक्ती नंतर त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

## आशांनी सामान्य आरोग्याबरोबर मौखिक आरोग्य जागृती करावी : डॉ. पवार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** लोकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आशा स्वयंसेवीका नेहमी प्रयत्नशील असतात. शासनाचे आरोग्य विषयक विविध उपक्रम त्यांनी घराघरात पोहचवीले असून त्या खऱ्या आरोग्य जागृती दूत आहेत. या पुढे आशा स्वयंसेवीकांनी सामान्य आरोग्याबरोबर मानवी शरीरातील मौखीक आरोग्याचे महत्त्व आणि फिजीओथेरपी उपचाराची उपयोगीता सांगून समाजात जागृती करावी, असे आवाहन लातूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रामराव पवार यांनी केले.



एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालय आणि एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय यांच्या वतीने आयोजित अशा स्वयंसेवीका आरोग्य प्रशिक्षण मेळाव्यात प्रमुख पाहणे म्हणून डॉ. रामराव पवार बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड हे होते. यावेळी लातूर तालुका समूह संघटक रेखा कौटूंबे, एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष खत्री, यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयाचे रुग्णालय अधिक्षक डॉ. एकनाथ माले, मुख्य लेखा अधिकारी सुनील कवठेकर, प्रशासकीय अधिकारी शंकर ससाने हे उपस्थित होते.

लोकांचे सर्वांगीन आरोग्य चांगले रहावे यासाठी आशा स्वयंसेवीका ग्रामीण भागातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचून आरोग्याचा संदेश पोहचवत आहेत. ग्रामीण भागात सामान्य आरोग्याबाबत शासनाच्या आरोग्य विभागांतर्गत आशांनी केलेल्या कामामुळे सर्वच घटकातील लोकांत जागृती निर्माण झालेली आहे. त्यामुळे लोक आरोग्य सेवा घेण्यासाठी पुढे येत आहेत. सामान्य आरोग्याबरोबर शरीरासाठी मौखिक आरोग्यही तेवढेच महत्त्वाचे आहे. मौखीक आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत कोणासही दंत रोग उद्भवू शकतो.

अध्यक्षीय समारोपात कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांनी नेत्र रोग आणि घ्यावयाची काळजी व उपचार, दंत आरोग्य व फिजीओथेरपी उपचार या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. एकनाथ माले यांनी सामान्य आरोग्य आणि आवश्यक उपचार याविषयी मार्गदर्शन करुन यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातील विविध उपचार शाखा व उपलब्ध सुविधांविषयी माहिती दिली.